# अनुक्रमणिका




**4**
प्रारंभिक
**ज्ञानाचे टवटवीत फूल**
– जयंत पाटील

**5**
प्रबंध संपादकीय
**शरद पवार : दुसऱ्या हरितक्रांतीचे प्रणेते**
– दिलीप वळसे पाटील

**6**
संपादकीय
**साहेब, सर्वात्मकाचे प्रतिक**
– डॉ. सुधीर भोंगळे

**12**
**जयसिंगराव गायकवाड**
**राष्ट्रवादी प्रवेश समारंभ**
**१) शरद पवार पत्रकार परिषद–**
**विरोधक नैराश्यात– १२**
**भाषणे– १) शरद पवार– १६**
**२) जयसिंगराव गायकवाड–२०**
**३) अजित पवार–२३**
**४) जयंत पाटील–२५**
**५) धनंजय मुंडे–२६**

**28**
**यशवंतराव चव्हाण पारितोषिक**
**वितरण समारंभ, मुंबई– भाषणे**
**१) शरद पवार–२८**
**२) मुकुंद कुलकर्णी–३४**
**३) अरुण गुजराथी–३६**
**४) डॉ. अनिल काकोडकर–३७**
**५) सुप्रिया सुळे–४०**
**६) हेमंत टकले–४६**

**48**
**शरद पवार वाढदिवस विशेष लेख**
**उनके मुख में राम...**
**दिल में नथुराम**
**– अनंत**

**56**
**शाहू, फुले, आंबेडकर**
**परंपरेचे वारसदार– शरद पवार**
**डॉ. सुधीर भोंगळे**


**64**
**भाजपला हवा एकरंगी भारत**
**– आकाश,** नवीदिल्ली (वार्तापत्र)

**74**
**भाजपच्या तालावर नीतीशकुमार**
**किती काळ नाचणार?**
**– अवलोकितेश्वर**

**80**
**कानोकानी** (राजकीय विनोदी हलके–फुलके किस्से)
**– घंटाकर्ण**

**88**
**गृहमंत्री अनिल देशमुख**
**यांची नक्षल भागात**
**जवानांसमवेत दिवाळी साजरी**
**– उज्ज्वल भोयर**

**100**
**शेवटचे पान–**
**वरवरा राव– एका संघर्षाचे नाव**
**– हेमन्त टकले**



**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरिडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई–४०० ०३८
०२२–३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
वार्षिक रु. ५००/–
वर्गणीचा धनादेश
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.
www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'
च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर–३,आरएससी–२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

प्रारंभिक

# ज्ञानाचे टवटवीत फूल



आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि देशातील ज्येष्ठ राजकीय नेते मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांचा १२ डिसेंबरला ८० वा वाढदिवस आहे. आपल्या सर्वांचे भाग्य आहे की त्यांचे नेतृत्व व मार्गदर्शन आपल्याला अखंडपणे लाभते आहे. आजही या वयात ते सतत कार्यमग्न तर आहेतच पण आपल्यापेक्षाही अधिक लोकांशी त्यांचा दैनंदिन संपर्क आहे, संवाद आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील खडान्‌खडा ताजी माहिती त्यांच्याजवळ असते ती संवादामुळे. भेटणाऱ्या प्रत्येक माणसाची, त्याच्या गावाची, परिसराची ते आवर्जून चौकशी करतात. त्या भागातल्या जुन्या जाणत्या सहकाऱ्यांची श्रद्धेने विचारपूस करतात. आजही त्यांना जुन्या कार्यकर्त्यांची नावे तोंडपाठ आहेत. भेटीत ते त्याला नावाने हाक मारतात तेव्हा सारेजण आश्चर्यचकित होतात. साहेबांना लाभलेली स्मरणशक्ती ही ईश्वरी देणगीच आहे. संगणकासारखी माहिती क्षणार्धात त्यांना आठवते. इतिहासातले अनेक प्रसंग व नात्यागोत्याचे संबंध त्यांना भाषणाला उभे राहिल्याबरोबर खाडकन्‌ स्मरतात. त्या ऐतिहासिक उदाहरणांमुळे भाषणाला भारदस्तपणा येतो आणि विचारांमध्ये नवता व धार असल्यामुळे आज काही तरी नवीन ऐकल्याचे व पदरात पडल्याचे समोरच्या श्रोत्याला समाधान मिळते.

साहेबांची भाषणाची स्वतःची एक स्टाईल आहे. मुख्य म्हणजे ते भाषणासाठी तयारी करून येतात. आधी गृहपाठ करतात. ज्या विषयावर बोलायचे आहे त्यासंबंधीची नवी कोरी व ताजी टवटवीत माहिती गोळा करतात. ज्याच्याकडे ही माहिती असेल किंवा ज्याचा या विषयातला अभ्यास असेल त्याच्याशी स्वतः बोलतात. माहिती व विषय समजून घेतात. त्याला अनेक प्रश्न विचारून मनातल्या शंकांची उत्तरे मिळवितात. वेळप्रसंगी स्वतः गाडी काढून केलेला प्रयोग व संशोधन पाहायला जातात. माहिती देणारा माणूस किती वयाचा आहे, तो लहान की मोठा आहे, तो कुठल्या वस्तीत राहतो हे प्रश्न त्यांच्या दृष्टीने अत्यंत गौण असतात. तो खरोखर ज्ञानी व अभ्यासू आहे ना याची एकदा खात्री पटली की ते थेट विद्यार्थ्यांच्या भूमिकेत जातात. विषयाचा सगळा तपशील अत्यंत बारकाव्याने समजून घेतात. ज्ञानाची ही लालसा व जिज्ञासा अजूनही त्यांनी जपून ठेवलेली असल्यामुळे त्यांची विविध विषयांची माहिती, अभ्यास व ज्ञान हे एखाद्या नुकत्याच उमललेल्या फुलासारखे ताजे टवटवीत असते. आपल्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी त्यांच्यापासून ही ज्ञानलालसा उचलली पाहिजे. शेवटी जगात ज्ञानाची सत्ता सर्वश्रेष्ठ असते. ज्ञानाचे पावित्र्य ज्ञानाच्या आचरणात असते.

(पान ९२ वर)



## प्रबंध संपादकीय



# शरद पवार दुसऱ्या हरितक्रांतीचे प्रणेते

भारताची अन्नधान्याची स्वयंपूर्णता महत्वाची की शेतक-यांची आर्थिक उन्नती महत्वाची हा प्रश्न स्वातंत्र्यानंतर लगेचच चर्चिला जाऊ लागला. अन्नधान्यात देश स्वयंपूर्ण झालाच पाहिजे असा निर्धार व संकल्प करुन १९५१ पासून म्हणजे पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच 'अधिक धान्य पिकवा' ही मोहिम राबवायला सुरुवात झाली. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्ये शेती आणि जलसिंचनाचा विकास या दोन गोष्टींवर आवर्जून भर देण्यात आला. परंतु शेतक-याच्या आर्थिक उन्नतीच्या प्रश्नाला कोणीच हात घातला नाही. हा विषय कळत-नकळत किंवा जाणीवपूर्वक म्हणा मागे रेटला गेला व दुर्लक्षित राहिला. शेतकरी उत्पादित करीत असलेल्या गहू,ज्वारी,बाजरी,तांदूळ,बार्ली,मका, नाचणी,वरई,रागी यांसारख्या तृणधान्याच्या व एकूणच अन्नधान्याच्या आधारभूत हमी किमतींमध्ये (मिनीमम सपोर्ट प्राईस) सरकार पाहिजे तशी वाढ करीत नाही आणि उत्पादन खर्चाइतकाही भाव मिळत नाही हे लक्षात आल्यामुळे बहुसंख्य शेतकरी या अन्नधान्य पिकांऐवजी नगदीच्या व रोखीच्या इतर पिकांकडे वळले. परिणामी अन्नधान्याच्या व विशेषत: तृणधान्याच्या उत्पादनात मोठी घट येऊन देशात गहू पिकाची लागवड व क्षेत्र कमी झाले. योगायोगाने त्याच सुमारास म्हणजे २००४ मध्ये पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या मंत्रीमंडळात श्री.शरदराव पवार म्हणजे साहेब देशाचे कृषिमंत्री झाले. मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सर्वप्रथम पहिली फाईल साहेबांच्या समोर सहीसाठी आली ती परदेशातून गहू आयात करण्याची. नेहमीच्या सवयीप्रमाणे साहेबांनी फाईल नीट पूर्णपणे वाचून काढली. भारतातल्या शेतक-यांचा गहू सरकार ज्या दराने खरेदी करते त्यापेक्षा कितीतरी अधिक दर परदेशातल्या शेतक-यांना देवून गव्हाची खरेदी करण्याचे निश्चित करण्यात आले होते. फाईल वाचून साहेब प्रचंड अस्वस्थ झाले. फाईलवर सही करु की नको अशी मनाची चलबिचल झाली. दोन दिवस फाईलवर साहेबांनी सही केलीच नाही. गव्हाच्या टंचाईचा प्रश्न देशभर पेटलेला होताच. पंतप्रधानांना ही फाईल तातडीने सही करुन हवी होती. परंतु साहेबांचे मन व हात सही करायला धजावत नव्हता. अस्वस्थता वाढतच होती. अखेरीस न राहून पंतप्रधानांनी स्वत: साहेबांकडे या फाईलचा विषय काढला आणि निर्णय लवकर घ्यावा असे सुचविले. अखेरीस नाईलाज झाला. (पान ९५ वर)



# संपादकीय



'To whom much is given of him shall much be required.'

हे ख्रिस्तवचन किती उद्‌बोधक आहे. ज्याच्यापाशी विपुल आहे, त्याने औदार्याने विपुल दिले पाहिजे. केवळ स्वत:साठी जगण्यात काही अर्थ नसतो. जो स्वत:चे जीवन इतरांच्यासाठी व्यतीत करतो त्याचे जीवन सत्कारणी लागते. शरद पवार यांच्याकडे पाहिले की ते ख्रिस्ताची शिकवण किती सेवाभावाने प्रत्यक्ष आचरणात आणतात यासंबंधीचे विचार नकळतच मनापुढे तरळू लागतात. गेल्या ५५ वर्षांत पवारांची अनेक रूपे महाराष्ट्राने व देशाने पाहिली आहेत. राजकारणी पवारांचे रूप निराळे आहे. समाजकारणी पवारांचे रूप निराळे आहे. त्यामुळे पवारांच्या कारकिर्दीचे मूल्यमापन करताना व कामाचा लेखाजोखा मांडताना राजकारण आणि समाजकारण या दोन्ही अंगांचा वेगवेगळे निकष लावून तलास घ्यावा लागतो. राजकारणी पवार काही लोकांना अगदी जवळचे वाटतात तर काहींना राजकारणी पवार अजिबात आवडत नाहीत. कारण राजकारणात स्वार्थाची, पक्षहिताची गणिते असतात व ती सत्ताकारणाशी संबंधित असतात. गुंतलेल्या हितसंबंधांच्या गणितांमुळे राजकारणातील आवडी-निवडीचे प्रमाण कमी-जास्त होत असते. समाजकारणात मुख्य व मूळ उद्दिष्ट बहुसंख्य जनतेच्या व्यापक कल्याणाचेच असते. तुलनेने इथे स्वार्थाला कमी महत्व असते. सत्तेवर असणाऱ्या माणसाने सर्वसामान्य जनतेचे कल्याण व नि:स्वार्थ सेवा हेच उद्दिष्ट ठेवून कायम काम करावे अशी लोकांची अपेक्षा असते. राज्य पातळीवर मंत्रिपद आणि मुख्यमंत्रीपद अनेकदा अनुभवल्यानंतर एखादा नेता राष्ट्रीय स्तरावर जातो आणि केंद्र सरकारात संरक्षण, कृषि, सहकार, ग्राहक कल्याण, पशुसंवर्धन यांसारखी विकासाभिमुख व जनतेच्या दैनंदिन जगण्याशी अत्यंत जवळीक असलेली महत्त्वाची खाती सांभाळतो तेव्हा त्या राज्यातील जनतेला त्याच्या राजकीय भवितव्याबद्दल कुतूहलमिश्रित आत्मियता व व्यापक अपेक्षा वाटत राहतात. हे पवार साहेबांच्या बाबतीत संपूर्ण महाराष्ट्राने अनुभवलेले आहे. दिल्लीच्या तख्ताला धडक देऊन ते फोडू शकणारा महाराष्ट्रात एकमेव नेता आहे आणि तो म्हणजे शरद पवार या भावनेने मोठा आशावाद उराशी बाळगून जनता त्यांच्याकडे पाहात आली आहे. यावरूनच त्यांच्या नेतृत्वाच्या असाधारणतेची कल्पना येते. राज्याच्या एका नेत्याच्या संबंधी केवळ त्यांच्या अनुयायी व कार्यकर्त्यांनाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेला एवढी आस्था वाटावी व वाटते, यासारखे अन्य उदाहरण आणि त्यांच्यासारखा नेता महाराष्ट्रात आज तरी दुसरा कोणी नाही.



राजकारणापेक्षा समाजकारणावर त्यांचा अधिक भर आहे. राजकारण हे निवडणुकीपुरते असते. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर भाषणांमधून एकमेकांवर जी गरळ ओकळी ती विसरायची आणि विकासकामे व जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी हातात हात घालून काम करायचे असते हे सूत्र बारकाईने जपत पवार साहेब अखंडपणे काम करीत आहेत. त्यामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे ते गो. रा. खैरनार आणि आण्णा हजारे यांच्यापर्यंत कोणाच्याही टीकेला ते कधी डगमगले नाहीत आणि त्या टीकेला भीकही घातली नाही. विरोधकांनी अगदी कुटुंबातल्या माणसांवर देखील टीकेची राळ उडवायला कमी केले नाही. क्षुद्र व स्वार्थी राजकारणासाठी विरोधक व टीकाकार किती खालच्या पातळीला जाऊन वागतात याचेच ते निदर्शक होते. या टीकेने पवार साहेब अस्वस्थ झाले पण खचले नाहीत आणि टीकेला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्नही केला नाही. त्यांनी मौन बाळगणे पसंत केले. आजही अनेकांना असे वाटते पवार साहेबांनी त्यांच्या टीकाकारांना चांगले झोडून काढायला हवे होते. त्यांच्या मौन बाळगण्यामुळेच अनेक संभ्रम पसरले व अफवांना ऊत आला. पण

# साहेब, सर्वात्मकाचे प्रतिक

प्रत्येक प्रश्नाचे उत्तर काळ देत असतो यावर श्रद्धा असणाऱ्या साहेबांना काळानेच न्याय दिला. त्यांच्यावरचा एकही आरोप न्यायालयात तर सोडाच पण जनतेच्या दरबारातही सिद्ध होऊ शकला नाही. साहेबांवर अशीच टीकेची राळ उठलेली असताना आणि घरातल्या लोकांना त्यामध्ये ओढलेले असताना एकदा साहेबांच्या समवेत मी गाडीमधून पुण्याहून नाशिकला चाललो होतो. ते दिवस उन्हाळ्याचे होते. कडक ऊन रणरणत होते. त्या भीषण उन्हातही हजारो लोक स्त्री-पुरुष, मुले साहेबांना अभिवादन करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभी होती. जागोजागी गाडी अडवून लोक साहेबांना हार घालत होते. नमस्कार करीत होते. महिला कुंकुमतिलक लावून ओवाळत होत्या. कित्येक तास लोक मोठ्या आशेने साहेबांना भेटण्यासाठी, त्यांचे दर्शन घेण्याकरिता उन्हातान्हात थांबले होते. हे सगळे चित्र पाहिल्यावर क्षणभर साहेबच भावूक झाले आणि एकदम मला म्हणाले, "राजकारणाचा आता कंटाळा आलाय. विरोधकांनी माझ्या घरच्यांनाही सोडले नाही. आता थांबावे असे वाटते पण रस्त्याच्या दुतर्फा उभी राहिलेली ही हजारो माणसे पाहिल्यावर क्षणभर मनात विचार येतो. आपण यातल्या किती जणांना काय देतो? पण किती निःस्वार्थ मनाने ही माणसे आपल्यावर प्रेम करतात! त्यांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा, अडचणी पूर्ण करण्यासाठी आपला जन्म आहे. त्या लोकांचा आपल्यावर असलेला गाढ विश्वास, श्रद्धा, पाठिंबा हेच माझे काम करण्याचे बळ आहे. तेव्हा या लोकांच्यासाठी तरी आपण राजकारणात राहिले पाहिजे. लोकांच्या या प्रेमामुळे मी भारावून जातो आणि राजकारणातून रिटायर होण्याचा मनातला विचार मावळतो."

समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी साहेब सदैव जागृत असतात. ३०-३५ वर्षांपूर्वीचा असाच एक प्रसंग मला आठवतो. श्री. रमेशचंद्र ढमाले हे त्या वेळेला पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष होते. हवेली तालुक्यात मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली होती. पिके तर उध्वस्त झालीच होती पण असंख्य कोंबड्या, शेळ्या-मेंढ्याही मेल्या होत्या. पवार साहेब विरोधी पक्षनेते होते. सुशीलकुमार शिंदे अर्थमंत्री होते. १ जानेवारी हा. दै. सकाळचा वर्धापनदिन. त्याच्या चहापान समारंभाला साहेब आले होते. तिथेच त्यांची भेट घेऊन मी त्यांना गारपीटीने झालेल्या नुकसानीची माहिती दिली व मी प्रत्यक्ष बघून आल्याचेही सांगितले. साहेब तात्काळ मला म्हणाले, "तू उद्या पहाटे सहा वाजता सर्किट हाऊसला ये." थंडीचे दिवस होते. मी बरोबर सहा वाजता सर्किट हाऊसला पोहोचलो आणि दरवाज्यावर टकटक केले. शिपाई माझी वाटच पाहात होता. साहेब सर्व आटोपून खुर्चीत पेपर वाचत बसले होते. तपकिती



रंगाची शाल मांडीवर पसरलेली होती. समोर वर्तमानपत्रांचा गठ्ठा होता. शिपायाला त्यांनी मला चहा देण्यास सांगितले आणि गारपिटीच्या नुकसानीची माहिती विचारण्यास सुरुवात केली. जवळपास अर्धा पाऊण तासात माहिती घेऊन झाल्यावर त्यांनी ऑपरेटरला सुशीलकुमार शिंदे यांना फोन लावा असे सांगितले. अजून सकाळचे सातही वाजले नव्हते. शिंदे साहेब उठलेले नसणार याची त्यांना पूर्ण कल्पना होती. तरी देखील ते म्हणाले, "नुकसानीची पाहणी करायला जाण्यापूर्वी अर्थमंत्र्यांशी आधी बोललेलं बरं." शिंदे साहेबांना त्यांनी झोपेतूनच उठविले. गारपीटीने झालेल्या नुकसानीची माहिती दिली आणि एका शेळी व बकऱ्याला सरकार १०० रुपये नुकसान भरपाई देतं हे काही बरोबर नाही. ही रक्कम तुम्ही ५००, १००० रुपये तरी केली पाहिजे असे त्यांनी सांगितले. दोघांचे जवळपास २० मिनिटे बोलणे झाले. आता मी प्रत्यक्ष नुकसानीच्या ठिकाणी जातो आहे. ते पाहून आल्यावर रात्री पुन्हा बोलेन असे म्हणून फोन ठेवला आणि पाहणीच्या कामासाठी साहेब बाहेर पडले. मलाही त्यांनी स्वतःच्याच गाडीत घेतले. पेरणे, वाडेबोल्हाईचा तो परिसर असेल तिथे रस्ते चांगले नसल्यामुळे कार जाऊ शकत नव्हती. जवळच एक टेम्पो उभा होता. साहेब स्वतःच टेम्पो चालवायला बसले. मला शेजारी बसण्याची खूण केल्यामुळे पुढच्या सीटवर मीही जाऊन बसलो. साहेब भरधाव वेगाने टेम्पो चालवित होते. रस्त्यातले खड्डे, दगडे, खडक यामुळे आम्ही उडून डोकी गाडीच्या छताला लागत होती. जरा हळू, जरा हळू, काय विमान चालवता का? असे आम्ही म्हणत होतो. पण ते म्हणाले, "गाडी हळू चालवायला मला जमतच नाही." राज्य आणि देशाच्या विकासाची गाडी ज्या वेगाने त्यांनी चालविली हे पाहिल्यावर त्यांच्या वरील विधानाची सत्यता पटल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या हा टेम्पो चालविण्याचा प्रसंग मी तरी आयुष्यभर कधी विसरु शकणार नाही. दौरा संपून परत पुण्याच्या सर्किट हाऊसला आल्यावर त्यांनी सुशीलकुमार शिंदे यांना 'उद्या तुम्ही मुंबईत असाल तर भेटायला येतो. मदतीसाठी धोरणात्मक निर्णय करावा लागणार आहे. लोकांचे मोठे नुकसान झाले आहे." असे सांगितले.

आता हा प्रसंग वाचल्यावर क्षणभर आपल्याला हसायला येईल. शंभर रू. नुकसान भरपाई म्हणजे किती किरकोळ. माणसे मेली तरी आज बऱ्याचदा कुणी जात नाही आणि पवार साहेब तर मेलेल्या कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या बघायला गेले. यातून कार्यकर्त्यांनी काय बोध घेतला पाहिजे. असहाय दुःखितांचे जीवन सुसह्य करण्यासाठी विधात्याने आपल्याला जणू हे नेतेपदाचे, कार्यकर्त्याचे पद वरदान दिले आहे. केवळ स्वतःसाठी जगण्यापेक्षा संकटात सापडलेल्या व रंजल्या गांजल्या जीवांसाठी जगण्यातच खरे स्वारस्य आहे. अहं-ममतेची शृंखला तोडता आली, तरच मुक्त मनाला एवढी झेप घेता येणे शक्य आहे. श्वासोच्छंवासागणिक 'अहं'चेच स्फुरण न जाणवता 'सो--हं' चे प्रेमस्पंदन जाणवले पाहिजे. असे घडले तर या साडेतीन हात देहातील तुरुंगवास संपून आपण व्यापक जगात मोकळेपणाने समरस होऊ शकू. वैय्यक्तिक सुख-दुःखाच्या खवळलेल्या सागरात गटांगळ्या न खाता आनंदाने विहरण्यासाठी आपल्या वास्तव स्वरूपाचे अनुसंधानच आवश्यक आहे. ज्ञानेश्वरीत एक फार सुंदर ओवी आहे. -

**या देहाचिया बांदोडी न पडिजे ।**
**सुखदुःखाचिया सागरी न बुडिजे ।**
**सुखें सुखरूपा घडिजे ।**
**माझियाचि आंगा ॥** ९.४०६

पवार साहेबांचा विचार, काम, कृती, निर्णय आणि दूरदृष्टी हे सर्वात्मकाचे प्रतिक आहे. सर्वात्मकाशी समरस होऊनच सुखरूप होता येते. याचा अनुभव त्यांनी स्वतः असंख्य वेळा घेतला आहेच पण इतरांनाही अनेकवेळा दिला आहे. देहाच्या तुरुंगातून बाहेर पडल्याशिवाय ही सुखरूपता संभवत नाही. तुरूंगात कुणीही 'सुखरुप' असू शकत नाही. मोकळ्या व्यापकतेतच सुखरुपता संभवते. या विमुक्ततेतील संकुचित जाणिवेत न होता 'सो--हं'च्या अनुसंधानात पडणे आवश्यक आहे.

काम करीत असताना कार्यकर्त्यांनी आणखीन एक गोष्ट पवार साहेबांकडून शिकण्यासारखी आहे. ती म्हणजे आपण करीत असलेली विहित कर्मे प्रामाणिक निष्ठेने आचरताना कर्तृत्वाभिमान व फलाभिलाषा यांच्या पाशातून मुक्त होऊन खऱ्या अर्थाने 'न मम' म्हणणेच हितकारक आहे. हातून घडलेली सर्व कर्मे स्वच्छ धुवून -त्यातील अभिमान-अभिलाषेचा मळ घालवून ती सर्वात्मकाला समर्पण करणे हाच कर्मबंधनातून सुटण्याचा राजमार्ग आहे. हे समर्पण असे सहजपणे घडावे की त्याची आठवणही उरु नये. बऱ्याच नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना हे कठिण वाटण्याचा संभव आहे. कारण केलेल्या कामाचा डांगोरा पिटून श्रेयवादाच्या माळा गळ्यात घालून घेण्याच्या लालसेने ते आसुसलेले असतात. पवार साहेब रोज कितीतरी लोकांचे काम करतात. आजपर्यंत लाखो लोकांची कामे त्यांनी केली असतील पण त्याबद्दल कधीही ते स्वतः 'मी' पणाचा डांगोरा पिटत नाहीत. फार वर्षांनी कधीतरी भाषणातून एखाद्या समारंभात आठवणच निघाली तर अनायासे तो किस्सा ऐकायला मिळतो. पण उठल्याबसल्या मी मी चा पाढा ते

वाचत नाहीत. ही फार दुर्मिळ गोष्ट आहे. गेल्या ३५ वर्षांच्या पत्रकारितेच्या काळात मी अनेक नेते, पुढारी व लोक असे पाहिले व अनुभवले आहेत की शेवटपर्यंत त्यांचा 'मी' चालूच राहिला. शरद पवार या सर्वांपासून वेगळे आहेत हेच त्यांचे वैशिष्ट्य आहे. सहज आठवले म्हणून एक उदाहरण सांगतो.

श्रीनिवास पाटील हे खासदार असताना ६ गुरूद्वारा रकाबगंज रोड येथे राहात होते. पूर्वी ते पवार साहेबांचे निवासस्थान होते. मी त्या दिवशी दिल्लीला त्यांच्या बंगल्यात उतरलो होतो. सायंकाळी चारच्या सुमारास बीव्हीजेचे हणमंत गायकवाड यांचा संदर्भ देऊन आर. के. त्यागी या नावाच्या माणसाचा मला फोन आला. मी त्यांना ओळखत नव्हतो. ते म्हणाले, "एक महिन्यापूर्वी माझी पवनहंस हेलिकॉप्टर कंपनीच्या एम. डी. पदासाठी मुलाखत झाली आहे. मी ओएनजीसीमध्ये सध्या जनरल मॅनेजर आहे. कलकत्याच्या सीपीडब्ल्यूडी मधील एक मुख्य अभियंता या एम.डी. पदाच्या रेसमध्ये आहे. त्याने सर्व प्रकारच्या क्लृप्त्या चालविल्या आहेत. पण अजून कोणाचीच नेमणूक होत नाही. फाईल मंत्रीमहोदय श्री. प्रफुल पटेल यांच्याकडे पडून आहे. पवार साहेबांना तुम्ही जर का सांगितले तर निर्णय लवकर होऊ शकेल. मी लगेच साहेबांना फोन केला. ते दिल्लीतच घरी होते. संध्याकाळी साडेसहाला त्यांना घेऊन ये म्हणाले. साहेबांनी २० मिनिटे श्री. त्यागी यांची मुलाखत घेतली. पवनहंस कंपनी तोट्यात होती. जवळपास बंद पडण्याच्या मार्गावरच होती. उद्योग-व्यवसायात साहेबांची स्वतःची एक दृष्टी आहे. अनेकजण म्हणतात पवार साहेब राजकारणात पडले नसते तर फार मोठे उद्योजक झाले असते. असो. नियतीच्या मनात जे असते तेच घडते. या राष्ट्राची व समाजाची आणि मुख्यत्वे शेती व शेतकऱ्यांची उन्नती व सेवा पवार साहेबांच्या हातूनच व्हावी हा नियतीचा संकेत असावा म्हणूनच त्यांना या कामाची जबाबदारी दिली गेली असावी. अर्थात कृषिमंत्रीपदाचा कार्यभार त्यांनी स्वतःहून मागून घेतला हा ही नियतीच्याच संकेतातला एक भाग आहे. साहेबांनी श्री. त्यागी यांना पवनहंस कंपनी आर्थिक संकटातून कशी बाहेर काढणार, कंपनीचा कार्यविस्तार कसा करणार, ग्राहकांना सेवा कशी देणार, कंपनी विस्ताराचा तुमचा प्लॅन काय यासह अनेक प्रश्न विचारले. बोलणे संपल्यानंतर साहेब मला म्हणाले, "उद्या सकाळी १० वाजता यांना घेऊन तू प्रफुल पटेल यांच्याकडे जा. रात्री फोनवरुन मी त्यांच्याशी बोलतो." श्री. त्यागी यांनी कंपनीच्या भविष्यातील कामकाजासंबंधी जो काही विचार केला होता तो साहेबांना मनोमन पसंत पडला असावा. म्हणूनच त्यांनी पटेल यांना फोन करण्याचा निर्णय केला. त्यांच्या मुलाखतीच्या परीक्षेत त्यागी नापास झाले असते तर त्यांनी हे काम करायचे टाळले असते किंवा त्याबाबत आडवळणाने का होईना नकार दिला असता. पवार साहेबांच्या सकारात्मक भूमिकेमुळे दोन दिवसातच फाईलवर



सही झाली आणि त्यागी हे पवनहंस कंपनीचे एम. डी. झाले. एक रुपयाही खर्च न करता त्यागी यांना हे पद मिळाले. त्यांनी कंपनी चांगली वाढविली. फायद्यात आणली. त्यांचे हे काम बघून पुढे त्यांना बेंगलोरच्या हिंदुस्थान एरोनॉटिक्सचे एम. डी. करण्यात आले. चांगले काम करणारी माणसे साहेबांना नेहमीच मनापासून आवडतात. त्यांचे म्हणणे ते व्यवस्थितपणे ऐकून घेतात आणि विश्वास व शाबासकीची थाप त्यांच्या पाठीवर टाकल्याशिवाय राहातच नाहीत. त्यागी काही वर्षांनी सेवानिवृत्त झाले. पण आजही जेव्हा खुशाली विचारण्यासाठी दिल्लीहून फोन येतो तेव्हा ते आवर्जून एक वाक्य उच्चारतात, "पवार साहेब इज ए ऑस्पिशियस (पवित्र) मॅन." यापेक्षा आणखीन कोणत्या शब्दात साहेबांचा गौरव केला पाहिजे ? देवाला आपण पवित्र मानतो. त्या पावित्र्याची उपमा साहेबांना मिळावी यातच त्यांच्या निरपेक्ष, निस्वार्थ व प्रामाणिक वृत्तीने केलेल्या कार्याचे सार आले.

विहित कर्म हे व्यक्तिगत जीवनातील ओलावा तर आहेच, पण या वैय्यक्तिक दृष्टीकोणाबरोबरच विहित कर्मांकडे सामाजिक दृष्टीकोनातूनही पाहणे अगत्याचे आहे आणि याबाबतची साहेबांची दृष्टी अतिशय सजग व सावध असते याचा अनुभव माझ्यासह अनेकांनी घेतलेला आहे. आपल्या जीवनात ओलावा निर्माण करणाऱ्या कार्यानेच समाजाची व दीन दुःखितांची परमसेवा करता येते अशी गाढ श्रद्धा असलेल्या साहेबांना जनतेची नाडी अचूक समजली आहे. वैद्य नाडीवरुनच रोगाचे निदान करतो. अचूक निदान झाले तरच त्यावरचा उपायही अचूक ठरु शकतो. महाराष्ट्रात किंवा देशात कोणताही प्रश्न वा समस्या निर्माण झाली की सारेजण पवार साहेब याबाबत कसा विचार करताहेत, त्यांच्याकडे काय उत्तर आहे याची आवर्जून चौकशी करतात आणि त्यांचा सल्ला मागतात. सर्व प्रश्नांवरचे रामबाण उत्तर साहेबांकडूनच मिळू शकते असा विश्वास स्वकीय तर सोडाच पण विरोधकांनाही वाटतो. यातच साहेबांच्या कर्मनिष्ठेचा महान गौरव आहे. तो पद्म पुरस्कारापेक्षाही अधिक श्रेष्ठ आहे असे मला वाटते. विहित कर्म करताना ते सर्वात्मकाचे मनोगत तर ओळखतातच पण 'विहित क्रिया केली, नव्हे तयाची खूण पाहिली' (१८.९१४) यासारखे वागतात. अशा व्यापक दृष्टीने कर्मानुष्ठान घडले, की कोणतेच कर्म उच्च किंवा नीच वाटत नाही. सर्व प्रकारचे भेदभाव पुसट होऊ लागतात. सर्व स्तरांवरील व्यक्ती एकाच सर्वात्मक समाजपुरुषाचे अंश असल्याचे उमजू लागते. आपले कार्य निष्ठेने व सद्‌भावाने आचरण्यापलीकडे इतर फालतू उठाठेवीत रस वाटेनासा होतो. व्यापक दृष्टीमुळे वैय्यक्तिक स्वार्थाच्या कल्पनेचाही मनस्वी उबग वाटू लागतो. स्वार्थाची जळमटे जाळणारा 'वैराग्य महापावक' अंतरंगात प्रज्वलित होतो. ऐहिक उपभोगांविषयीची आसक्ती समूळ नष्ट होऊ लागते याचा अनुभव स्वतः पवार साहेबांना अनेकदा काय रोजच येत असेल हे आमच्यासारख्या बाहेरून तटस्थपणे पाहणाऱ्यांना सहजपणे जाणवते.

सभोवतालच्या सृष्टीशी व समाजाशी सद्‌भावाने समरस होऊन स्वतःभोवती स्वार्थाच्या भिंती न उभारल्यामुळेच साहेब आपल्या 'सहज' आनंदाचा मनमुराद आस्वाद घेऊ शकले आहेत. स्वार्थाच्या भिंती प्रेमानेच ढासळतात. आपण दुसऱ्यावर प्रेम करतो, तेव्हा आपोआपच आपला स्वार्थ ढेपाळू लागतो; द्वैत विरु लागतो. एका देहापुरते मर्यादित न राहता समाजाच्या देहांत सहसंवेदनेने नांदू लागतो. प्रेमानेच सर्व बंधने तुटून व्यापकता अनुभवता येते. या विमुक्ततेतच निर्भेळ आनंद लाभतो. हा आनंद पवार साहेबांना नित्य मिळतो हे त्यांचे सद्‌भाग्य आहे. ते लाभण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य चंदनासारखे झिजविले आहे. दिवसरात्र काहीही न पाहता अविश्रांत मेहनत केली आहे. आपली आई शारदाबाई आणि गुरु यशवंतराव चव्हाण यांनी मनात पेटविलेला विचारांचा दिवा अखंडपणे तेवत ठेवला आहे. विचारांचे बाळकडू अनेकांना मिळते. पण त्या बाळकडूचे अमृतात रुपांतर करणे फार थोड्यांना जमते. प्रवृत्ति-निवृत्तीची ओझी उतरल्यावर लाभणारी सहजता ही फार श्रेष्ठ असते. पवार साहेब, विहित कर्म समर्पण वृत्तीने आचरून सर्वात्मकाचा 'बरवा याज्ञिक' झाले ही केवढी उच्च पातळी आहे. तिचे वर्णन करायला शब्द अपुरे पडतात. चिंतनही कुंठित होते. अशी दिव्य कर्माची पातळी त्यांनी सहस्त्रचंद्रदर्शनाच्या आधीच गाठली आहे. वैय्यक्तिक व सामूहिक जीवनाचा समन्वय साधणारा उन्नत विधायक दृष्टीकोन साहेबांच्या कार्यात पूर्णपणे उमटला आहे. त्यामुळेच त्यांच्या जीवनाचा आशय उमजून घेणे हे आपल्या कार्यकर्त्यांसाठी आत्मोन्नतिकारक आहे. स्वतःचे विहित कर्म आस्थेने व प्रामाणिकपणाने आचरले असता. स्वतःला तर आनंद मिळतोच; पण आपण ज्या समाजाचे घटक असतो, त्याचीही प्रगती होत असते. शेतकऱ्याने आपले कृषिकर्म निष्ठेने आचरले असता धनधान्यादी लाभातून त्याला मिळणाऱ्या आनंदाएवढीच सर्वांच्या अन्नधान्यविषयक गरजा भागून समाजाला प्राप्त होणारी आत्मनिर्भरताही महत्त्वाची आहे. ही आत्मनिर्भरताही पवार साहेबांनी कृषिमंत्री असताना केलेल्या भरीव कामामुळेच आपण गाठू शकलो आहोत. दुसरी हरितक्रांती देशात यशस्वी करुन त्यांनी एका खड्यात दोन पक्षी मारले. देशाची अन्नधान्याची



स्वयंपूर्णता निर्माण केलीच पण शेतकऱ्याची आर्थिक उन्नतीही तितकीच महत्वाची आहे असे ठळकपणे अधोरेखित करुन सांगितले. त्यामुळेच भारताला त्यावेळी आर्थिक मंदीची झळ पोहचू शकली नाही.

राष्ट्राच्या उन्नतीचाच ध्यास घेतलेल्या शरदरावांनी आयुष्यभर जीवनमूल्यांची जोपासना केली. शेती, शिक्षण आणि शील या तीन शकारांनी शरदराव घडले आहेत. उद्योगाच्या नव्या दृष्टीने शरदरावांना जागतिक व्यापार परिषदेत महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. नव्याचा ध्यास आणि योग्य निवड हे त्यांच्या स्वभावात आहे. ते उगाचच कुणाच्याही आहारी जात नाहीत. मनाला योग्य वाटेल तेच करतात. इतरांच्या मनाला उभारी देतात. अनेकांचे पालक होतात. त्यांचा संवादाचा श्वास आजही ताजा आहे. त्यांना पाहून थकवा दूर पळतो. गंभीर दुखण्याशी सुद्धा ते संवाद करतात. त्यातून बरे होतात आणि पुन्हा कामाला लागतात. ही शरदरावांची उर्मी विलक्षण आहे. त्यांचा कामाचा झपाटा आवाक् करणारा आहे. ते तेच करू जाणे. या साऱ्याचा अर्थ एकच आहे. संस्काराचे भान यथार्थ राखून शरदरावांनी आपले आयुष्य ज्या राष्ट्रकार्यार्थ घडविले ते कार्य ते आजही मनापासून जोमाने करतायेत. सत्तेत राहूनच माणसाला सारे काही करता येते असे नाही. मैत्रीची सत्ता ही शासकीय सत्तेपेक्षा फार मोठी व महत्त्वाची आहे. ती त्यांनी कसोशीने कमविली आहे. म्हणूनच आजही शरदराव अनेकांना आधार वाटतात. प्रतिभाताई माहेर वाटतात. असे हे उत्कृष्ट कार्य करणारे शरदराव आज सहस्रचंद्र दर्शनाच्या दारात उभे आहेत. त्यांचे हे शाब्दिक औक्षण करताना एवढेच वाटते, 'उद्याचा महाराष्ट्र दैदिप्यमान होण्याची पहाट उजाडते आहे. शरदराव, तुमच्या कार्याला आणि चिंतनाला उद्याची प्रसन्न पहाट मिळो, तुमच्या अभ्यासाच्या कक्षा सूर्यकिरणांइतक्या वाढो, तुमचे आकाश आम्हांला अधिक मिळो', ही अपेक्षा व्यक्त करतो आणि वाढदिवसाच्या निमित्ताने तुम्हांला हार्दिक शुभेच्छा देऊन हात जोडून एवढेच म्हणतो तुमच्या नवनव्या प्रकल्पाला व विचारांना उत्तम दिवस येवोत. या साऱ्यातून तुम्हांला आगळे सामर्थ्य लाभो. तुम्हांला मनापासून नमस्कार करतो आणि एवढंच म्हणतो...

**मोदाम शरदः शतम् ।।**

**(अर्थ : आनंदाने शंभर वर्ष जगा)**



“रावसाहेब दानवे हे खेड्यापाड्यात, शेतकऱ्यांच्यात काम करणारे एक सहकारी म्हणून मी त्यांच्याकडे बघत होतो. उद्याच चित्र आणि भविष्य सांगण्यासंबंधीचा त्यांचा अभ्यास आहे हे मला माहित नव्हते. ज्योतिषशास्त्राचे जाणकार म्हणून आता त्यांनी परिचय करून दिला आहे. पण सामान्य माणूस बरोबर असल्यानंतर असल्या कुडमुड्या ज्योतिष्याचं काही चालत नाही.”



श्री. जयसिंगराव गायकवाड यांच्या राष्ट्रवादीतील पक्षप्रवेक्षानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदराव पवार यांची मुंबईतील राष्ट्रवादी भवनात पत्रकार परिषद झाली. या परिषदेत त्यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नांना दिलेली उत्तरे येथे थोडक्यात देत आहोत.

**प्रश्न : राज्यातल्या सरकारला एक वर्ष पूर्ण होतंय. सरकारवर अनेक संकटांच्या मालिका येत आहेत. रावसाहेब दानवे काल म्हणाले, की आमचं सरकार येणार आहे. प्रताप सरनाईकांवरही आज ईडीची धाड पडली आहे. अजून चर्चा आहे. पृथ्वीराज चव्हाणांनाही आयटीची नोटीस गेली आहे. या सगळ्या गोष्टींकडे कशा पद्धतीने बघता.**

**पवार साहेब :** असं आहे, की महाराष्ट्रामध्ये आज जे आघाडीचे सरकार चालू आहे, त्याला सर्वसामान्यांचा ज्या पद्धतीनं पाठिंबा मिळतोय तो पाठिंबा मिळाल्याच्यानंतर जे नैराश्यवादी आहेत समोरच्या बाजूचे, त्या नैराश्याचं हे सगळं



# विरोधक नैराश्यात

## शरद पवार यांचे उद्गार

प्रतिक आहे. आपल्याला सत्ता मिळणार नाही आणि त्यासंबंधीची अस्वस्थता आणि संताप जो आहे, तो आज या माध्यमातून व्यक्त केला जातोय. आपण दानवेंचा प्रश्न विचारला. दानवे हे अनेक वर्षे विधिमंडळामध्ये, संसदेत काम केलेले आहेत. पण ठीक आहे. आता मला त्यांचा हा गुण माहित नव्हता, की खेड्यापाड्यात शेतकऱ्यांच्यात काम करणारा एक सहकारी म्हणून आम्ही त्यांना बघत होतो. पण उद्याचं सुद्धा चित्र सांगण्यासंबंधीचा त्यांचा अभ्यास आणि तयारी ही मलासुद्धा माहित नव्हती आणि त्यामुळं त्यांनी सांगितलं, की असं होईल, तसं होईल. ज्योतिषशास्त्राचा जाणकार म्हणून त्यांचा परिचय नव्हता. पण तो परिचय त्यांनी करून दिला आहे. पण सामान्य माणूस बरोबर असल्याच्यानंतर कुडमुड्या

> “शिवसेनेच्या आमदारांवर होत असलेली ‘ईडी’ ची कारवाई हा सत्तेचा गैरवापर आहे. आपल्या विचाराशी जे लोक सहमत नाहीत त्यांच्याविरुद्ध सत्ता वापरायची ही नवीनच पद्धत सुरू झालेली दिसते आहे.”

# विहंग सरनाईक ईडीच्या ताब्यात

प्रताप व विहंग सरनाईक यांच्यावर 'ईडी'ने केलेली कारवाई







ज्योतिषाचं काय चालत नाही.

**प्रश्न : देवेंद्र फडणवीस असं म्हणालेत, की हे सरकार बेईमानीनं भरलेलं आहे. खरा जनादेश आम्हाला होता.**

**पवार साहेब :** असं आहे, की सत्ता गेल्याच्यानंतर त्रास होतो. मी समजू शकतो आणि त्या त्रासाच्या पोटी, उद्वेगाच्या पोटी अशा प्रकारचे शब्द हे जनरली न वापरणारेसुद्धा वापरावे लागतात. ते आपण फार गांभीर्याने घेऊ नयेत. त्याचं कारण, त्यांची सत्ता गेली त्याची ही अस्वस्थता आहे.

**प्रश्न : त्यांना अजूनही अपेक्षा आहे, की आपण पुन्हा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेऊ. आज त्यांनी म्हटलंय, की यापूर्वी पहाटेचा शपथविधी झाला. पण आता मी दिवसाचा शपथविधी घेईन असं ते म्हणतात. म्हणजे अजूनही त्यांना आशा आहे, की ते शपथविधी घेतील.**

**पवार साहेब :** साहजिकच माणसानं आशा ठेवावी. त्याच्याबद्दल काय वाद नाही. कारण त्यांनी मागेही सांगितलंच होतं, की मी पुन्हा येईन, पुन्हा येईन, पुन्हा येईन. कालही त्यांनी असंच काहीतरी सांगितलं. आता माझ्या लक्षात नाही. पण ठीक आहे. लोक त्याच्याकडं




**सायरस व आदर पूनावाला हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लस तयार करण्याची प्रयोगशाळा दाखवून कोविड व्हायरसला प्रतिबंध करणाऱ्या लस निर्मितीची माहिती देताना.**

बारकाईनं लक्ष देतात. अशी भावना जर त्यांच्यात असेल तर आपण खबरदारी घेतली पाहिजे. हे लोकांच्या अधिक लक्षात येतं.

**प्रश्न : पवार साहेब, शिवसेनेच्या आमदारांवर ईडीची कारवाई होतेय.**

**पवार साहेब :** मी स्वच्छ सांगितलं, की त्याच्यामध्ये सत्तेचा गैरवापर. आपल्या विचाराशी जे लोक सहमत नाहीत,





त्यांच्याविरूद्ध सत्ता वापरायची, ही पद्धत याठिकाणी सुरू झालेली आहे. याच्यापेक्षा दुसरं काही नाही.

**प्रश्न : चंद्रकांत पाटील ज्या पद्धतीनं म्हणतायंत, की फक्त चार आमदारांचेच तुम्ही नेते आहात.**

**पवार साहेब :** असं आहे की, महाराष्ट्र ज्यांची गंभीरपणे नोंद घेतं अशांविषयी प्रश्न विचारा. काही काय प्रश्न विचारता.

**प्रश्न : कोविडच्या संदर्भात व्हॅक्सिन हे सोल्यूशन होऊ शकतं का?**

**पवार साहेब :** कोविडच्या लसीसंदर्भात प्रगती काय आहे, याची कल्पना काल-परवा मला जी इन्स्टिट्यूट आहे त्याचे प्रमुख माझ्याकडे होते, त्यांनी सविस्तर दिलेली आहे. त्यांचे अखंड प्रयत्न आहेत, की लवकरात लवकर ही लस उपलब्ध करून द्यावी. रास्त किंमतीमध्ये ती लस उपलब्ध करून द्यावी आणि महाराष्ट्राला, महाराष्ट्राच्या आणि संबंध देशाच्या बाहेरसुद्धा या संकटातून लोकांना बाहेर काढण्याच्यासाठी हातभार लावावा आणि म्हणून मला आनंद आहे, की त्यांचे जे प्रयत्न आहेत, आज माझ्या वाचनात आलं, की या देशातले, परदेशातले बरेचसे अभ्यासक पाहणी करण्यासाठी पुण्याला जातायंत. प्रधानमंत्री सुद्धा जाण्याची शक्यता आहे. चांगली गोष्ट आहे. सायंटिस्ट जे चांगलं काम करतायंत, त्यांना प्रोत्साहन मिळेल. दोन-तीन वर्षाच्या पूर्वी इथं काय काम चाललंय, हे दाखवण्याच्यासाठी मी स्वत: प्रधानमंत्र्यांना तिथं घेऊन गेलो होतो आणि आज या संस्थेची उपयुक्तता याची नोंद राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाते याचं समाधान आहे.

**प्रश्न : कोरोनावर राजकारण होतंय आणि आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी पंतप्रधानांना सांगितलं, की जे पक्ष राजकारण करतायंत त्यांना तुम्ही सूचना केली पाहिजे, की कोरोनावर राजकारण होऊ नये. प्रामुख्यानं महाराष्ट्रात मंदिरं उघडण्यावरून भाजपानं ज्या आक्रमक पद्धतीनं आंदोलन केलं होतं आणि आता केसेस वाढतायंत कोरोनाच्या.**



**पवार साहेब :** असं आहे, की खरं म्हटलं तर मंदिर उघडण्याच्या प्रश्नावर जे काय केलं गेलं, मी त्याच्याबद्दल भाष्य केलं नाही. पण ज्यावेळी एवढं मोठं संकट संपूर्ण मानवी समाजावर येतं, त्यावेळेला असं क्षुद्र राजकारण करणं हे योग्य नसतं. पण ठीक आहे. निराशा ही माणसाला स्वस्थ बसू देत नाही.



बीड जिल्ह्यातील भाजपचे ज्येष्ठ नेते श्री. जयसिंगराव गायकवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरद पवार साहेबांच्या उपस्थितीत नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पक्षप्रवेश केला. त्यानिमित्त मुंबईतील राष्ट्रवादी भवनात झालेल्या प्रवेश समारंभप्रसंगी श्री. शरद पवार यांनी केलेले हे भाषण व या समारंभाचा संक्षिप्त वृत्तांत येथे देत आहोत.

आज आपण एका छोट्याशा, पण चांगल्या कार्यक्रमाच्या निमित्तानं याठिकाणी एकत्रित जमलो आहे. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये गेली ३०-३५ वर्षे मी बघतोय, की मराठवाड्यामध्ये, बीड जिल्ह्यामध्ये सामान्य माणसाशी बांधिलकी ठेवणारा एक आगळावेगळा आचारधर्म पाळणारा सहकारी आज पुन्हा आपल्या सगळ्यांच्यामध्ये काम करण्याच्यासाठी येतोय. जयसिंगराव हे बीड जिल्ह्यातले, बीड जिल्ह्यातला धारूर तालुका हा तसा एका दृष्टिनं दुष्काळाला तोंड देणारा तालुका. धारूर तालुक्यामध्ये जन्माला आले. वाढले. पण आयुष्याचा फार मोठा कालखंड औरंगाबादमध्ये घालवला आणि औरंगाबादमध्ये हा कालखंड घालवत असताना सार्वजनिक जीवनामध्ये एक आदर्शवत आचरण कसं ठेवावं यासंबंधीचा एक प्रघात त्यांनी आपल्या सगळ्यांच्यासमोर ठेवला.

एका वेगळ्या विचारांच्या रस्त्याने ते गेले. विधिमंडळातही काम केलं, संसदेत काम केलं आणि काही गोष्टींच्यामुळं कदाचित पुन्हा एकदा ते जुन्या रस्त्यावर जावं अशा प्रकारची भावना त्यांच्या मनामध्ये गेली. त्यांचं मन त्याठिकाणी रमलेलं नव्हतं हे नक्की. त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे जयसिंगरावांचं वैशिष्ट्य हे आहे की शेवटच्या माणसाबरोबर अखंडपणानं राहायचं. ज्याचा उल्लेख सुरूवातीला याठिकाणी केला गेला की महाराष्ट्रामध्ये कदाचित



# राष्ट्रवादीचा प्रत्येक कार्यकर्ता लोकांच्या भल्यासाठी काम करणारा

## शरद पवार

किंवा देशामध्ये कदाचित एकच खासदार असा असेल, की तो संसदेत निवडून आल्याच्यानंतर स्वतःच्या घरी कधी रहायला गेला नाही. अखंडपणानं जिल्ह्यामध्ये, स्वतःच्या मतदारसंघामध्ये फिरत, गावागावामध्ये, सगळ्या स्तरातल्या लोकांशी संपर्क ठेवला. मुक्कामाची वेळ आली, की एखाद्या देवळात मुक्काम कर, कुणाच्या तरी घरी मुक्काम कर, कधी चावडीवर मुक्काम कर, पण स्वतःच्या घरी फारसे गेले नाहीत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत सामान्य माणसाची सुख-दुःखे समजून घेण्याच्यासाठी आपला वेळ देणारा आणि त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्यासाठी खबरदारी घेणारा एवढं एकच काम त्यांनी अनेक वर्षे केलं.

त्यांना सत्तेची पदं मिळाली. पण जमिनीवरील पाय कधी बाजूला गेले नाहीत. सत्तेचा दर्प हा कधी त्यांच्या जीवनामध्ये आपल्याला कुणालाही बघायला मिळाला नाही. सत्ता ही विनम्रतेनं सांभाळायची असते आणि अशी विनम्र सत्ता अधिक शोभिवंत दिसते. या प्रकारचा आदर्श जयसिंगरावांनी आपल्या उभ्या आयुष्यामध्ये ठेवला. म्हणून राष्ट्रवादीच्या कुटुंबामध्ये पुन्हा एकदा आपल्या कुटुंबातला एक घटक याठिकाणी येतोय, याचा आनंद बीड जिल्ह्यातल्या कार्यकर्त्यांना तर आहेच, पण महाराष्ट्रातल्या प्रत्येक कार्यकर्त्याला मनापासून हा आनंद झालांय. त्यामुळं त्यांचं स्वागत अतिशय आनंदानं आपण सगळेजण



याठिकाणी करतो आहोत.

आजचं एक चित्र राज्यातलं, देशातलं की कशा पद्धतीनं आईची जाण आपल्याला आहे. महाराष्ट्रामध्ये एक वेगळ्या पद्धतीनं राज्य चालवायचा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, काँग्रेस आणि शिवसेना यांनी संयुक्तपणानं सुरू केला. लोकांशी बांधिलकी ठेवण्याची भूमिका या पक्षांच्या साऱ्या सहकाऱ्यांची मनापासूनची आहे, हे आजच गेले जवळपास वर्ष झालं, महाराष्ट्रानं पाहिलं. या

> दिल्लीतल्या सत्तेचा वापर लोकांचे प्रश्न सोडवण्याच्याऐवजी विरोधकांना नाउमेद करण्यासाठी कसा केला जातो, हे आपल्याला आज शिवसेनेच्या एका विधानसभेच्या प्रतिनिधीच्या घरावर ईडीने जो छापा टाकला त्यावरून लक्षात आले असेल. केंद्र सरकारकडून सत्तेचा जो गैरवापर केला जातो आहे, अशाही स्थितीत राज्य समंजसपणानं चालवायचं ही गोष्ट तितकीशी सोपी नाही.



शरद पवार हे पुष्पगुच्छ देऊन जयसिंगराव गायकवाड यांचे स्वागत करताना. शेजारी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व राज्यंत्री संजय बनसोडे

सगळ्या कामामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रत्येक प्रतिनिधी हा सगळ्यांना बरोबर घेऊन राज्यातल्या सगळ्या घटकांच्या हिताची जपणूक करण्याची खबरदारी जनतेने आपल्यावर टाकलीय याचे भान ठेवून अखंडपणे आज या राज्यामध्ये काम करत आहे. संकटे आली. कधी अतिवृष्टी झाली. अन्य संकटे आली. पण त्या प्रत्येक संकटाच्या वेळेला आज या राज्याचं हे राज्य सरकार शेवटच्या माणसाच्या खांद्याला खांदा लाऊन त्याला उभं केलं,

त्याचा आत्मविश्वास वाढवला. त्याच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची आज ते खबरदारी घेत आहेत.

तसं राज्य चालवणं ही दिल्लीतली सत्ता आपल्या





विचाराची नसल्याच्यानंतर तेवढं सोपं नसतं. आजच वर्तमानपत्रामध्ये किंवा टेलिव्हिजनवर आपण बघितलं असेल, की दिल्लीतल्या सत्तेचा वापर लोकांचे प्रश्न सोडवण्याच्याऐवजी विरोधकांना नाउमेद कसं करायचं यासाठी वापरायची असते हे चित्र शिवसेनेच्या एका विधानसभेच्या प्रतिनिधीच्या बाबतीत आजच आपल्याला ऐकायला मिळालं, बघायला मिळालं. त्यामुळं विरोधकांची या पद्धतीनं सत्तेचा गैरवापर करायची भावना असलेल्यांची स्थिती असतानासुद्धा समंजसपणानं राज्य चालवायचं ही गोष्टी तितकीशी सोपी नाही. पण आजचं महाराष्ट्रातलं सरकार आणि त्यातील सर्व प्रतिनिधी आज त्या सगळ्या संकटांवर मात करून पुढं जाण्याच्या संबंधी आणि लोकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सातत्यानं प्रयत्न करतायंत आणि त्या प्रयत्न करणाऱ्यांना अनुभवी लोकांची, जनतेमध्ये ज्यांची पाळंमुळं सखोल आहेत अशांची, मार्गदर्शनाच्यासाठी आवश्यकता होती आणि या गोष्टींची परिपूर्ती करण्याच्यासाठी जयसिंगरावांचा पक्षप्रवेशासारखा एक राजकीय निर्णय आजच्या या आघाडीच्या सरकारलासुद्धा उपयुक्त ठरेल, याच्याबद्दल माझ्या मनामध्ये कोणत्याही प्रकारची शंका नाहीये. राज्याच्या दृष्टिनंसुद्धा आज त्यांचा हा निर्णय अतिशय महत्त्वाचा आहे.

एक संकट आहे संबंध देशावर. रोगराईच्या संदर्भातलं. आज त्या संकटातून आपण कधी बाहेर पडतो याची चिंता आपल्या सगळ्यांना आहे. त्या संकटाची सुरूवात होण्याच्या आधी प्रदेशाध्यक्ष आणि बाकीच्या सगळ्या सहकाऱ्यांनी मोठे

> **“ राज्यावर अनेक संकटे आली. कधी अतिवृष्टी झाली, कधी गारपीट झाली तर कधी भूकंप झाला, कधी दुष्काळ पडला, कधी वादळाने अतिवृष्टी होऊन पूरही आले, अशा सर्व संकटाच्या वेळेला राज्य सरकार शेवटच्या माणसाच्या खांद्याला खांदा लाऊन त्याच्या पाठिशी उभं राहिलं, त्याचा आत्मविश्वास वाढवला. त्याच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची आज ते खबरदारी घेत आहेत, ही माझ्या दृष्टीने अधिक चांगली व समाधानाची बाब आहे. ”**

मोठे कार्यक्रम आखले होते. महाराष्ट्राच्या गावागावामध्ये जाऊन संघटना मजबूत कशी करायची यादृष्टिने काही तयारी केली होती. पण कोरोनाच्या या संकटाच्यामुळं या सगळ्या गोष्टींना मर्यादा आलेल्या आहेत. पण ठीक आहे, यातनंही कधीतरी आपण बाहेर पडू आणि पुन्हा एकदा ताकदीनं शेवटच्या माणसाच्या भल्याच्यासाठी या संघटनेतला प्रत्येक पाईक प्रयत्नांची पराकाष्ठा करतोय, हे चित्र आपण या राज्यामध्ये दाखवू. याच्याबद्दल मला पूर्णपणानं विश्वास आहे. आज एक कुटुंब म्हणून आपण सर्वजण काम करतो आहोत, त्या कुटुंबामध्ये एक जाणकार, अनुभवी, विनम्रता हे ज्याचं वैशिष्ट्य आहे, असा एक सहकारी पुन्हा एकदा आपल्याबरोबर आलेत. आपल्या सगळ्यांच्यावतीनं याठिकाणी मी अंत:करणापासून त्यांचं स्वागत करतो आणि मला खात्री आहे, की बांधिलकीचं स्मरण ठेऊन ते प्रत्येक दिवसाचा उपयोग हा लोकांच्या भल्याच्यासाठी करतील आणि त्याचं स्वागत सामान्य माणूस हा अंत:करणापासून करेल अशा प्रकारची खात्री याठिकाणी व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.




# भाजपात चांगल्या कार्यकर्त्यांची वाळवण; मग पक्षात कोण राहिल?

## जयसिंगराव गायकवाड यांचा सवाल

१७ तारखेलाच मी भारतीय जनता पार्टीचा राजीनामा दिला आणि आज राष्ट्रवादीत प्रवेश करतो आहे. केला आहे. त्या पार्टीत कसा राहू? जिथं मान नाही, सन्मान नाही, कामाची कदर नाही, कामाचं कौतुक नाही. जी पार्टी चांगल्या चांगल्या कार्यकर्त्यांचं वाळवाण करते, त्या पार्टीत कोण राहील? मी गेली बारा वर्षे, आपल्याला सोडल्याचा पश्चाताप होतोय, परंतु, त्याचं आज मी पापक्षालन करतो आहे. माननीय नितीनजी गडकरी आमचे मित्र आहेत, त्यांच्या मोहात मी पडलो. आज त्यांचे काय हाल चालू आहेत, हेही तुम्हाला माहित आहेत. म्हणजे जसं काय खुँखार आतंकवाद्यांनी भारतीय जनता पार्टीचा ताबा घ्यावा, अशा प्रकारची परिस्थिती तिथं निर्माण झालेली आहे.

साहेब, मी आयुष्यात पहिल्यांदा शेतकऱ्यांवर जे भाषण ऐकलं ते उद्धवराव पाटलांचं ऐकलं. नाना पाटलांच्या सभेला जात असे म्हणून हेडमास्तर मरेपर्यंत मला मारत असत. कॉम्रेड मंडळींच्या टीममध्ये मी तयार झालो. त्यावेळी लहानच होतो. पण ते विचार माझ्या डोक्यात आहेत आणि त्या विचारांना थोडा कुठे वर आणायचा प्रयत्न केला की मन अस्वस्थ होतं. म्हणून अशा, जिथं कोंडमारा होतोय, अशा पार्टीत राहणं शक्य नाही म्हणून मी आज राष्ट्रवादीत प्रवेश केला आणि गोडाऊनमधून बाहेर आल्यानंतर जसा मोकळा श्वास घेतो आपण तसा मी आता मोकळा श्वास घेतोय.

कुणाकडं काम करायचं? १९७३साली गाव सोडून मी औरंगाबादला गेलोय, त्यावेळपासून मी औरंगाबाद जिल्ह्यात काम करतोय. आता काही लोकं म्हणतात, की इतकं दिलं, तितकं दिलं. मला १८ वर्षांनंतर लढायचा चान्स मिळाला साहेब. दीड तप या पार्टीची सेवा केली मी. माझ्याइतका पायी फिरणारा माणूस यांच्याकडं कुणी नाहीये. दीड तपानंतर आमचे मित्र वसंतराव काळे यांच्याविरूद्ध मला उभं केलं. मी निवडून आल्यानंतर पार्टी कार्यालयाला सांगितलं, की मी निवडून आलो. तर मला म्हणाले, की दारू पिला की काय. तु कसा काय निवडून येशील. म्हटलं, आलो बाबा, कसं काय माहित. निवडून तर आलो. तुमची इच्छा असो किंवा नसो. मनात म्हणलं. पण आलो निवडून. दुसरीही पदवीधर लढली. ३४ उमेदवार होते, त्याच्यातल्या ३३ उमेदवारांचं डिपॉझिट जप्त झालं आणि मी वीस हजार मतांच्या फरकानं निवडून आलो. हे रेकॉर्ड अजूनही कुणी तोडलेलं नाही. परंतु, आता मी ठरवलंय, की सतीश चव्हाणांना साथ द्यायची आणि ते



धनंजय मुंडे हे पुष्पगुच्छ देऊन जयसिंगराव गायकवाड यांचे स्वागत करताना, शेजारी संजय बनसोडे, आमदार संग्राम जगताप, शरद पवार व जयंत पाटील

रेकॉर्ड तोडून, वीस दुणे चाळीस हजार मतांच्या फरकांनी त्यांना निवडून आणायचं.

शेवटी साथ कुणाची द्यायची, कुणाची घ्यायची हा मोठा प्रश्न आहे.

एकीकडे मनमानी चाललीय. कामाचा पत्ता नाही. सगळं पोखरलं गेलंय. फक्त मी, मी, मी आणि मीच. अशा लोकांबरोबर रहायचं, ते काय विचार करणार आहेत? आणि काय विचार आहेत. स्वविचार आहे, कमाईचा विचार आहे. लोकांना तोडण्याचा विचार आहे. बदल्याच्या भावनेचा विचार आहे. अशा ठिकाणी कसं काम करायचं? एवढी वर्षे आम्ही काम केलंय. म्हणजे एक हाड पिचायचं बाकी राहिलेलं नाही, साहेब. इतकं पोलिसांनी मारलेलं आहे मला. पोलिस कस्टडी, मॅजिस्ट्रेट कस्टडी, दीड वर्षे आणीबाणीत. हे तर नव्हतेच कुणी साहेब. पण यांचे बापसुद्धा नव्हते कधी जेलमध्ये. बाप म्हणजे आदराने बोलतोय मी. दुसरं काय म्हणणार मी. वडीलच म्हणणार ना. आत्ता जे हे कुणी आहेत त्यांना विचारा की तुमच्या अंगाला कधी पोलिसांनी हात लावलांय का? तुम्हाला कधी मारहाण केलीय का? तुम्ही मोर्चा काढलांय का? उपोषण केलंय का? धरणं धरलंय का? कधी पोलिस कस्टडी बघितली, कधी मॅजिस्ट्रेट कस्टडी बघितली? काही नाही. आयत्या पिठावर रेघोट्या मारणारे.

आज मी आलोय. येणाऱ्यांची मालिका फार मोठी आहे साहेब. फार मोठी आहे. ते आता सगळं बाहेर येणार आहे. कारण जास्त दिवस माणूस मनाच्याविरूद्ध काम करू शकत नाही. म्हणून मी विचार केला, की यांच्याबरोबर रहायचं का सर्वधर्मपंथ आणि अठरा



> “जिथं मान नाही, सन्मान नाही, कामाची कदर नाही, कामाचं कौतुक नाही. जी पार्टी चांगल्या चांगल्या कार्यकर्त्यांचं वाळवण करते, त्या पार्टीत कोण राहील? मी गेली बारा वर्षे, आपल्याला सोडल्याचा पश्चाताप होतोय, परंतु, त्याचं आज मी पापक्षालन करतो आहे. माननीय नितीनजी गडकरी आमचे मित्र आहेत, त्यांच्या मोहात मी पडलो. आज त्यांचे काय हाल चालू आहेत, हेही तुम्हाला माहित आहेत. म्हणजे जसं काय खुँखार आतंकवाद्यांनी भारतीय जनता पार्टीचा ताबा घ्यावा, अशा प्रकारची परिस्थिती तिथं निर्माण झालेली आहे.”

> **नेताजी पालकर तिकडून आले कंधारहून आणि एवढंच म्हणाले, की महाराज, मी तुमचाच. महाराजांनी लगेच गळाभेट घेतली आणि म्हणाले, हो माझाच. तसं साहेब, मी तुमचाच. त्यामुळे तुम्ही आता फक्त आदेश द्या, त्या आदेशाची अंमलबजावणी करणं हे माझं काम असेल.**

व्यवहार आणि चारित्र्य जपून ठेवलं आहे साहेब. हे सगळं मी आता आपल्या कामाला लावीन. आपल्याबरोबर काम करीन. जी द्याल ती जबाबदारी पेलेन. मी गेली बारा वर्षे जबाबदारीच मागत होतो पार्टीला. म्हणजे त्या पार्टीला. परंतु, जबाबदारी देत नाहीत. म्हणजे एवढी पदे भूषविलेला मी महाराष्ट्राचा सरचिटणीस, युवा मोर्चाचा अध्यक्ष, पार्लमेंटरी बोर्डाचा पंधरा वर्षे सदस्य, परंतु, मला कार्यकारिणीचं सदस्य केलं नाही. पण माझ्याही संयमाची कमाल बघा मी राहिलो. परंतु, शेवटी कसं आहे, सब्र का प्याला लब्र हो चुका है. आता सहनशक्तीची मर्यादा संपली. म्हणून मी ती पार्टी सोडली. त्यांच्याबद्दल काय बोलायचं ते मी मैदानात बोलेन. आता एकच पार्टी. राष्ट्रवादी पार्टी. आता नको वादावादी, आता फक्त राष्ट्रवादी. म्हणून आपल्या आशिर्वादानं, आपल्या मार्गदर्शनाखाली हे जे माझं कर्तृत्व जे काही आहे, ते सगळं मी पणाला लावीन आणि आत्ता जशी धनंजयनी अपेक्षा केली, की पश्चिम महाराष्ट्राच्या बरोबरीनं, इथे स्पर्धा नाही आणि



पगड जातीजमातीला आपल्या पंखाखाली घेऊन, संरक्षण देऊन विकासाच्या मार्गावर गतीमान करण्याचं काम करणारे माननीय शरदचंद्रजी पवार साहेबांबरोबर रहायचं हा विचार. पवार साहेब हे छत्रपती राजर्षि शाहू महाराज, फुले, आंबेडकर, माननीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या विचारांचे उपासक आहेत, प्रचारक आहेत, प्रसारक आहेत. सामान्य माणसाला उचलून आमदार करून, मंत्री करणारे एकच व्यक्तिमत्व महाराष्ट्रात, त्याचं नाव आहे शरदचंद्रजी पवार. तशी दृष्टिच नाही कुणाची.

भाषण करायला फारसा वेळ नाही म्हणून साहेब लांबवत नाही आणि आपल्यासमोर भाषण करण्याची माझी प्राज्ञा नाही. म्हणून मी एवढंच सांगतो, की आज मी पार्टीत आलोय, वाट्टेल ती छोट्यातली छोटी, मोठ्यातली मोठी जबाबदारी द्या, ती जबाबदारी इमानेइतबारे पार पाडीन आणि असा वागेन, की तुमच्यावर कुणी शब्द उच्चारला नाही पाहिजे किंवा माझ्या वागण्याचा वगळ तुमच्यावर येणार नाही. मी आजपर्यंत इमानदारीनं आचार, विचार, असली तर ती सकारात्मक स्पर्धा आहे, परंतु, मराठवाडा मागं राहणार नाही, इव्हन महाराष्ट्रात कुठंही मला जायला सांगितलं, तर तिथली माणसं उभी करीन, आपल्या पार्टीत आणीन, पार्टीला माझ्यापरिनं बळ देण्यात खारीचा वाटा उचलेन आणि आपल्या नावाप्रमाणं राष्ट्रवादी पुन्हा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कशी जाईल याच्यासाठी मी माझा खारीचा प्रयत्न करीन, एवढंच बोलतो. आपण मला स्वीकारलं, नेताजी पालकर तिकडून आले कंधारहून आणि एवढंच म्हणले, की महाराज, मी तुमचाच. महाराजांनी लगेच गळाभेट घेतली आणि म्हणाले, हो माझाच. तसं साहेब, मी तुमचाच. त्यामुळे तुम्ही आता फक्त आदेश द्या, त्या आदेशाची अंमलबजावणी करणं हे माझं काम असेल. एवढंच बोलतो आणि पुन्हा एकदा आपण मला पक्षप्रवेश दिल्याबद्दल आपल्या सर्वांचेच आभार मानून थांबतो.

जयहिंद, जय महाराष्ट्र!

> २६/११मध्ये ज्यावेळेस हल्ला झाला, त्यावेळेस ताजमध्ये स्वत: जयसिंगराव ४८ तास तिथं अडकलेले होते. अनेक खासदार तिथे होते वेगवेगळ्या रूममध्ये. म्हणजे तसं बघितलं तर त्यांचा पुनर्जन्म झाल्यासारखेच आहे. अशा पद्धतीचे वेगवेगळे प्रसंग जयसिंगरावांवर येऊन गेले. परंतु, ते कधी डगमगले नाहीत. शेवटी आपली भूमिका ही योग्य पद्धतीनं पुढं न्यायची.



# मराठवाड्यात सगळे मिळून राष्ट्रवादी पक्ष वाढविण्याचे एकत्र काम करूया

## अजित पवार यांची अपेक्षा

उद्या २५ नोव्हेंबर, स्वर्गिय यशवंतराव चव्हाण साहेबांची पुण्यतिथी. चव्हाण साहेबांनी देशाचं आणि राज्याचं राजकारण करत असताना नेहमी बेरजेचं राजकारण केलं आणि तेच काम पुढं चालू ठेवण्याचं आदरणीय पवार साहेबांनी आजपर्यंत त्यांच्या कारकिर्दीत केलं. त्यामुळंच महाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर हे कोरोनाचं संकट सगळ्या देशात आणि राज्यामध्ये पसरलेलं असताना मागे एकनाथराव खडसेंचा पक्षप्रवेश झाला. आज आपल्या सगळ्यांच्या साक्षीनं जयसिंगराव गायकवाड यांचा पक्षप्रवेश थोड्याच वेळात होणार आहे.

सुसंस्कृत महाराष्ट्र घडविण्याचं काम स्वर्गिय चव्हाण साहेबांनी केलं आणि तशाच पद्धतीनं महाराष्ट्र पुढं नेला पाहिजे ही भावना पवार साहेबांनी महाराष्ट्राच्या मातीमध्ये रूजवण्याचं काम केलं. स्वत: जयसिंगराव दोनवेळेला विधानपरिषदेमध्ये त्यांनी प्रतिनिधीत्व केलं. दोन वेळेला लोकसभेमध्ये प्रतिनिधीत्व केलं. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये देखील त्यांनी काम केलं. केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये देखील त्यांनी काम केलं. पदवीधर मतदारसंघाचे प्रश्न कशा पद्धतीनं सोडवायचे, हे त्यांनी दाखवून दिलं. जयसिंगराव यांची फक्त बीड जिल्ह्यापुरती मदत होणार आहे, असं समजण्याचं कारण नाही. संपूर्ण मराठवाड्यात जे आठ जिल्हे आहेत, त्याठिकाणी स्वत: जयसिंगरावांचं काम आहे आणि तिथं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढविण्याच्याकरता त्यांचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा खूप चांगला उपयोग होणार आहे. मदत होणार आहे. आपला पक्ष तिथं मजबूत त्याठिकाणी होणार आहे.

ज्यावेळेस मला कळालं, कालच उल्हास आणि आमचे जयसिंगराव आम्ही सगळेजणं मंत्रालयामध्ये बसलो होतो आणि त्यावेळेस त्यांनी मला सांगितलं, की उद्याच कार्यक्रम आहे. मला पण आनंद झाला. त्याच्यावरनं २६/११ची आठवण झाली. २६/११मध्ये ज्यावेळेस हल्ला झाला, त्यावेळेस ताजमध्ये स्वत: जयसिंगराव ४८ तास तिथं अडकलेले होते. अनेक खासदार तिथे होते वेगवेगळ्या रूममध्ये. म्हणजे तसं बघितलं तर त्यांचा पुनर्जन्म झाल्यासारखेच आहे. अशा पद्धतीचे वेगवेगळे प्रसंग जयसिंगरावांवर येऊन गेले. परंतु, ते कधी डगमगले नाहीत. शेवटी आपली भूमिका ही योग्य पद्धतीनं पुढं न्यायची. आत्तादेखील पदवीधर मतदारसंघामध्ये मराठवाड्याच्या तिसऱ्यांदा सतीश चव्हाण तिथं प्रतिनिधीत्व करू इच्छितायंत आणि ते प्रतिनिधीत्व करत असताना स्वत: जयसिंगरावांचा प्रचाराचा तसेच त्यांचं आजपर्यंतचे जे कौशल्य आहे, अनुभव आहे, तो अनुभव निश्चितपणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांना उपयोगी पडल्याशिवाय त्याठिकाणी राहणार नाही अशा प्रकारचा विश्वास व्यक्त करतो.

> **जयसिंगराव यांची फक्त बीड जिल्ह्यापुरती मदत होणार आहे, असं समजण्याचं कारण नाही. संपूर्ण मराठवाड्यात जे आठ जिल्हे आहेत, त्याठिकाणी स्वत: जयसिंगरावांचं काम आहे आणि तिथं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढविण्याच्याकरता त्यांचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा खूप चांगला उपयोग होणार आहे. मदत होणार आहे. आपला पक्ष तिथं मजबूत त्याठिकाणी होणार आहे.**

जयसिंगराव, इथून पुढच्या काळामध्ये मी असेन, जयंतराव असतील, नवाब मलिक असतील, संजय असेल, आमचे अनिलराव असतील, आम्ही सगळेजण या महाविकास आघाडी सरकारच्या मंत्रिमंडळामध्ये त्याठिकाणी काम करतोय, इथून पुढच्या काळामध्ये जे काही आमच्याशी संबंधित विषय असतील, विकासाचे प्रश्न असतील, ते पुढे नेण्याच्याकरता आम्ही सगळेजण त्याठिकाणी तुम्हाला मनापासून साथ देऊ आणि कुठल्याही परिस्थितीमध्ये आपला एक परिवार आहे, या भावनेने इथून पुढच्या काळामध्ये कुठंही, कुठल्याही प्रकारची अडचण न येता एक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मराठवाड्यातले महत्त्वाचे नेते या नात्याने आपण सगळेजण मिळून त्याठिकाणी काम करूया. मी मनापासून आपलं आणि आपल्याबरोबर इतर सहकाऱ्यांचं देखील त्याठिकाणी स्वागत करतो आणि चांगला निर्णय तुम्ही पुढच्या वाटचालीकरता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये येण्याचा घेतला, त्याबद्दल मीदेखील माझ्यावतीनं व्यक्तिश: आपलं मनापासून स्वागत करतो आणि धन्यवाद देतो. जयहिंद, जय महाराष्ट्र!!



बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष बाजीराव सोनवणे बोलत असताना व्यासपीठावर शेजारी बाबाजानी दुर्राणी, संजय बनसोडे, अजित पवार व अनिल देशमुख




# जयसिंगराव गायकवाड यांचा अनुभव पक्षाला उपयुक्त ठरेल

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची ग्वाही

गेली अनेक वर्षे बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अनेक कार्यकर्त्यांनी, सहकाऱ्यांनी ताकदीनी त्याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून उभा केलेला आहे. मधल्या काळामध्ये आमच्या पक्षात एक भर पडली होती आणि ती म्हणजे माननीय जयसिंगराव गायकवाड साहेबांची. पण मधल्या काळामध्ये काही प्रश्न तयार झाले, जयसिंगराव गायकवाड साहेब भारतीय जनता पक्षात गेले आणि भारतीय जनता पक्षातून काम करत असताना गेली काही वर्षे त्यांच्या हे लक्षात आलेलं आहे, की भारतीय जनता पक्ष हा बीड जिल्ह्यासाठी, महाराष्ट्रासाठी काही काम करत नाही आणि म्हणून त्यांनी स्वत:हून आदरणीय पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली पुन्हा राष्ट्रवादीमध्ये काम करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मी त्यांच्या या निर्णयाचं मन:पूर्वक स्वागत करतो.

बीड जिल्ह्यातल्या खेड्यापाड्यापर्यंत जयसिंगराव गायकवाड साहेबांचा संपर्क आहे. ते खासदार असतानादेखील खेड्यात जायचे, तिथेच रहायचे, तिथेच मुक्काम करायचे, दुसऱ्या दिवशी तिथूनच पुढचा प्रवास सुरू करायचे आणि लोकसंपर्क करायचे. त्यामुळं खासदार संध्याकाळी आपल्या बंगल्यावर परत जातो अशी परिस्थिती जयसिंगराव गायकवाड यांच्याबाबतीत कधी झाली नाही. एवढा सामान्य माणसांशी जिव्हाळा असणारा, सामान्य माणसाशी प्रयत्नपूर्वक अतिशय चांगल्या पद्धतीनं ज्यांनी संबंध प्रस्थापित केलेला आहे, असा नेता आपल्या पक्षातून मागच्या काळात गेला याची आम्हाला खंत होती, पण आज मला अत्यंत आनंद होतोय, की बीड जिल्ह्यात जयसिंगराव गायकवाड साहेबांसारखा एक नेता ज्याची लोकांशी नाळ जोडलेली आहे, असा नेता भारतीय जनता पक्षाच्या जाचाला, त्रासाला आणि प्रश्नांना कंटाळून आज पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करतोय. मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीनं त्यांचं मन:पूर्वक स्वागत करतो आणि इथून पुढे या जिल्ह्यात आणि महाराष्ट्राला त्यांचा अनुभव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चांगल्या पद्धतीने उपयोगात येईल, असा विश्वास व्यक्त करून मी माझे दोन शब्द संपवतो.



# जयसिंगराव काकांचं मार्गदर्शन आमच्यासाठी मोलाचे ठरेल

## धनंजय मुंडे यांचे उद्गार

ज्यांचा आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश होतोय, ते आपल्याला जरी जयसिंग गायकवाड म्हणून त्यांची ओळख असली, तरी आमच्यासाठी ते काका आहेत. आज काकांचा जाहिररित्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुंबईच्या या प्रदेशाच्या कार्यालयात पक्षप्रवेश होतोय, याचा मला मनापासून आनंद आहे. काकांच्या प्रवेशाचा आनंद मी परभणीच्या जाहीर सभेमध्येच व्यक्त केलांय. नक्कीच बीड जिल्ह्यामध्ये आणि मराठवाड्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला काकांच्या माध्यमातून हत्तीचं बळ याठिकाणी आम्हाला मिळालेलं आहे. आम्हाला वडिलकीच्या नात्यानं मार्गदर्शन करणारे मराठवाड्यात आणि जिल्ह्यामध्ये याठिकाणी काका मिळाले आहेत. त्यांनी आज प्रवेश केलांय.

सर्वसामान्य जनतेच्याप्रति काकांची जी तळमळ आहे, ती आपल्या कुणालाही सांगायला नको. मला आजही आठवतं, की खासदार म्हणून वाडी-वस्तींवरती सोबत कोण असो, नसो, पण खासदार म्हणून याठिकाणी काका जाणारच. ज्या जनतेनी खासदार म्हणून आपल्याला देशाच्या सार्वभौम सभागृहामध्ये पाठवलंय, त्यांचं काम त्यांनी त्याठिकाणी प्रामाणिकपणे, तळमळीने केलं. अनेक वर्षे त्यांची अन्यायात गेली, अन्याय त्यांच्यावरती झाला. तो अन्याय कसा झाला, तेही मी परभणीतल्या जाहीर सभेत सांगितला. ज्या पद्धतीनं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आज पश्चिम महाराष्ट्रात ताकद आहे, काकांच्या प्रवेशानंतर मराठवाड्यातसुद्धा पश्चिम महाराष्ट्राच्या बरोबरीनं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद उभी राहील हे मी आज यानिमित्तानं आदरणीय साहेबांच्यासमोर आपली भावना याठिकाणी व्यक्त करतो.

पुन्हा एकदा मी काकांचं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये स्वागत करतो. त्यांचं मार्गदर्शन आमच्यासाठी फार मोलाचं आहे. आदरणीय साहेबांमुळं आज आम्ही महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये भलेही काम करत असू, काका, ही वस्तुस्थिती आहे, की आम्ही आपल्या अंगाखांद्यावरती खेळलेलो आहोत. त्यामुळं आपल्या मार्गदर्शनाची गरज आम्हाला निश्चितच आहे. अशा पद्धतीनं आपण सगळे मिळून याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मराठवाड्यात रूजविण्याचं काम उभं करू. पुन्हा म्हणून मराठवाड्यात आणि बीड जिल्ह्यामध्ये बीला सुद्धा भारतीय जनता पार्टी आपल्याला ठेवायचा नाही, काका हा संकल्प पक्ष प्रवेशाच्या निमित्तानं आपल्याला करावा लागेल आणि तो आपण सर्वजण



करू. पुन्हा एकदा आपलं स्वागत करतो. थांबतो. धन्यवाद! जयहिंद, जय महाराष्ट्र, जय राष्ट्रवादी!!

Best

Compliments

# नाशिकच्या 'लोकहितवादी' मंडळाला पुरस्कार हे चव्हाणसाहेबाच्या ग्रंथप्रेमाचे स्मरण

## शरद पवार यांचे विचार

"परदेशात गेल्यावर व अधिकृत काम संपल्यानंतर यशवंतरावांचा अधिकाधिक वेळ पुस्तकांच्या दुकानात व वाचनात जात असे. नवे कोणते पुस्तक आले आहे, याचा शोध घेऊन ते पुस्तक खरेदी करीत. वाचन संस्कृती वाढविण्यातले त्यांचे योगदान मोलाचे आहे."

यशवंतराव चव्हाण यांच्या ३६व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आपण आज एकत्रित आहोत आणि चव्हाण प्रतिष्ठानला एका गोष्टीची अस्वस्थता आहे. दु:ख आहे, की चव्हाण प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्यांतले एक मोलाचे सहकारी विनायकराव पाटील आज आमच्यामध्ये नाहीयेत. विनायकराव हे नाशिककर होते. साहित्य, कला, संस्कृती, वृक्षारोपण या सगळ्या क्षेत्रांमध्ये त्यांचं योगदान होतं. आणि तात्यासाहेबांनी त्यांचा उल्लेख वनाधिपती म्हणून केलेला होता. त्याच्या पाठीमागं या सगळ्या क्षेत्रातलं त्यांचं योगदान किती मोठं होतं हे स्पष्ट होणारं आहे. आजचा हा संबंध पुरस्काराचा सोहळा नाशिककरांचं स्मरण करण्यासंबंधीचा प्रतिष्ठा वाढवणारा अशा प्रकारचा आहे. आणि म्हणूनच विनायकराव नाहीत, याची अस्वस्थता आम्हा सगळ्यांच्या मनामध्ये आहे.

यशवंतराव चव्हाण यांचा देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि स्वातंत्र्यप्राप्तीच्या नंतर तो स्वातंत्र्याचा अर्थ सामान्य माणसाच्या जीवनामध्ये परिवर्तनाच्या संबंधात यावा यासाठी कष्ट करण्यासंदर्भात असो, किंवा राष्ट्रीय जबाबदारी आपल्यावर पडल्याच्यानंतर ती जबाबदारी समर्थपणानं सांभाळून संबंध देशाला एक प्रकारचा विश्वास आणि दिलासा देण्याच्यासंबंधीची कामगिरी ही चव्हाण साहेबांच्या मार्फत झाली. याची नोंद आपल्या सगळ्यांच्या अंत:करणामध्ये आहे. राजकारण आणि सत्ता हे तर महत्त्वाचं आहे. पण सत्ता असतानासुद्धा सुसंस्कृतपणा, समाजातल्या विविध घटकांच्या विषयांसंबंधीची अत्यंत आस्था, त्या क्षेत्रातल्या जाणकारांच्याबद्दलचा आदर याबद्दलचा आदर्श हा यशवंतरावांनी सातत्यानं आपल्याकडे ठेवला होता. संसदीय पद्धतीवर त्यांचा प्रचंड विश्वास होता आणि संसदीय पद्धतीमध्ये काम करत असताना सभ्यता आणि सुसंस्कृतपणा याचं दर्शन अनेकवेळेला झालेलं महाराष्ट्राच्या आणि देशाच्या विधिमंडळामध्ये बघायला मिळालं होतं.

एक दिवशी मी महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या गॅलरीमध्ये होतो. त्यावेळी मी काही विधानसभेमध्ये नव्हतो. आणि त्या विधिमंडळामध्ये यशवंतरावजी मुख्यमंत्री म्हणून बसले होते. विरोधी पक्षनेते म्हणून एस. एम. जोशी होते. अन्य काही ज्येष्ठ सहकारी होते. आणि एसएमनी काहीतरी प्रश्न उपस्थित केला. त्या प्रश्नाचं उत्तर एका नव्या तरूण मंत्र्यांनी दिलं. उत्तर बरोबर होतं. पण एसएमनी पुन्हा तो प्रश्न उपस्थित केला आणि त्याबद्दल आग्रहानं आपलं म्हणणं त्याठिकाणी मांडलं. त्या तरूण मंत्र्यांनी उत्तर दिलं.

**यशवंतराव चव्हाण यांच्या ३६व्या पुण्यतिथीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांच्यावतीने नाशिकच्या लोकहितवादी मंडळाला यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिकाने गौरविण्यात आले. त्याचबरोबरीने कायद्याच्या परीक्षेत (एलएलएम) मुंबई विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक आदित्य अवधूत पेडणेकर यांना प्रदान करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मा. शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये २५ नोव्हेंबर २०२० रोजी झालेल्या या कार्यक्रमाचा वृत्तांत...**






पण एसएमांचं काही समाधान झालं नाही. एसएम पुन्हा एकदा त्याच प्रश्नासाठी उभे राहिले आणि तो प्रश्न त्यांनी पुन्हा मांडला. त्या तरूण मंत्र्यांनी उत्तर दिलं, की तुमच्या डोक्यात शिरत नसेल तर आता मला मर्यादा आहेत. हे वाक्य त्या तरूण मंत्र्यांनी सांगितल्याच्यानंतर यशवंतरावजी मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवरून तातडीने उठले. त्यांनी सभागृहाची आणि एसएमांची दिलगिरी व्यक्त केली आणि सांगितलं, की माझे सगळे नवे सहकारी संसदीय पद्धतीमधल्या प्रत्येक माणसाचा सन्मान ठेवण्याच्यासंबंधीचा विचार इथून पुढं करतील अशी माझी अपेक्षा आहे. हे नाही घडलं म्हणून ही दिलगिरी. सांगायचं तात्पर्य एकच आहे, की या संबंध व्यवस्थेच्यासंबंधीची त्यांची मनोभाविका तयार होती हे यातून स्पष्ट होतं.

आज यशवंतराव प्रतिष्ठानच्यावतीनं हा जो पुरस्कार मिळतोय, तो लोकहितवादी मंडळाला मिळतोय आणि याचा मला विशेष आनंद आहे. एक म्हणजे यशवंतरावजींचं ग्रंथप्रेम हे एक आगळंवेगळं प्रकारचं ग्रंथप्रेम होतं. मला आठवतंय, की यशवंतरावजी गेले आणि त्यांच्या मृत्यूच्यानंतर त्यांनी काही लिहून ठेवलं होतं. त्यामध्ये काही लोकांच्यावर काही जबाबदारी होती, त्याच्यात माझ्यावरही काही जबाबदारी होती. आणि त्यांच्या लिहून ठेवण्यामध्ये त्यांच्या निवासस्थानातलं सर्व जे काही साहित्य होतं, दिल्लीतलं सामान, बँकेतलं अकाऊंट आणि त्याची कशी विल्हेवाट लावायची यासंबंधीच्या सूचना होत्या. इतकी वर्षे सत्तेच्या राजकारणात, राज्यामध्ये मंत्री, राज्यामध्ये मुख्यमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री, देशाचे अर्थमंत्री, देशाचे गृहमंत्री, देशाचे परराष्ट्रमंत्री, संसदेतले विरोधी पक्षाचे नेते अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे सांभाळल्या.





लोकहितवादी मंडळाचे अध्यक्ष सुरेश जातेगावकर यांना पुरस्काराची रक्कम रु. दोन लाख व श्रीफळ प्रदान करून शरद पवार त्यांचा सत्कार करताना, शेजारी डावीकडून हेमंत टकले, सुप्रिया सुळे, डॉ. अनिल काकोडकर, अरुण गुजराथी, शरद काळे आणि आदित्य पेडणेकर.

आणि ते गेल्याच्यानंतर त्यांनी जे सांगितलं होतं, की जे काही त्यांच्या बँकेत किंवा अन्य ठिकाणी काही जे असेल, नसेल त्या रकमेचा विनियोग कसा करायचा याबद्दल त्यांनी त्याठिकाणी लिहून ठेवलं होतं. थोडीबहुत जमीन होती त्यांची पुण्याच्या जवळ. ती विकायचा आदेश होता. जे काही वेणुताईंचे दागिने होते, त्याची विल्हेवाट लावण्याची सूचना होती. आणि या सगळ्यातून जे काही धन जमेल ते त्या काळामध्ये साधारणत: दीड ते दोन लाखांच्या आसपास होतं आणि ती सगळी रक्कम ही एका बँकेमध्ये ठेऊन त्याच्यातून गरीब मुलांच्या शिष्यवृत्तीच्यासाठी ती वापरावी हा त्याच्यातला संदेश होता. एवढं इतकी वर्षे सत्तेच्या राजकारणात असणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाच्या जीवनामध्ये जी रक्कम मिळाली तीही अशी, रक्कम नाही मिळाली, पण हजारो ग्रंथ मिळाले. आयुष्यातली त्यांची होती, नव्हती ती सगळी कमाई ही ग्रंथ खरेदीच्यासाठी आणि वाचनसंस्कृती जागवण्याच्यासाठी केली होती.

मला माहिती नाही, शरद काळे यांना भाग्य आलं, की चव्हाण साहेबांच्या सोबत काम करण्याचं. चव्हाण साहेब परदेशी दौऱ्यावर जायचे, त्यावेळी त्यांचे सचिव बरोबर असायचे. शरद काळेही कदाचित असतील. मला ठाऊक आहे, की ते परदेशी गेल्याच्यानंतर, त्यांचं ऑफिशियल काम संपल्याच्यानंतर त्यांचा वेळ जास्तीत जास्त उत्तम ग्रंथालय असलेल्या ठिकाणी,



सुरेश जातेगावकर व मुकुंद कुलकर्णी यशवंतरावांच्या पुतळ्याचे दर्शन घेताना.



**मुंबई विद्यापीठात 'एलएलएम' च्या परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या आदित्य पेडणेकर यांचा शरद पवार पारितोषिक देऊन सत्कार करताना, शेजारी सुप्रिया सुळे, डॉ. अनिल काकोडकर, सुरेश जातेगावकर आणि अरुण गुजराथी.**

उत्तम पुस्तकालय असेल अशा ठिकाणी जाऊन अलिकडं आलेलं कोणतं पुस्तक यासंबंधीची माहिती घेऊन ते पुस्तक खरेदी करण्याच्यासाठी त्यांचा वेळ जात असे. बाकी कुठल्याही गोष्टीच्यासाठी त्यांनी देशाच्या बाहेर गेल्याच्यानंतर फारसं लक्ष दिलं नाही. असे त्यांचे ग्रंथप्रेम होतं. आणि आज आपण ज्यावेळी वाचनसंस्कृतीसंबंधीचा विचार प्रकर्षानं मांडतो, मला स्वत:ला असं वाटतं, की या सगळ्या नव्या पिढीला यासंदर्भात प्रेरणा, प्रोत्साहन देण्याच्यासंबंधीची कामगिरी करणारा कोण महान नेता होऊन गेला असा जर आपण उल्लेख केला तर त्या मालिकेमध्ये चव्हाण साहेबांचं नाव हे त्याठिकाणी प्रकर्षानं घ्यावं लागेल.

चव्हाण साहेबांचा नाशिकशी एक आगळावेगळा संबंध होता. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये काही संघर्ष झाले. त्याच्यामध्ये भाऊसाहेब हिरे आणि यशवंतराव चव्हाण असा एक संघर्षाचा काळ पण येऊन गेला. पण त्या कालखंडामध्ये नंतर समन्वयही झाला. आणि यशवंतरावजींच्या पाठीशी उभं राहण्याची भूमिका भाऊसाहेबांच्यासह नाशिककरांनी घेतली. नाशिक जिल्हा हा विधिमंडळाच्या कालखंडातच बरोबर राहिला असं नव्हे, ज्यावेळेला चीनचं आक्रमण झालं आणि संबंध देशामध्ये एक प्रकारची अस्वस्थता होती. कृष्ण मेनन यांच्या हातामध्ये देशाच्या संरक्षणाची सूत्रं ही देशहिताची नाहीत असा निष्कर्षाचा सूर पोचायला लागला आणि एक प्रकारचा दबाव प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरूंच्यावर संसदेमध्येसुद्धा आला बदल करण्यासंबंधीचा, त्यावेळेला यशवंतरावजींना मुख्यमंत्रिपदाची सूत्रं सोडून दिल्लीला नेण्यात आलं आणि त्यांच्यावर संरक्षण खात्याची जबाबदारी सोपवली गेली. भाग्य या देशाचं, की संरक्षण खात्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आणि अत्यंत थोड्या वेळामध्ये चीननी पूर्णविराम दिला आणि हे युद्ध थांबवलं. नंतरच्या काळामध्ये संबंध सैन्यदलाचं मनोबल वाढवण्याच्यासंबंधीची मोलाची कामगिरी ही चव्हाण साहेबांनी केली होती. त्यात



**सुरेश जातेगावकर यांचा शाल घालून शरद पवार सत्कार करताना.**

चव्हाण साहेबांची संसदेमधली पहिली एन्ट्री ही सातारचे प्रतिनिधी म्हणून नव्हती, ती नाशिकची प्रतिनिधी म्हणून होती. नाशिककरांनी त्यांना पहिल्यांदा संसदेमध्ये पाठवलं होतं आणि या देशाच्या रक्षणासंबंधीची मोलाची कामगिरी ही त्यांनी केली हा नाशिककरांचा आणि त्यांचा एक प्रकारचा ऋणानुबंध होता.

अनेकांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. तात्यासाहेबांशी होते, दादासाहेब पोतनीसांशी होते. अनेकांच्याबद्दल त्याठिकाणी सांगता येईल, की नाशिक आणि चव्हाण साहेबांचं कशा प्रकारची जवळीक होती. आजही आपण नाशिकमध्ये गेल्याच्यानंतर नाशिक बदललंय. अनेक क्षेत्रांमध्ये बदललंय. शेती उत्तम होतीच. पण कारखानदारी वाढली

**“ मिग विमानाचा कारखाना हा नाशिकमध्ये निफाडच्या जवळ उभा केला, तो यशवंतरावजी संरक्षणमंत्री असताना आणि देशाच्या संरक्षणाला एक ताकद तर दिलीच, पण नाशिकच्या औद्योगिक विकासाचा पाया याच्यातून घातला गेला. ”**



**लोकहितवादी मंडळाला सत्कारप्रसंगी देण्यात आलेले मानपत्र शरद पवार हे सुरेश जातेगावकर यांना प्रदान करताना, शेजारी अरुण गुजराथी, शरद काळे आणि आदित्य पेडणेकर.**

आणि या कारखानदारीचा पाया कशानी घातला असेल तर नाशिकमध्ये या देशाच्या रक्षणासाठी आवश्यक असलेल्या मिग विमानाचा कारखाना हा नाशिकमध्ये निफाडच्या जवळ उभा केला, तो यशवंतरावजी संरक्षणमंत्री असताना आणि देशाच्या संरक्षणाला एक ताकद तर दिलीच, पण नाशिकच्या औद्योगिक विकासाचा पाया याच्यातून घातला गेला, असं जर मी म्हटलं तर त्यामध्ये अतिशोयक्ती होणार नाही. आणि म्हणून मला अतिशय आनंद आहे, की चव्हाण साहेबांच्या नावाचा हा पुरस्कार नाशिकच्या संस्थेला मिळतोय, आणि तात्यासाहेबांचा सहभाग असलेल्या संस्थेला मिळतोय. चव्हाण साहेबांची एक अत्यंत आवडीची जी गोष्ट होती, ज्याच्याबद्दल त्यांना आस्था होती, त्यांचं ग्रंथप्रेम, त्या ग्रंथाच्या क्षेत्रामध्ये योगदान देणाऱ्या लोकहितवादी संस्थेला हा पुरस्कार मिळतोय. मला असं वाटतं, माणूस गेल्याच्यानंतर तो आहे-नाही याच्याबद्दलचं बोललं जातं, माझा काय फारसा त्याच्यावर विश्वास नाहीये, पण जर असेल तर माझी खात्री आहे, की चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीनं लोकहितवादी संस्थेची निवड झाली हे त्यांना समजलं तर त्याचं मानसिक समाधान त्यांना निश्चित मिळाल्याशिवाय राहणार नाही. मला आनंद आहे, की पुढच्या कार्यक्रमासाठी एमकेसीएलचे विवेक सावंत नावाच्या अशाच एका कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्वाची निवड केली, मला विश्वास आहे, की त्यामुळं या पदाची प्रतिष्ठा वाढवायला त्याची उपयुक्तता झाल्याशिवाय राहणार नाही. आपण सगळेजणं कोरोनासंबंधीच्या मर्यादा असतानासुद्धा याठिकाणी उपस्थित राहिलात आणि या सगळ्या सोहळ्यात सहभागी झालात त्याबद्दल याठिकाणी कृतज्ञता व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

**लोकहितवादी मंडळाचे कार्याध्यक्ष मुकुंद कुलकर्णी यांनी पुरस्काराला उत्तर देताना केलेले भाषण**

# नाशिकच्या सर्वांगिण जडणघडणीत यशवंतराव चव्हाणांचे सक्रीय सहकार्य



सर्वप्रथम आदरणीय श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या ३६ व्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या स्मृतिस मी अभिवादन करतो. व्यासपीठावरील आदरणीय श्री. शरदजी पवार, डॉ. अनिल काकोडकर, मा. सौ. सुप्रियाताई सुळे, मा. श्री. हेमंतराव टकले, मा. श्री. शरद काळे, मा. आदित्य पेडणेकर आणि आमच्या लोकहितवादी मंडळाला आर्शिवाद देण्यासाठी जमलेल्या सर्व सुजाण मान्यवरांनाही विनम्र अभिवादन करतो. लोकहितवादी मंडळ या संस्थेच्या 'कार्याध्यक्ष' या नात्याने मी आपणासमोर मनोगत व्यक्त करीत आहे.

आपल्या भारतास १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, संपूर्ण समाजात मानसिक अस्वस्थेचे, अस्थिरतेचे वातावरण होते. तेव्हा विशेषतः मराठी समाजाला या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी ज्या विभूतीनी जाणिवपूर्वक परीक्षम केले, ठोस प्रयत्न केले, त्यामध्ये आदरणीय श्री. यशवंतराव चव्हाण, आदरणीय श्री. वि. वा. शिरवाडकर उर्फ महाकवी कुसुमाग्रज हे आहेत. याच विचारातून १९५० साली वि. वा. शिरवाडकरांनी समविचारी व्यक्तींना सोबत घेऊन लोकहितवादी मंडळाची स्थापना केली. कै. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांच्या समाजाप्रति असलेल्या त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन या संस्थेला 'लोकहितवादी मंडळ' हे नाव देण्यात आले. त्या काळच्या समाजाची मानसिक गरज ओळखून, समाजाला अस्वस्थ मानसिकतेतून बाहेर काढून, सुसंस्कृत, सुजाण समाज निर्माण करण्यासाठी, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक हिताचे कार्य करण्यासाठी लोकहितवादी मंडळाची ध्येयवादी वाटचाल सुरु झाली. ती त्याच ध्येयाने प्रेरीत असलेली आजची पिढीही निग्रहाने कार्यरत आहे.

लोकहितवादी मंडळाचे प्रामाणिक कार्य विचारात

घेऊन नाशिक नगरपालिकेने त्यांच्या अख्यत्यारीतील एक भूखंड मंडळास दिला. अट होती की त्यावरील नियमानुसारचे बांधकाम संस्थेने स्वतःच्या खर्चाने करावे. अनेक सधन नागरीक देणगी देण्यास तयार असताना तात्यसाहेबांनी त्याला विनम्र नकार दिला, कारण हे लोकहितवादी मंडळ संपूर्ण समाजाचे आहे. त्यामुळे प्रत्येक नागरीकाकडून प्रतिकात्मक २० रुपयाची एक वीट घेऊन काम सुरु करण्यात आले. पंरतु शेवटी वास्तू पूर्ण होण्यासाठी आर्थिक विवंचना

सार्थ अभिमान आहे. नाशिकच्या सर्वांगिण जडणघडणीत आदरणीय यशवंतराव चव्हाणांचे सक्रीय मार्गदर्शन आणि सहकार्य आहे याची आम्हाला जाणिव आहे आणि हाच वारसा आदरणीय शरद पवार साहेबही जोपासत आहेत हे मी आवर्जून नमूद करतो.

जनस्थान, गुलशनाबाद ते आजचे नाशिक. हा पौराणिक काळापासून ऐतिहासिक कालखंडाचा साक्षीदार राहून आजपर्यंत पोहोचलेल्या आपल्या नाशिकचा प्रवास





निर्माण झाली. या व्यासपीठावरुन एका योगायोगाचा उल्लेख करताना मला मनस्वी आनंद होत आहे. ही विवंचना लक्षात घेऊन आदरणीय श्री. शरद पवारांनी त्याकाळी ५०००००/-रुपयांची देणगी दिली आणि त्यामुळे वास्तूचे बांधकाम पूर्ण होऊ शकले. त्यात वास्तूत कार्यरत असलेल्या संस्थेला आज हा पुरस्कार शरदजींच्याच हस्ते प्राप्त होतोय. त्या वास्तूचे नाव आहे 'ज्योतीकलश'. या नावामागेही कुसुमाग्रजांचा समाजाप्रति असलेला द्रष्टेपणा लक्षात येतो. या नावामागे महात्मा ज्योतिबा फुलेंच्या कार्याची प्रेरणा आहे तसेच लोकहितवादी मंडळाचे कार्य तळागाळातील समाजाला प्रकाशाची वाटचाल करण्यासाठी सहाय्यभूत ठरणाऱ्या 'ज्योतीकलश' सारखे असावे. आज याच प्रेरणा घेऊन सध्याची नवी पिढीही गेल्या ७० वर्षांचा वारसा जोपासत आहे, वृद्धींगत करत आहे याचा आम्हास

आहे. पौराणिक काळातील महानाट्ये, ऐतिहासिक काळातील संघर्ष, स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक क्रांत्या आणि आजचे हे वैभवशाली स्वरुप यास महाराष्ट्राची जीवनदायिनी गोदामाई तटस्थ साक्षिदार आहे. अनेक संत महात्म्यांची ही भूमी आहे, अनेक क्रांतीकारकाची ही भूमी आहे, संगीत शिरोमणी पं. विष्णू दिगंबर पलुस्कर नाशिकचे, चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके नाशिकचे, महाकवी कुसुमाग्रज नाशिकचेच. महाराष्ट्राचे शेक्सपिअर प्रा. वसंतराव कानेटकर नाशिकचेच. आंतरराष्ट्रीय किर्तीचे गणितज्ज्ञ कापरेकर नाशिकचेच, खगोलशास्त्रज्ञ सुधाकर भालेराव नाशिकचेच. चित्रकार शिवाजी तुपे, प्रफुल्ल व राजेश सावंत नाशिकचेच. ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता दत्तू भोकनाळ नाशिकचाच, कविता राऊत नाशिकचीच, अनेक साहित्यिक, नाटककार, संगीतकार, अभिनेते-

अभिनेत्री, नृत्य कलाकार, गायक, वादक, अभ्यासक, संशोधक यांनी संपन्न असलेली नाशिक नगरी आणि याच संपन्नतेमध्ये अंतर्भूत असलेले आमचे लोकहितवादी मडंळ.

हा गौरव केवळ एका संस्थेचा नसून संपूर्ण नाशिककरांचाच आहे असे आम्ही मानतोय. लोकहितवादी मंडळ गेली ७० वर्षे कार्यरत असलेली संपूर्ण भारतातील मोजक्या संस्थांपैकी एक आहे. कोणतेही आर्थिक पाठबळ नसलेल्या संस्थेची ही निग्रही वाटचाल तात्यासाहेबांच्या प्रेरणेमुळेच शक्य होतेय. त्यामुळेच आजच्या या पुरस्काराचे स्थान आमच्यासाठी अनमोल आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई यांचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आणि पथदर्शी आहे. आम्हाला मिळालेला हा आशिर्वाद, ही शाबासकी प्रोत्साहीत करणारी, पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी आहे, आमच्यावरची जबाबदारी वाढविणारी आहे. यशवंतरावांच्या कृष्णामाईने तात्यासाहेबांच्या गोदामाईचा केलेला हा गौरव आहे असे आम्ही मानतो. आपले हार्दिक धन्यवाद आणि मनःपूर्वक आभार !



# लोकहितवादी मंडळाचे नाव घेतल्यावर प्रतिमा उभी राहते 'कुसुमाग्रजां'ची

## अरुण गुजराथी यांचे उद्गार

लोकहितवादी मंडळाला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आम्हाला अतिशय आनंद होत आहे. नाशिक ही आधी मंत्र भूमी होती, त्यानंतर ती यंत्र भूमी झाली आणि आता ती तंत्र भूमी होतेय. एक धार्मिक तीर्थक्षेत्र म्हणून नाशिकचा उल्लेख होता. पण साहित्याचं तीर्थक्षेत्र हे नाशिक झालेलं आहे आणि कुसुमाग्रजांच्या माध्यमातनं नाशिकची ओळख आहे. ज्यावेळी लोकहितवादी मंडळ हे नाव माझ्या डोळ्यासमोर येतं, त्यावेळी एक प्रतिमा उभी राहते ती कुसुमाग्रजांची. फार चांगल्या पद्धतीने संस्था गेल्या सत्तर वर्षापासून कार्यरत आहे. गेल्या पस्तीस-चाळीस वर्षापासून मी हे नाव ऐकतोय. महाराष्ट्रात ज्या चांगल्या संस्था आहेत कार्य करणाऱ्या, मानवतेच्या संदर्भात, समतेच्या संदर्भात, साहित्याच्या संदर्भात, संस्कृतीच्या संदर्भात त्यातली ही संस्था आहे. ही संस्था उभी करण्यामध्ये आपल्या कुसुमाग्रजांचा फार मोठा सहभाग आहे. कुसुमाग्रजांचं नाव काढल्यानंतर विशाखा ही आपल्याला कल्पना आहे किंवा गर्जा जयजयकार यासंदर्भातदेखील आपल्याला कल्पना आहे. त्यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेली ही संस्था एक अत्यंत चांगल्या पद्धतीने कार्य करीत आहे, हा अत्यंत आनंदाचा भाग आहे. चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातनं पुरस्कार मिळाल्याचा जितका तुम्हाला आनंद आहे, तितकाच आनंद संस्थेलाही आहे, प्रतिष्ठानला आहे, की आपण चांगल्या अशा संस्थेला आज प्रेरणा देत आहोत. या कार्यक्रमाला आपलं सगळ्यांचं स्वागत करतो.


# एमकेसीएलच्या विवेक सावंत यांना यंदाचा 'यशवंतराव' राष्ट्रीय पुरस्कार

## पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष अनिल काकोडकर यांची घोषणा

सर्वप्रथम आज मी माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या ३६व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मृतिस अभिवादन करतो आणि माझ्यावर जे काम सोपवलेलं आहे, मी आपल्यापुढे प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी जे राष्ट्रीय पारितोषिक देण्यात येतं, ते आपण चव्हाण साहेबांच्या जयंतीच्या दिवशी १२ मार्चला ते प्रदान करतो. पण त्याची घोषणा परंपरेप्रमाणे आपण आजच्या दिवशी करत असतो. त्या राष्ट्रीय पारितोषिक निवड समितीचा अध्यक्ष या नात्याने मी आपल्यापुढे उभा आहे. या समितीमध्ये डॉ. माशेलकर आहेत. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पेडणेकर आहेत. आर्किटेक्ट कादरी साहेब आहेत. माजी कुलगुरू डॉ. रूपा शहा आहेत. नरेंद्र जाधव आहेत. डॉ. श्रीलु श्रीनिवासन आहेत आणि अर्थातच आम्हाला या सगळ्या कामामध्ये श्री. शरद काळे यांची खूप मदत आणि मार्गदर्शन होत असतं.



राष्ट्रीय पारितोषिक विजेत्यांची आपण यादी जर तपासली तर आपल्याला अक्षरशः हुज हू आहेत, असं जाणवेल. पाच-सहा नावे आपल्यापुढे सांगू इच्छितो. गेल्या वर्षी आपण नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अभिजीत बॅनर्जी यांना सन्मानित केलं होतं. त्याच्या आधी रघुराम राजन यांना सन्मानित केलं होतं. त्याच्याआधी प्राध्यापक एम. एम. शर्मा, नंदन नीलकेणी, विजय केळकर, रतन टाटा, झुबीन मेहता, डॉ. श्रीधरन अशी अनेक मान्यवर प्रतिष्ठानतर्फे आपण राष्ट्रीय पारितोषिकानी सन्मानित केलेली आहेत. अर्थात हे पारितोषिक निवडीचं काम तसं मोठं जिकरीचं आहे. कारण, त्याची एक ठरलेली प्रक्रिया आहे, ती अर्थातच त्याप्रमाणे आपण काम करतो. पण त्यातही कुणीही पारितोषिक विजेत्याची निवड करायची झाल्यास ती या मालिकेत चपखल बसेल अशा व्यक्तीची निवड करण्याचं आमचं ध्येय असतं.


विवेक सावंत

तर या सर्व चर्चेतून यावर्षी या निवड मंडळाने श्री. विवेक सावंत, ज्यांनी महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन ही संस्था स्थापन केली असून, ते या संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून

त्यांनी सुरूवातीपासून आत्ताआत्तापर्यंत काम केलं. तेही पायंडे पाडण्याच्या दृष्टिने खूप स्वत:च्या मनाचे पक्के असे ते व्यक्तिमत्व आहे आणि त्यांना किती जरी मनधरणी केली तरी त्यांना रिटायर व्हायचं होतं म्हणजे व्हायचं होतं. पण ते अजूनही एमकेसीएलचे एक प्रमुख मार्गदर्शक म्हणून काम करतायंत. एमकेसीएलची आपल्यापैकी बहुतेकजणांना माहिती असेल. तरीपण विवेक सावंत यांनी केलेलं कार्य आणि त्याचा आवाका लक्षात यावा, यादृष्टिनं मी आपल्याला थोडी माहिती सांगू इच्छितो. बऱ्याच वेळेला असं होतं, की हिंदीत अशी एक म्हण आहे, घर की मुर्गी दाल बराबर. त्यामुळे बऱ्याच वेळेला आपल्याला बाहेरच्या मोठ्या मोठ्या महनीय व्यक्तींचं खूप कौतुक जाणवतं. पण आपली जवळची मंडळी, त्यांचं मोठं काम दिसत नाही.

एमकेसीएल ही आज ही पाच हजार सेंटर्स, ज्याला म्हणतो आपण एएलसीज-ॲथोराईज्ड लर्निंग सेंटर्स असं एक मोठं नेटवर्क असलेली आणि ही एक पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप, कारण एमकेसीएलमध्ये महाराष्ट्र सरकारची गुंतवणूक आहे. महाराष्ट्रातल्या दहा विद्यापीठांची गुंतवणूक आहे आणि अर्थातच इतर संस्थांची आणि व्यक्तिगत लेवलवर लोकांची गुंतवणूक आहे. या संस्थेचं पाच हजारपेक्षा अधिक एएलसीचं जे नेटवर्क आहे, हे असल्या प्रकारचं मला वाटतं, की भारतातलं सर्वात मोठं नेटवर्क असावं. या नेटवर्कच्या थ्रू एमकेसीएल आयटी साक्षरता म्हणा, समाजासाठी उपयोगी तंत्रज्ञान कसं वापरता येईल यादृष्टिनं म्हणा किंवा शिक्षणाच्या क्षेत्रात म्हणा, खूप मोठं काम झालेलं आहे. आपल्याला आकडे जर द्यायचे झाले, तर आतापर्यंत सव्वा कोटी लोकांनी, बहुतांशी तरूण, पण इतरही व्यक्तींनी हे सर्टिफिकेशन साध्य केलेलं आहे. पण त्याचबरोबर जवळपास दीड कोटी युवा मंडळींना स्किलिंग, विविध कौशल्यांची सर्टिफिकेट दिलेली आहेत. दीड कोटी युवकांना स्कील्सबाबतीतलं ट्रेनिंग झालं आहे. आणि जे विविध उपक्रम आहेत, त्याच्यापैकी जवळपास २५ हजार युवा मंडळींना जिथे त्यांचे वास्तव्य आहे, जिथे ते राहतात, तिथेच त्यांना एकतर स्वरोजगार त्यांनी निर्माण केलांय किंवा त्यांना नोकऱ्या मिळाल्यात किंवा काही व्यवसाय सुरू करता आलांय. डिजिटल सर्व्हिसेस, आजकाल त्याचं



महत्त्व खूप वाढलेलं आहे आणि जवळपास दोन कोटी सामान्य माणसांपर्यंत डिजिटल सर्व्हिसेसच्या माध्यमातनं वेगळ्यावेगळ्या ज्या राज्य सरकारच्या योजना आहेत आणि त्यांचे फायदे लोकांपर्यंत पोचण्यासाठी म्हणून ते कसे उपयोग करू शकतील, याबद्दलचं डिजिटल एम्पावरमेंट जवळपास दोन कोटी लोकांपर्यंत पोचलेलं आहे.

एवढंच नव्हे, तर आपल्याला असं वाटतं, की ही संस्था फक्त महाराष्ट्रात आहे. पण या संस्थेचं काम महाराष्ट्राबाहेर पण तेवढंच विस्तृत आहे. एमकेसीएलच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या त्यांच्या सहयोगी कंपन्या हरियाणा, ओडिशा, राजस्थान, आसाम, छत्तीसगड, मध्य प्रदेश, बिहारमध्ये आहेत. तिथे स्कीलिंगवर मोठं काम एमकेसीएल चालवते. केवळ भारतातच नव्हे, तर भारताच्या बाहेर सुद्धा मलेशिया, श्रीलंका, सौदी अरेबिया याठिकाणी एमकेसीएलचा विस्तार आहे. आणि मला विशेष सांगायला आनंद वाटतो, की सौदी अरेबियामध्ये त्यांच्या परीक्षा घेण्याबाबत एमकेसीएलची मोठी ख्याती आहे. इतर परदेशी परीक्षा घेणाऱ्या ज्या संस्था आहेत, त्यांच्या तुलनेत त्यांना असं वाटलं, की एमकेसीएलची ही परीक्षा घेण्याची पद्धत अधिक सक्षम आहे.



हे झालं मागे झालेलं काम. सध्या आपण कोविड-१९च्या परिस्थितीतून जात आहोत. त्याचा एकूणच समाजावर, विशेषत: शिक्षणावर मोठा ताण आलेला आहे. समजा कोविडची परिस्थिती नसती तरी आपण जे ज्ञानयोगाकडे वळतो आहोत आणि आपल्याला एकूण समाजाला नवीन ज्ञानयुगाच्या दृष्टिनं सक्षम करण्याची जी अत्यंत गरज आहे, त्यादृष्टिनंसुद्धा खूप मोठं काम झालेलं आहे. उदाहरणार्थ, शिक्षकांचं ट्रेनिंग. आपण जे शिक्षकांचं ट्रेनिंग घेतो, त्याच्यामध्ये ते शिक्षक डिजिटल टेक्नॉलॉजी वापरून शिक्षण कसं देता येईल याच्याबद्दल ते सक्षम आहेत का, तर त्याचं उत्तर आपल्याला नाही असं द्यायला लागेल. पण नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून आणि अर्थातच एमकेसीएलनी हे सगळं तंत्रज्ञान विकसित केलेलं आहे. एक पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा ऑन इ एज्युकेशन इन डिजिटल सोसायटी या नावाचा एक अभ्यासक्रम, म्हणजे जसं बीएड शिक्षक बाहेर करतात, तसे बीएड शिक्षक पण डिजिटल टेक्नॉलॉजीमध्ये पण सक्षम आहेत, तर हा कोर्स चालू आहे. बारावीच्या मुलांना घेऊन कंपन्यांमध्ये त्यांचं ट्रेनिंग होतं, म्हणजे मुलं एका बाजूला शिकतात आणि एका बाजूला नोकरी करतात. गेली तीन वर्षे हा कार्यक्रम चालू आहे. पण शंभर टक्के लोकांना त्याच्यात नोकरी मिळते. म्हणजे डिग्री पण मिळते आणि नोकरी पण मिळते. शिक्षणाच्या बाबतीत असे बरेच उपक्रम आहेत. नुकतीच आत्ता एक टिलीमिली नावाची मालिका सह्याद्री वाहिनीवर शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी चालवली जात आहे. जवळपास दोन कोटी विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला.

तर असे अनेक समाजोपयोगी, समाजाला भविष्यासाठी अधिक सक्षम करण्यासाठीचे मोठे कार्यक्रम विवेक सावंत यांच्या पुढाकारानी आज चालू आहेत आणि म्हणून निवड समितीला असं वाटलं, की यावर्षीचा जो राष्ट्रीय पुरस्कार आहे, तो आपण विवेक सावंत यांना प्रदान करावा. तशी शिफारस केल्यानंतर प्रतिष्ठानचे अध्यक्ष माननीय शरद पवार यांनी त्याला मान्यता दिली आणि म्हणून मला हे नाव जाहीर करण्यात अत्यंत आनंद होतोय. धन्यवाद!

**लोकहितवादी मंडळाचे पदाधिकारी शरद पवार यांना पुस्तकांचा संच भेट देताना.**



# प्रतिष्ठानचा भाषेच्या सुधारणेवर काम करण्याचा प्रयत्न

## खासदार सुप्रियाताई सुळे यांचे उद्‌गार

प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नावाने पुरस्कार दिला जातो आणि यंदा तो नाशिकच्या संस्थेला मिळाला आहे. नाशिकची एक आगळी वेगळी ओळख साहित्य, कला, क्रीडा, भाषा या सगळ्यांमुळे, कुसुमाग्रजांनी एक वेगळी ओळख नाशिकला मिळवून दिली आणि तोच वारसा पुढं न्यायचं काम कै. विनायकराव पाटील आवर्जुन नाशिकमध्ये करायचे. कुठलाही कार्यक्रम, मग तो कुठल्याही पक्षाचा असो, धर्माचा असो, जातीचा असो, एक व्यक्ती नाशिकला ऑलराऊंडर होती, ते म्हणजे विनायकराव पाटील. आज मिटिंगला ते नव्हते आणि नाशिकला परत कधी गेल्यानंतर त्यांची कधीच भेट होणार नाही. मला आयुष्यभर नाशिकला गेल्यावर ते नसण्यामुळं जी पोकळी निर्माण झाली आहे, ती नेहमीच सगळ्यांच्या मनात राहील असं मला वाटतं. त्यांचा हसरा चेहरा, स्वभाव, एक अभ्यासू नेतृत्व आणि त्याबरोबरच एक माणुसकी, ही जी पोकळी आहे, मला वाटतं, की आपल्या सगळ्यांच्याच



आयुष्यात, माझ्यातरी आयुष्यात नक्कीच राहील. नाशिकला गेल्यानंतर विनायकराव पाटलांना भेटल्याशिवाय आमचा कोणाचाही दौरा पूर्ण झालेला नाही. एका हक्काच्या घराला फुलस्टॉप झाला आहे. नाशिकच्या आपल्या सेंटरमध्ये विनायकरावांच्या आठवणीच्या निमित्ताने आपण काहीतरी एक ॲक्टिव्हिटी वर्षभर केली पाहिजे, असं माझं तरी वैयक्तिक मत आहे. कारण, त्यांचं खूप मोठं योगदान फक्त नाशिक शहरापुरतं नाही, तर संपूर्ण राज्यात अनेक वर्षांच्या चव्हाण साहेबांनी जे काही मुलांमध्ये चांगलं टॅलेंट पाहिलं आणि ते नंतर नेते झाले, त्यामध्ये एक महत्त्वाचं नाव म्हणजे विनायकराव पाटील. त्यामुळं संस्थेलाही त्यांनी अनेक वर्षे जे योगदान दिले त्याला मी मानाचा मुजरा करते आणि त्यांच्या नावानं, आठवणीतून काहीतरी ॲक्टिव्हिटी चव्हाण सेंटरच्या नाशिकच्या टीमशी बोलून करावी असं मला वाटतं.

गेल्या वर्षभरात खरं तर मार्चपासून फार काही कोविडमुळं झालेलं नाही. १२ तारखेचा कार्यक्रम मागच्यावेळी माझ्यामुळं राहून गेला. कारण पार्लमेंटचं सेशन चालू होतं आणि त्यादिवशी एक महत्त्वाचं बील होतं त्यामुळं मला येता आलं नाही. त्यानंतर आज पहिल्यांदाच आपण सगळे भेटतोय. थोडक्यात आपल्याला सांगते, की गेली अनेक वर्षे जे कार्यक्रम आपण करतोय, त्यात सातत्य ठेवण्याचा प्रयत्न आम्ही केलेला आहे. मग तो सृजनचा कार्यक्रम असेल, शिक्षण विकास मंच असेल व महाराष्ट्र युवा अभियान असेल, अपंग हक्क विकास मंच, वसुंधरा, महाराष्ट्राचं महिला व्यासपीठ, कृषि व सहकार व्यासपीठ, कायदेविषयक सल्ला फोरम आणि यशवंतराव चव्हाणांचं जे जन्मस्थळ आहे देवराष्ट्रे, या सगळ्यांमध्ये कुठला ना कुठला एक कार्यक्रम तंत्रज्ञानाची मदत घेऊन झूमच्या माध्यमातून आम्ही करण्याचा प्रयत्न केलांय. सगळ्यात जास्त काम खरं झालं असेल तर ते शिक्षणावर झालं असेल. शिक्षण कट्टा जो आहे, त्यांनी अतिशय चांगले कार्यक्रम या गेल्या सहा महिन्यांत घेतले आहेत. कारण केंद्र सरकारचं शिक्षणाचं जे धोरण आलं, त्यावर अपेक्षेएवढी चर्चा खरं तर राज्यात झाली नाही. माध्यमांमध्येही आम्ही अनेक लोकांशी बोललो, पण आम्हाला जेवढी अपेक्षा होती, तेवढी चर्चा त्याची झाली नाही. महाराष्ट्र सरकारकडेही आम्ही सातत्यानं त्याचा पाठपुरावा करतोय, की हे नवीन शिक्षण धोरण जे झालंय ते नक्की कसं होणार आहे. खूप चांगले बदलही सुचवले गेले आहेत. त्यामुळं त्याच्यातही फुल ना फुलाची पाकळी काम करायचा प्रयत्न करतोय.

त्याचबरोबर यावर्षी आर. डी. प्रधानांचंही निधन झालं. जसं आपण चंद्रचूड साहेबांच्या नावानी एक ॲक्टिव्हिटी

करतोय, तसं ॲडमिनिस्ट्रेशनसाठी आर. डी. प्रधानांच्या नावानी काहीतरी ॲक्टिव्हिटी चव्हाण सेंटरनी करावी. कारण अनेकवेळा आम्ही जेव्हा वर्कशॉप्समध्ये भाग घेतो, तेव्हा लक्षात येतं, की नवीन कायदे असतील, किंवा अनेक वर्षांचे जे कायदे आहेत, म्हणजे मागच्या आठवड्यात एक वर्कशॉप घेतलं होतं आणि काही युवक आणि युवती त्याच्यात होते आणि लँड ॲक्वेजेशन कुणी करावं याच्यापासून ती सुरूवात होती. म्हणजे तुम्ही सोशल वर्क किंवा राजकारण किंवा समाजकारण करत असाल आणि त्याच्यात लँड ॲक्वेजेशन कोण करतं हेच जर तुम्हाला माहिती नसेल तर मला वाटतं, की आमच्या सगळ्यांचे हे अपयश आहे, की याचा अर्थ नवीन कायदे, धोरणं ही त्यांना माहिती असतात. पण बेसिक माहिती नसून, डायरेक्टली दहावीची परीक्षा देतायंत अशी असंही करायचा प्रयत्न आम्ही करतोय.

त्याचबरोबर डिजिटलायजेशन, म्हणजे आता विजय देसाईंच्या अनेक वर्षांच्या अतिशय उत्तम प्रयत्नांमुळे चव्हाण सेंटर हा फक्त एक हॉल नव्हता, तर सगळ्यांसाठी एक हक्काची वास्तू होती. तर ती वास्तू आणि त्याच्याबरोबर आता ती ऑनलाईन करण्याचाही प्रयत्न आम्ही सगळ्यांनी मिळून केलांय. विजय देसाईंनी अतिशय उत्कृष्ट असे एक मॉड्युल केलेलं आहे आणि १ डिसेंबरपासून सगळी जी बुकिंग यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला होतील ती आता ऑनलाईन होतील. तुम्हाला यावं लागणार नाही. तुमची जी काही रिक्वायरमेंट असेल ती तुम्हाला ऑनलाईन १ डिसेंबरपासून देण्याचं नियोजन आम्ही केलेलं आहे.

त्याचबरोबर एक महत्त्वाचा विषय सातत्याने म्हणजे




थोडीशी परिस्थिती आहे. त्याच्यामुळं हा एक कार्यक्रम, काहीतरी एक नवीन मॉड्युल तयार करण्याचा प्रयत्न आम्ही करतोय, की एक दोन-तीन दिवसांचं वर्कशॉपमध्ये ही जी सगळी माहिती प्रशासनाची असेल, मग त्याच्यानंतर तुम्हाला यूपीएससी करायचीय, व्यवसाय करायचांय, जरी व्यवसाय करायचा असला आणि फॅक्टरी टाकायची असेल तर लँड ॲक्वायर कोण करतं तुमच्यासाठी ही अगदी बेसिक गोष्ट आहे. तर याच्यातही काम करण्यासाठी प्रशासनातले काही रिटायर्ड लोक आहेत, जे संस्थेमध्येही अनेक वर्षे माननीय बी. के. अग्रवालजी आहेत, काळेसाहेब स्वत: त्यांचा प्रशासनाचा खूप मोठा अनुभव आहे, या सगळ्यांच मार्गदर्शन घेऊन काहीतरी छोटी एक कॅप्सूल आपल्याला तयार करता येईल का, जी ऑनलाईनही सगळ्यांना असेल, आमच्या सगळ्यांकडून मागे राहिला आहे. योगायोगानी नाशिकच्याच लोकांना इथे बक्षिस मिळतंय, की अंबरिश मिश्रा, ज्यांचं या कार्यक्रमाशी अनेक वर्षांचं प्रेमाचं नातं आहे. म्हणजे अंबरिश मिश्रा समोर दिसले म्हणजे १२ मार्च किंवा २५ तारीख ही हंड्रेड पर्सेंट लक्षात येते. त्यांना फोनही करावा लागत नाही आणि आम्हाला तो हक्काचा माणूस आहे. त्यांचं एक अतिशय उत्तम पुस्तक विमोचनाचा कार्यक्रम इथे झाला होता आणि त्यांनी खूप वेगळ्या पद्धतीनी कार्यक्रमाची सुरूवात केली. त्यांनी गझल लावली सुरूवातीला आणि आम्ही नेहमीप्रमाणं धावपळ करत त्या कार्यक्रमाला पोहोचलो आणि खरंच पहिल्यांदा ती गझल ऐकल्यानंतर आपली जी हार्टरेसिंग असते, ती शांत झाली आणि कार्यक्रम आम्ही खरंच सगळ्यांनी जास्त एन्जॉय

केला. तेव्हा चर्चेतून असं आमच्या सगळ्यांच्या लक्षात आलं त्या कार्यक्रमानंतर, की भाषा, भाषेसाठी महाराष्ट्र सरकारमध्ये एक वेगळं डिपार्टमेंट आहे. पण खरंच मराठी भाषा असेल, उर्दु भाषा असेल या सगळ्या भाषांवर प्रेम करणारे अनेक लोकं आहेत. पण पुढे त्याचं काय करायचं, त्यासंबंधी एक चर्चासत्र, टेलिव्हिजनवर राजकारणाबद्दल जी भाषा ऐकायला मिळते, त्याची मला कधी कधी थोडीशी भीतीही वाटते आणि काळजीही वाटते. कारण आम्ही भाषा सुधारली टाईम्स ऑफ इंडिया किंवा दूरदर्शनच्या बातम्या ऐकून.

आजकाल तुम्ही वर्तमानपत्र जेव्हा वाचता तेव्हा बातम्या, किंवा कुठल्याही चॅनेलच्या बातम्या ऐकता तेव्हा खरंच भाषेचा दर्जा आमच्या लहानपणीचा होता की नाही याचा विचार आपण सगळ्यांनी केला पाहिजे. मी एक पालक म्हणून सातत्याने तो करते. त्याच्यामुळं भाषेवर प्रेम करणारे जे लोकं आहेत, त्यांच्यासाठी काहीतरी वेगळी मेजवानी यशवंतराव प्रतिष्ठानने करावी. कारण चव्हाण साहेबांचं भाषेवर प्रचंड प्रेम होतं. मला कधी कधी वाटतं, की ते राजकारणी जास्त थोर होते, की एक रसिक म्हणून जास्त होते. का एक लेखक त्यांच्यामध्ये कुठेतरी लपलेला होता. कदाचित ते राजकारणात गेले नसते, तर एक सुंदर साहित्यिक झाले असते. त्याच्यामुळे भाषांवर मराठी असेल, उर्दु असेल, तर याच्यात माननीय अंबरिश मिश्रांची मदत घेऊन महिन्यातून एकदा भाषेसाठी आपण काहीतरी करावं का असा एक प्रयत्न जानेवारी महिन्यापासून आम्ही करायचा ठरवलेला आहे. मग त्याला पाच लोकं येऊ दे किंवा पन्नास लोकं येऊ दे. पण त्याच्यात रसिक, ज्याचं भाषेवर प्रेम आहे किंवा त्या भाषेबद्दल त्याला काही तरी आस्था आहे. महाराष्ट्र सरकारबरोबरही आमची चर्चा झाली आहे. माझी दिलीपराव वळसे पाटील आणि बाळसाहेब पाटील आपण उपस्थित आहात तर तुम्ही आम्हाला मार्गदर्शन करावं की महाराष्ट्र सरकारचं भाषेवरती काय व्हिजन आहे. आणि आम्ही संस्था म्हणून सरकारला काय मदत करू शकतो. ज्याच्यात रसिक भाषेसाठी येतील. म्हणजे बी. के. अग्रवाल समोर बसलेत म्हणून नाही, पण मुंबईतलं कुठलंही चांगलं नाटक असेल किंवा भाषण असेल तर त्या कार्यक्रमाला ते आवर्जुन उपस्थित असतात आणि ते इतके रसिक आहेत, की त्यांना अर्धे डायलॉग आधीच माहिती असतात. याच संस्कृतीमधून आपण मोठे झालेलो आहोत. त्याच्यामुळं भाषेवर प्रेम करणं आणि ती पुढं सादरी करण्याचं काम आज मला वाटतं, की आपल्या सगळ्यांच्याकडूनच कुठंतरी कमतरता होतेय. तेव्हा या सगळ्या ज्येष्ठांनी आम्हाला मार्गदर्शन करून भाषेसाठी आपण सगळ्यांनी मिळून काहीतरी केलं पाहिजे.

तर उर्दु आणि मराठी या दोन भाषांनी आम्ही सुरूवात करणार आहोत. आणखी काही भाषांसाठी बुक रिडिंग असेल असे काही आगळेवेगळे कार्यक्रम जर कुणालाही सुचवायचे असतील तर जरूर आपण ते करावेत आणि पुढच्या काही काळात, आता कोविडची लस येईल ते रोज टीव्हीवर बघतोय आपण, ती कधी येईल, सगळ्यांना कधी मिळेल याच्यासाठी केंद्र आणि महाराष्ट्र सरकार कार्यरत आहेतच, पण शेवटी आपण सगळ्यांनी त्याच्यावर मात करून त्यातल्या त्यात न्यू नॉर्मल हे आयुष्य कसं जगायचं आणि त्याच्यातून प्रेरणा घेऊन नवीन काहीतरी बदल आपल्या सगळ्यांना काही करावे लागणार आहेत, ते



करून आपली जी संस्कृती आहे, आपले जे साहित्य आहे, आपली जी कला आहे, ती सगळी जमवण्यासाठी जे काही करावं लागेल ते यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान त्याच्याबद्दल कटिबद्ध आहे. एवढा मोठा ऑडियन्स आज खरं तर मलाही अपेक्षित नव्हता, पण न घाबरता कुठेतरी आमच्यावर विश्वास ठेऊन आज इथे आलात. तुमचं पुन्हा एकदा मनापासून स्वागत करून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सगळ्या ॲक्टिव्हिटीजमध्ये तुमचं सहकार्य हे सगळ्यात मोठं असणार आहे. त्याच्यामुळे पुढच्या वर्षभरात तुमच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने कार्यक्रम सुरू ठेऊ, एवढंच आपल्याला वचन देऊन आपली रजा घेते. जयहिंद! जय महाराष्ट्र!!

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,मुंबई 'यशवंतराव चव्हाण

## मानपत्र

२०२० चा राज्यस्तरीय पुरस्कार १९५० मध्ये कवी कुसुमाग्रजांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या लोकहितवादी मंडळ, नाशिक या संस्थेला देण्याचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने ठरविले आहे. एरवी नाशिकची प्रसिद्धी एक धार्मिक तीर्थक्षेत्र व दर १२ वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याचे पवित्र ठिकाण अशी होती. स्वातंत्र्यपूर्व काळात

नाशिक हे क्रांतिकारक चळवळीचे केंद्र होते. १९५० मध्ये नाशिकला कायमच्या वास्तव्यासाठी आलेल्या कुसुमाग्रजांनी नाशिकमध्ये मराठी साहित्य आणि कला विचार यांच्या संवर्धनासाठी एक सांस्कृतिक संस्था स्थापन करण्याचे ठरविले. दिनांक २ सप्टेंबर १९५० रोजी अग्रणी समाजसुधारक व शतपत्रांचे कर्ते श्री. गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी यांच्या नावाने लोकहितवादी मंडळाचे उद्घाटन म.म. दत्तो वामन पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. तेव्हांपासून प्रामुख्याने नाट्यसंगीत, चित्रकला, शिल्पकला व अन्य कला तसेच साहित्यविषयक घडामोडी व सामाजिक विचारसरणीचा पाठपुरावा करणारे कार्य मंडळ पार पाडत आहे.

१९५० च्या डिसेंबरमध्ये श्री. राम गणेश गडकरी यांचे 'भावबंधन' हे नाटक सादर करण्यात आले. कुसुमाग्रजांनी त्याचे दिग्दर्शन केले होते. गेली सात दशके नाट्यक्षेत्रामध्ये मंडळाने लक्षणीय कार्य केलेले आहे. राज्य नाट्य स्पर्धेत मंडळाला जवळ जवळ दरवर्षी पारितोषिक मिळाले आहे. हिंदी आणि संस्कृतमध्येही मंडळाने नाटके सादर केली असून बालनाट्य आणि कामगार स्पर्धांमध्येही भाग घेतलेला आहे. मंडळाच्या या कार्यातून अनेक कला दिग्दर्शकांना, नवोदित लेखकांना, संगीत दिग्दर्शकांना तसेच प्रकाश योजना, रंगभूषा आणि नेपथ्य या क्षेत्रात काम करणाऱ्यांना आपली कला सादर करण्यास वाव मिळालेला आहे. २०१५ पासून मंडळाने नाटकाच्या अभिवाचन स्पर्धा घेतल्या आहेत. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे झाशी येथे किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या श्री गणेश मंदिरात जेथे झाशीच्या राणीचा साखरपुडा झाला होता अशा ऐतिहासिक ठिकाणी २०१२ मध्ये 'वीज म्हणाली धरतीला' या नाटकाचे अभिवाचन झाले.

विष्णु दिगंबर पलुसकर हे ख्यातनाम संगीत गुरू नाशिकला स्थायिक झाले होते. त्यांच्या स्मरणार्थ शास्त्रीय. उपशास्त्रीय व नाट्यसंगीत स्पर्धा मंडळातर्फे आयोजित केल्या जातात. संगीताला उत्तेजन देण्यासाठी मंडळाने अखिल महाराष्ट्र संगीत स्पर्धांचे आयोजन १९६७ पासून केले आहे. अनेक नामवंत गायकांच्या मैफिली आयोजित केलेल्या आहेत. तसेच नोव्हेंबर १९९९ मध्ये तीन दिवस अखिल भारतीय स्तरावर संगीत शिक्षक अधिवेशन आणि संमेलनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. संगीत क्षेत्राशी संबंधित इतर महत्त्वाचे कार्यक्रम, म्हणजे हार्मोनियम वादन, गीत स्वरलेखन कार्य शाळा, बासरी संवाद व ताल समर्पण संवाद असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. भारत सरकारने राष्ट्रीय सांस्कृतिक धोरण मसुदा तयार केला होता. त्यावर नाशिकला तीन दिवसांचा परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यावेळचे मराठी साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. य.दि. फडके यांच्या अध्यक्षतेखाली हा परिसंवाद झाला होता. त्याचे उद्घाटन ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक डॉ. शिवराम कारंथ यांनी

# राज्यस्तरीय पारितोषिक २०२०'लोकहितवादी मंडळ, नाशिक

केले होते. या परिसंवादामध्ये करण्यात आलेल्या मौलिक सूचना राज्य व केंद्र सरकारकडे पाठविण्यात आल्या.

साहित्य, सांस्कृतिक व सामाजिक विषयांशी संबंधित प्रश्नांवर विचार मंथन व्हावे यासाठी महात्मा फुले यांच्या नावाने जिल्ह्यात ग्रामीण भागात व्याख्यानमाला सुरु करण्यात आली. कालांतराने अशी व्याख्याने मंडळाच्या स्थापना दिनादिवशी आयेजित करण्यात येतात. कविता या साहित्य प्रकाराला साहजिकच मंडळाने विशेष प्रोत्साहन दिले आहे. त्यासाठी काव्यानुभव समिती गठीत करण्यात आली असून त्यामध्ये नामवंत कवी तसेच नवोदित कवी व बालकवी यांच्या काव्य वाचनाचा कार्यक्रम केला जातो.

१९९६ मध्ये मंडळाने कला विभाग सुरु केला. त्याचा शुभारंभ ख्यातनाम चित्रकार व माजी कला संचालक, श्री. बाबुराव सडवेलकर यांच्या हस्ते झाला. कला विभागीय उपक्रमांमध्ये पावसाळी सहल, गुरूशिष्य संवाद आणि कलाविषयक कार्यशाळा यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. मंडळाने वार्षिक चित्रकला शिबीर दोन वेळा आयोजित केले होते. १९९९ मध्ये पहिला राज्यस्तरीय कला मेळावा नाशिकला घेण्यात आला. लोकहितवादी मंडळाचे कार्य स्वतःच्या वास्तूमधून चालावे यासाठी नाशिक महानगरपालिकेने मंडळाला एक भूखंड काही अटींवर दिला. या वास्तूच्या उभारणीसाठी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी मुख्यमंत्री निधीतून भरीव अर्थ सहाय्य केले होते. महात्मा फुले यांचे कार्य स्मरणात असावे म्हणून व वास्तूच्या रचनेत छपरावर कलशाचे शिल्प असल्याने कुसुमाग्रजांनी या वास्तूस 'ज्योतीकलश' हे नांव दिले. ज्योतीकलश उभा आहे त्या परिसराला विशाखा प्रांगण हे नाव देण्यात आले. 'विशाखा' हा कुसुमाग्रजांचा प्रसिद्ध काव्यसंग्रह आहे हे लक्षात घेऊन नामकरण करण्यात आले आहे.

साहित्य क्षेत्रात ज्ञानपीठ पुरस्कार हा अतिशय सन्मानाचा पुरस्कार आहे. तो मराठीतील मोजक्याच साहित्यिकांना मिळाला आहे. कविवर्य कुसुमाग्रज यांना ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला तेव्हां मंडळाने भव्य अभिनंदन सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी कुसुमाग्रजांच्या मनातील साहित्य, सांस्कृतिक व सामाजिक जाणिवांना कायमस्वरुप देण्यासाठी कुसुमाग्रज प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले. प्रतिष्ठानच्या स्थापनेमध्ये मंडळाचे भरीव योगदान आहे.

कुसुमाग्रज हे मराठीतील नामांकित कवी व नाटककार आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग कामगिरीप्रमाणेच समाजाविषयी सजग व क्रियाशील विचारवंत म्हणून त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. विशेषतः मराठी भाषेचे संवर्धन व विकास यांचा ध्यास असलेले साहित्यिक म्हणून त्यांच्या जन्मदिवशी (२७ फेब्रुवारी) राज्य शासनातर्फे मराठी भाषा दिन साजरा केला जातो. नामवंत कवी व लेखकांचे स्वतःच्या एखाद्या कृतीशी अभिन्न नाते असते. उदा. केशवसुतांची 'तुतारी' ही कविता, राम गणेश गडकरी यांची 'क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणांचा' ही कविता, भा.रा. तांबे यांची 'मधुघट' व वि.स. खांडेकरांची 'ययाति' यांचा उल्लेख करता येईल. याप्रमाणे कुसुमाग्रजांच्या अनेक कविता जनमानसात खोल रुजलेल्या आहेत – उदाहरणार्थ 'गर्जा जयजयकार', 'वेडात मराठे वीर दौडले सात', 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात'. ज्यावेळी कवीचे काव्य आणि सामान्य वाचकाच्या भावभावना यांच्या तारा एकाच गतीने झंकारतात तेव्हांच ही किमया घडते. नाटककार वि.वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' मधील 'घर देता का घर' हे स्वगत असेच मराठी माणसाच्या मनात घर करुन आहे. कुसुमाग्रजांची एक साहित्यिक म्हणून अष्टपैलू कामगिरी लक्षात घेता व गेली सात दशके त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेचे बहुमोल कार्य लक्षात घेता या संस्थेला या वर्षीचा यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई'ला विशेष आनंद होत आहे.

एका अतिशय हृद्य समारंभाचे आपण सगळे आज साक्षीदार आहोत. खरं तर मला आज असं वाटतंय, की समोर आपली जी बसण्याची व्यवस्था केलीय, ती एखाद्या दृश्याचं डेकोरेशन असतं, अशा प्रकारचं चित्र आज मला दिसतंय. म्हणजे सुंदर पक्वानाच्या ताटाला रांगोळी घालावी असे सगळे एक हे तबक उभे केलेले आहेत. त्यामुळे करणार, की समोर ठेवलेल्या ट्रेमध्ये आपण दहा रूपये द्यावेत. दहा रूपयाच्यावर कुसुमाग्रज कोणाकडूनही काही घेत नसत त्या काळामध्ये. असे आठवडाभराचे दहा-दहा रूपये जमा झाले, की ते एकत्र करून त्यांच्या घराशेजारी असलेल्या हॉस्पिटलमध्ये, खेडेगावातून जे रूग्ण येतात, त्यांच्या नातेवाईकांची जेवणाची सोय व्हावी म्हणून तो जो



# नाशिकची सांस्कृतिक उंची वाढवण्यात 'लोकहितवादी'ची भूमिका महत्त्वाची

## हेमन्त टकले यांचे उद्गार

समारंभाला एक वेगळा दर्जा याच्यातून प्राप्त झालेला आहे.

या सगळ्या पुरस्कारांबद्दल बोलताना आदरणीय पवार साहेब जे बोलले, त्याच्यातला मला एक संदर्भ वाटतो, तो केवळ पवार साहेब आहेत म्हणून सांगतो इथे. ही सगळी मोठी माणसं पवार साहेब, पुढे पुढे जाताना लहान लहान होत गेलेली आम्ही बघितलीत. म्हणजे त्यांचं जे व्यापक क्षेत्र होतं, ते करत असताना सुद्धा आपण एका छोट्या बेटावर राहून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलं पाहिजे, हे लोकहितवादी मंडळ असेल, कुसुमाग्रज प्रतिष्ठान असेल, परंतु त्यांनी शेवटच्या काळात एक छोटीशी संस्था काढली होती स्वत:, त्याला कोणीच पदाधिकारी नव्हते. कोणत्या मिटिंग व्हायच्या नाहीत, ट्रस्ट नव्हता. त्याचं नाव होतं सप्रेम. त्यांच्याकडे जे जे भेटायला येत, म्हणजे अगदी पवार साहेब आले, तरी त्यांची भेट झाल्यावर ते पवार साहेबांना विनंती



काही चार-पाचशे रूपयाचा निधी असेल, तो त्यांच्यापर्यंत पोहोचवायचा हे काम कुसुमाग्रज अखेरपर्यंत करत होते.

ही शिकवण असलेले लोकहितवादी मंडळ. आणखी एक खासगी गोष्ट सांगतो पवार साहेबांची. एका दौऱ्यात नाशिक वगैरे भागात आम्ही फिरत असताना सहज आम्ही म्हटलं, की तुमचं नाशिकवरती जरा जास्तीच प्रेम आहे, असं मला वाटतं. तर साहेबांनी मला सांगितलं, की हे तुमच्या-आमच्यात ठेवायचं, बाहेर बोलायचं नाही कुठे. साहेबांनी सांगितलं, मला दोन गावं महाराष्ट्रातली अशी होती, की जिथं मला माझं घर असावं असं वाटत होतं. त्याच्यामध्ये एक कोल्हापूर आणि दुसरं नाशिक. साहेब, आमची सगळ्यांची घरं नाशिकची ही तुमचीच घरं आहेत. त्यामुळे तुम्ही नाशिकला केव्हाही या, लोकहितवादी मंडळाचं हे सगळं कार्य तुम्हाला जवळून बघता येईल. तुम्ही आतापर्यंत दिलेल्या संस्थात्मक उभारणीमध्ये एक धागा मला तुमच्यामध्ये चव्हाण साहेबांपासून चालत आलेला आणि कुसुमाग्रजांसारख्या लोकांनी तो गावोगावी जपलेला वाटतो, की सगळ्या या सामाजिक कार्याची संस्थात्मक उभारणी आणि त्याच्यामधलं योगदान. त्यामुळं आज संस्था उभारणी, एकदा चव्हाण साहेब नाशिकला एका सार्वजनिक वाचनालयाच्या कार्यक्रमाला आले होते आणि त्यावेळच्या भाषणात मला वाटतं, सार्वजनिक वाचनालयाचा शतकमहोत्सव होता आणि त्यावेळेला चव्हाण साहेबांनी भाषणात सांगितलं होतं, की एखादं गाव श्रीमंत आहे, समृद्ध आहे ते कसं समजायचं. उंच उंच इमारती, टॉवर्स किती आहेत, मोठाली हॉटेल्स किती आहेत, मोठाल्या शाळा किती आहेत, या सगळ्यावर त्याची उंची मोजायची, का या शहरामध्ये संस्था किती काळापासून रूजलेल्या आहेत, त्याच्यावर त्या शहराची सांस्कृतिक उंची अवलंबून असते आणि ही उंची नाशिककरांना देण्यासाठी लोकहितवादी मंडळाने फार मोठी भूमिका बजावलेली आहे.

मला तर खरं आज भरून आलेलं आहे. हा सगळा समारंभ मला एका वेगळ्या पातळीवर घेऊन गेला असं वाटतं. मघाशी उल्लेख झाला. पुनरूक्ती होईल. पण विवेक सावंतांची जी निवड आपण केलीत काकोडकर साहेब, त्या सगळ्या मागचा, बिहाईंड द एव्हरी सक्सेस म्हणतात तसा माणूस म्हणजे आमचे दिलीप वळसे पाटील होते. त्यामुळे क्रांती करण्यामागे त्यांचाही मोठा हात होता. आपण सगळेजण प्रतिष्ठानच्या या कार्यक्रमाला आल्याचा आम्हाला खूप आनंद झालेला आहे. पण सुप्रियाताईंनी आपल्या भाषणामध्ये काही नवे उपक्रम आजच्या दिवसानिमित्त सांगितलेत. त्यामध्ये आपण सहभागी होऊ शकता आणि आत्ता जे सगळं ऑनलाईन प्रकरण सुरू झालंय, जे मला फारसं करता येत नाही, पण आपल्यापैकी बऱ्याच जणांना करता येतंय तर तुम्ही प्रतिष्ठानचे सहकारी म्हणून ऑनलाईन अनेक सूचना करू शकता. त्याचा अधिकाधिक समावेश करण्याचा आम्ही नक्की प्रयत्न करू. आपण असेच वारंवार येत राहा. आमच्या कार्यक्रमाची शोभा वाढेल त्यामुळे आणि आमचीही सांस्कृतिक उंची एखाद्या इंचाने का होईना वाढते, असाच माझा अनुभव आहे. आपल्या सगळ्यांचे मनापासून आभार मानतो आणि थांबतो.








# उनके मुख में राम... दिल में नथुराम!

–अनंत










> “आपल्या भाषणाचा नाट्यमय शेवट करताना आणि या विध्वंसक शक्तींचे वर्णन करताना शरद पवार म्हणाले, ‘अध्यक्ष जी , इनके मुख में राम है मगर दिल में नथुराम है!’ त्यांनी हे वाक्य उच्चारताच संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. जे काँग्रेसचे खासदार मरगळलेल्या अवस्थेत बसले होते त्यांच्यात ‘जान’ येऊ लागली.”







काही योगायोगाच्या गोष्टी असतात. पत्रकार नेहमी काहीतरी नवीन-नवीन अँगल शोधतच असतात. शरद पवार यांचा वाढदिवस १२ डिसेंबरला असतो. त्यांच्या वाढदिवसाच्या सहा दिवस आधीचा दिवस ६ डिसेंबर! हा दिवस दोन घटनांसाठी ओळखला जातो. राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन ही या दिवसाची मूळ ओळख. पण ३६ वर्षांनी याच दिवशी 'अयोध्याकांड' झाले आणि बाबरी मशिदीच्या वास्तूबरोबरच या देशातील सर्वधर्मसमभावही उद्ध्वस्त व नष्ट करण्यात आला. अतिशय सुनियोजित पध्दतीने हा प्रकार करण्यात आला होता.

पण, या प्रकाराची आठवण आणि पवारांचा वाढदिवस यांचा संबंध काय असा प्रश्न विचारला जाईलच. त्याचीच ही कहाणी! सध्या 'अयोध्याकांड' करणाऱ्यांचे वारसदारच राज्यकर्ते आहेत. म्हणूनच ही आठवण!

६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्यात आली. ते कसे घडले या इतिहासात आता जाण्याचे कारण नाही. परंतु त्यावेळी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात पवार संरक्षणमंत्री होते. त्यांना परिस्थितीचा अंदाज होता आणि त्यांनी त्यांच्या पध्दतीने लावलेल्या 'फील्डिंग'मध्ये या घटनेचे सर्व तपशील कैद करण्यात त्यांनी यश मिळवले होते. त्या तपशीलांवरुन ही वास्तू पाडण्याचे कसे नियोजनबध्द कारस्थान होते हे लक्षात येत होते. अर्थात ही वेळ त्या तपशीलात जाण्याचीही नाही.


यानंतर केंद्र सरकार आणि काँग्रेस पक्षाच्या पातळीवर झालेल्या वेगवान घडामोडीत पवार यांची भूमिका निर्णायक राहिली. त्यावेळचे प्रमुख नेते आता काळाच्या पडद्याआड गेले आहेत. नरसिंह राव, अर्जुनसिंग, शंकरराव चव्हाण, राजेश पायलट, माधवराव शिंदे अशी अनेक नावे घेता येतील. पण या नाट्यमय घडामोडीतील पवारांच्या भूमिकेची आठवण होणे वर्तमान राजकीय स्थितीत अपरिहार्य आहे.

बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्यानंतर उत्पन्न संकटाचा एकजुटीने मुकाबला करण्याऐवजी काँग्रेस पक्षात नरसिंह राव यांनाच पदच्युत करण्याच्या हालचाली सुरु झाल्या होत्या. परंतु व्यावहारिक दृष्टीने ते शक्य नव्हते. सोनिया गांधी यांचा आशीर्वाद असल्याचा दावा करणाऱ्या अर्जुनसिंग यांना राव यांना तत्काळ हटविण्याची घाई झाली होती पण त्यांना यश आले नाही. या सर्वच घटनाक्रमात काँग्रेस पक्ष, संघटना, कार्यकर्ते, खासदार हे गलितगात्र व हतबुध्द झाले होते.




बिगर-भाजप विरोधी पक्ष विलक्षण आक्रमक होते. त्यावेळी संसदेत त्यांची संख्याही लक्षणीय होती आणि तालेवार नेते व वक्तेही होते. भाजपच्या खासदारांमध्ये धास्तावलेपण होते. अटलबिहारी वाजपेयी संसदेत मोर्चा सांभाळत होते.

अयोध्या घटनेनंतर लोकसभेची बैठक सुरु झाली तेव्हा सभागृहात खरोखर सुतकी व भकास वातावरण होते.



सय्यद शहाबुद्दिन यांच्यासारखे सदस्य संतप्त-उद्विग्न होते. या वातावरणातच चर्चा सुरु झाली. बिगर भाजप पक्षांमध्ये सोमनाथ चटर्जी, इंद्रजित गुप्त, नीतीशकुमार, रामविलास पास्वान, सय्यद शहाबुद्दिन, विश्वनाथ प्रतापसिंग असे एकाहून एक वक्ते होते. काँग्रेसकडून प्रथम अर्जुनसिंग बोलले. अतिशय फर्ड्या इंग्रजीत त्यांनी या घटनेवर भाष्य केले. परंतु त्यांचे भाषण प्रभावी झाले नाही. यानंतर विरोधी पक्षांना क्रमाने संधी मिळून पुन्हा सत्तारूढ काँग्रेसचा क्रमांक आला. यावेळी शरद पवार बोलायला उभे राहिले. सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांनी हिंदीत भाषणाला सुरुवात केली. बाबरी मशीद उद्ध्वस्त करण्याची योजना कशी आधीच निश्चित करण्यात आलेली होती व किती नियोजनबध्द रीतीने ती पाडण्यात आली याचे विविध दाखले देत त्यांनी भाषण केले. ज्यांनी कोर्टात प्रतिज्ञापत्रावर या वास्तूच्या रक्षणाची हमी दिली होती त्यांनी त्याचे पालन केले नाही आणि एकप्रकारे विश्वासघात केल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या भाषणाचा नाट्यमय शेवट करताना आणि या विध्वंसक शक्तींचे वर्णन करताना ते म्हणाले, 'अध्यक्ष जी , इनके मुख में राम है मगर दिल में नथुराम है!'

त्यांनी हे वाक्य उच्चारताच संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. जे काँग्रेसचे खासदार मरगळलेल्या अवस्थेत बसले होते त्यांच्यात 'जान' येऊ लागली. आणि मग सभागृहातील वातावरण, नूर पालटत गेला. सर्वच सदस्यांनी भाजपला खरी-खोटी सुनावली. पण वातावरणाला कलाटणी देणाऱ्या शब्दांचा



उच्चार करणारे पवार होते!

पवार यांच्या राजकीय हालचालींचा आदमास सहसा लागत नाही अशी गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सर्वांची पक्की समजूत आहे. असे असले तरी त्यांच्या काही भूमिका स्पष्ट आहेत आणि त्यामध्ये आतापर्यंत तरी बदल झालेला आढळत नाही.

प्रत्येक राजकीय पक्षाबद्दल त्यांचे असे विश्लेषण असते आणि त्यानुसारच त्यांची पावले पडत असतात. २००४च्या लोकसभा निवडणुकीपूर्वीचा हा प्रसंग असाच स्मरणात राहिलेला आहे. २००४च्या लोकसभा निवडणुका एप्रिल ते मे महिन्यात झाल्या. परंतु या निवडणुकांची पूर्वतयारी तीन-चार महिने आधीपासूनच सुरु होत असते. विशेषतः राजकीय पक्षांच्या आघाड्या, जागावाटपाची बोलणी, नवनवीन राजकीय समीकरणे हे सर्व तीन-चार महिने आधीपासूनच सुरु झालेले असते.

१९९९ मध्ये पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली होती आणि महाराष्ट्रात त्यांनी काँग्रेसबरोबर आघाडी सरकार स्थापन केले होते. साहजिकच २००४च्या लोकसभा निवडणुकीत दोन्ही पक्ष आघाडी म्हणून संयुक्तपणे लढविणार की स्वतंत्रपणे लढणार अशी चर्चा रंगत होती. दोन्ही पक्षांचे राज्यात संयुक्त सरकार असले तरी १९९९च्या निवडणुका दोन्ही पक्षांनी विरोधात लढविल्या होत्या. त्यामुळेच २००४च्या लोकसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागलेले होते. दोन्ही पक्षांकडून लोकसभा निवडणूक संयुक्तपणे लढविण्याचे संकेत दिले गेले होते. परंतु त्यावर अधिकृत शिक्का मारण्यात आलेला नव्हता. काँग्रेसने पवार यांच्याशी बोलणी करण्यासाठी त्यांच्या तीन-चार वरिष्ठ नेत्यांची समिती नेमली होती.

यावेळी केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार सत्तेत होते. प्रमोद महाजन या सरकारमधील एक अत्यंत महत्वपूर्ण असे मंत्री होते. सरकारतर्फे केल्या जाणाऱ्या राजकीय निर्णयात त्यांची भूमिका महत्वाची असे. डिसेंबरच्या अखेरच्या आठवड्यातील हा प्रसंग आहे. लोकसभा निवडणूक एप्रिलमध्ये म्हणजे तीन महिन्यांवरच होती. त्यामुळे आघाड्या, हातमिळवण्या या सर्व चर्चा सुरु झालेल्या होत्या.



याचवेळी राम कापसे यांची अंदमान-निकोबारचे नायब राज्यपाल म्हणून नियुक्ति करण्यात आली होती. त्यांच्या शपथविधीला महाजन गेले होते. एका खासगी विशेष विमानाने ते गेले होते. एक मराठी व्यक्तीची नेमणूक झाल्याने त्यांनी या विमानातून दिल्लीतल्या मराठी पत्रकारांनाही नेले होते. त्यात मी समाविष्ट नव्हतो.

याच दिवशी पवार हे दिल्लीत काही कामासाठी आले होते. त्यावेळी ते ६ गुरुद्वारा रकाबगंज याठिकाणी रहात असत. दिल्लीतल्या डिसेंबर अखेरीच्या कडक थंडीचे ते दिवस होते. पवार आल्याचे समजल्यानंतर त्यांच्या भेटीची वेळ मागितली. इतर

कुणी मराठी पत्रकार त्यादिवशी दिल्लीत नसल्याने (ते अंदमानला गेले होते) त्यांना एकट्याने भेटता येणार होते. त्यांच्याकडून काहीतरी बातमी काढून इतरांवर 'कुरघोडी' करण्याची संधीही होती. नेमके त्याच दिवशी पतंगराव कदम हेही काही कामासाठी दिल्लीला आले होते. ते महाराष्ट्र सदनात थांबले होते आणि त्यांनी नाश्त्यासाठी बोलावले असल्याने सकाळीच त्यांना भेटायला गेलो. तेथे आगामी लोकसभा निवडणुकीची रणनीती, राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आघाडी होणार की नाही अशी चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर बोलणी करण्यासाठी नेमलेल्या समितीत पतंगरावही होते. बोलण्याच्या भरात पवार दिल्लीत असल्याचा विषय निघाला. मग काय पतंगराव तत्काळ त्यांना भेटायला गेले. माझ्यातल्या वार्ताहरासाठी ही घडामोड महत्वाची होती. मी पतंगरावांना सांगितले तुम्ही भेटून या तोपर्यंत मी महाराष्ट्र सदनातच थांबतो. तासाभराने ते परतले. पुन्हा चहापाणी झाले परंतु काँग्रेस व राष्ट्रवादीची आघाडी होणार की नाही याबाबत काही ठोस माहिती त्यांच्या बोलण्यातून मिळू शकली नाही. परंतु आघाडी होईल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

या गप्पा होईपर्यंत पवार यांना भेटण्याची वेळ झालेली होती. मग थेट पवार यांच्या निवासस्थानी गेलो. सुदैवाने ते एकटेच होते. काही अवांतर गप्पा झाल्यानंतर मूळ विषयावर चर्चेची गाडी आणण्याचा प्रयत्न सुरु केला. कारण पवारांना एखाद्या विषयाला बगल द्यायची असेल तर ते इतर अनेक विषय काढून गप्पा मारायला लागतात. तेव्हाच समजायचे असते की आज त्यांना या विषयावर बोलायचे नाही! परंतु पत्रकाराला चिकाटी किंवा काहीसा निगरगट्टपणा दाखवावाच लागतो.

इकडच्या तिकडच्या विषयांवरुन मी गाडी पुन्हा संभाव्य आघाडीबाबतच्या मुद्यावर आणली की 'बघू, अजुन वेळ आहे' एवढेच उत्तर ते देत. अखेर त्यांना काहीसे चिडविण्याच्या हेतुने 'तुम्ही भाजपबरोबर जाणार असल्याची चर्चा आहे' असेही म्हणून बघितले परंतु ते ताकास तूर लागू देत नव्हते. अखेर पत्रकाराचे शेवटचे अस्त्र बाहेर काढले की तुम्ही काहीच बोलणार नसाल तर आम्हाला जे आकलन होते त्यावर आधारित बातमी देऊ. तरीही ते बधले नाहीत. माझे प्रतिस्पर्धी दिल्लीत नसताना मला बातमी 'स्कोर' करायची होती आणि त्याचा निर्णय करणारी व्यक्ती साक्षात समोर असूनही बोलायला तयार नव्हती. तगमग वाढत चालली होती. तोपर्यंत त्यांच्या विमानाची वेळ झाली होती. ते पुण्याला जाणार होते. बोलत बोलत बाहेर आलो. ते गाडीत बसले. एक पाय गाडीत ठेवून ते क्षणभर उभे राहिले. हसले आणि त्यांनी एक-दोन वाक्ये उच्चारली. मी म्हटलं 'फायनल ?' ते 'हो' म्हणाले. गाडीत बसले आणि विमानतळाकडे निघाले.



माझ्या मेहनतीचे सार्थक झाले असे वाटायला लागले. ऑफिसला आलो आणि बातमी लिहिली व 'सकाळ'ला पाठवून

दिली. 'आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचा समझोता होणार' अशा आशयाची ती बातमी होती. दरम्यान, सायंकाळपर्यंत महाजनांबरोबर गेलेले पत्रकार परतले होते. त्यांनी वेगळीच व धक्कादायक माहिती दिली. या पत्रकारांना भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात लोकसभा निवडणुकीसाठी समझोता होणार, जागावाटपाची बोलणी शेवटच्या टप्प्यात आहेत आणि बहुधा उद्याच त्यावर शिक्कामोर्तब केले जाऊ शकते अशी माहिती मिळाली होती. ही माहिती ऐकून अक्षरशः घाम फुटला आणि हबकून गेलो. परंतु माझे पवारांशी बोलणे झाले होते व ते ज्या पध्दतीने बोलले होते त्यावरुन ते माझी दिशाभूल करणार नाहीत याची निश्चित खात्री होती. माझी बातमी मागे घ्यायची काय असा विचारही मनात डोकावून गेला. परंतु मी बातमी देताना एक पळवाट ठेवताना प्रश्नचिन्ह राखलेच होते. त्यामुळे फारसे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेतलेली होती.

दुसरा दिवस उजाडला आणि ती बातमी आली............! ज्या पत्रकारांना भाजप-राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य समझोत्याची माहिती मिळालेली होती ती प्रत्यक्षात येत नसल्याचे सांगण्यात आले. ते ऐकल्यानंतर खऱ्या अर्थाने सुटकेचा निःश्वास टाकला. माझी बातमी खरी ठरली होती. २००४च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच निवडणूक समझोता झाला होता. परंतु गाडीत बसताबसता पवारांनी जी 'हिंट' दिली ती 'अचूक' होती आणि माझी बातमी खरी ठरण्याचे श्रेय त्यांनी दिलेल्या त्या 'हिंट'लाच द्यावे लागेल.

शरद पवार हे नाव केवळ राजकारणपुरते मर्यादित नाही. खेळ-क्रीडा, शिक्षण, साहित्य असे अनेक विविधांगी पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वाला आहेत. एकदा त्यांनी एक मराठी नियतकालिक दाखवले. हे नियतकालिक केवळ अन्य भाषातील उत्तमोत्तम व दर्जेदार साहित्याच्या मराठी अनुवादाला वाहिलेले होते. या नियतकालिकाला त्यांनी संपूर्णपणे मदत केली होती. काही वर्षांपूर्वीच त्यांनी सांगितले होते की त्यांच्या वयाची जेवढी वर्षे होतील तेवढे टक्के ते सामाजिक कार्याला देतील. म्हणजेच आता ८०व्या वर्षी ते सामाजिक कार्याला ८० टक्के वेळ देणार हे स्पष्ट आहे. राजकारणात राहूनही त्यांनी समाजकारणाची कास कधीही सोडली नाही. अयोध्याकांडानंतर मुंबईत भयानक दंगली झाल्या. त्या दंगलीमुळे समाजातल्या माणुसकी व मानवतेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. समाजात पुन्हा सामंजस्य आणि संयम व सहिष्णुतेची भावना वाढीस लागण्यासाठी काही प्रयत्न करण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली. त्यासाठी काय करता येईल याची एक कल्पनाही त्यांनी मांडली. त्यामध्ये समाजात आदरणीय आणि सन्माननीय अशा काही प्रमुख सामाजिक व राजकीय व अन्य क्षेत्रातील नामवंत मंडळींचा गट स्थापन करणे, त्यांच्यातर्फे ठिकठिकाणी सभा-संमेलने करणे आणि त्याच्याच जोडीला सामाजिक सलोख्याला बळकटी आणणाऱ्या लहानलहान पुस्तिका तयार करुन त्यांचे वाटप करणे अशा गोष्टींचा समावेश होता. ही जबाबदारी त्यांनी बबनराव ढाकणे यांच्याकडे दिली आणि त्यांना मदत करण्यास आम्हा काही पत्रकारांना सांगितले. तीन-चार दिवस बसून अशा मंडळींच्या नावांची यादी करणे, पुस्तिकांचे विषय असा कच्चा आराखडा करुन त्यांना दिला. त्यानंतर काहीच दिवसात त्यांनी या मंडळींतर्फे काही सभा करविल्या आणि समाजात काहीशी शांतता निर्माण होण्यास



त्यामुळे मदत झाली.

कोणत्याही संकटात डगमगून न जाणे हा त्यांचा स्वभाव आहे. संकट आल्यानंतर काही राजकीय नेते एकदम कोषात जातात. पण पवार त्यातले नाहीत. त्यांचे त्याबद्दलचे म्हणणे नमूद करण्यासारखे आहे. 'लोकांवर जेव्हा संकट येते तेव्हा प्रथम ते प्रचंड भडकतात. त्यांच्या रागाचे पहिले टार्गेट सरकार असते आणि राजकीय नेते असतात. अशा वेळी माघार घेऊन चालत नाही. थेट त्यांच्यात जाऊन बोलायला सुरुवात करायची. सुरुवातीला ते खूप चिडून काहीबाही बोलतात. शिव्या देतात. ते शांतपणे ऐकून घ्यायचे. पण राग शांत झाला की तेच मग सांगायला लागतात की साहेब, आमच्याकडे ही अडचण आहे. ती वेळ असते ॲक्शनची. तत्काळ नेत्याने त्या माणसाच्या अडचणीचे अधिकाऱ्यांना पाचारण करुन निवारण करायचे असते. हे समोर दिसले की मग इतर मंडळीही शांत व्हायला लागतात आणि मग प्रशासनही हलायला लागते आणि लोकही सहकार्य करायला लागतात! मूळ गोष्ट काय ? तर लोकांच्या शिव्याही खायची तयारी ठेवा!'

नाबाद ८० तर त्यांनी फटकावल्या आहेत पण अजुनही त्यांच्याकडून लोकांच्या असलेल्या अपेक्षा संपलेल्या नाहीत. हा त्यांच्या जिवंत राजकारणाचा साक्षात पुरावा आहे. जॉर्ज फर्नांडिस यांची पहिली पुण्यतिथि जानेवारी-२०२० मध्ये झाली. त्यासाठी ते आवर्जुन आले होते. त्यावेळी तेथे विविध क्षेत्रातील लोक उपस्थित होते. त्या सामाजिक कार्यकर्ते, वकील, शिक्षणक्षेत्रातील काही नामवंत यांचा समावेश होता. तय सर्वांनी एकच अपेक्षा





व्यक्त केली होती की त्यांनी पुढाकार घेऊन देशाच्या मार्गदर्शकाची भूमिका पार पाडावी. देशातील सद्यःस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. कट्टर बहुसंख्यकवाद या देशाच्या मूलभूत रचनेलाच उद्ध्वस्त करु पहात आहे. विरोधी पक्षांमध्ये या विचारसरणीच्या भयंकर अशा ताकदीला तोंड देण्याइतकी क्षमता राहिलेली नाही. परंतु त्यांना एकत्र करुन एक नवी पर्यायी शक्ति उभारण्यासाठी पवार यांनी पुढे यावे अशी भावना एकमुखाने या मंडळींनी व्यक्त केली. त्यांची अपेक्षा चुकीची नाही. त्या अपेक्षापूर्तीची प्रतीक्षा सर्वचजण करु यात!







डॉ. सुधीर भोंगळे यांजकडून


# परंपरेचे वारसदार शरद पवार

**थोर समाजसुधारक महात्मा फुले, छत्रपती राजर्षी शाहु महाराज, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहुजनांच्या शिक्षणाचे कैवारी कर्मवीर भाऊराव पाटील आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांचा वैचारिक वारसा जाणीवपूर्वक जोपासून तो सातत्याने पुढे नेण्याचे काम मा. शरद पवार यांनी आयुष्यभर मनापासून व प्रामाणिकपणे केले आहे. त्यामुळे या विचारांचे वारसदार या भावनेने देश त्यांच्याकडे मोठ्या आशेने पाहतो आहे. विविध समारंभामधून पवार साहेबांनी या थोर व्यक्तींविषयी जे विचार भाषणातून व्यक्त केले त्यातले काही विचार येथे उद्घृत करीत आहे.**

### १) महात्मा फुले स्मृतिशताब्दी समारंभ

तारीख – ५ जानेवारी, १९९१
ठिकाण – बारामती
आयोजक – म. फुले स्मृतिशताब्दी महोत्सव समिती
अध्यक्ष – शाम वानखेडे, कृषि राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

## शरद पवार यांचे भाषणातील ठळक विचार







ज्योतीबांनी समतेचा विचार समाजापुढे प्रखरपणे मांडून व सर्वत्र पोहचवून लोकांमधला आत्मविश्वास वाढविण्यासाठी व वैज्ञानिक दृष्टी निर्माण करण्याकरिता अथक परिश्रम केले. त्यासाठी लब्ध प्रतिष्ठितांशी संघर्षही केला. म्हणून त्यांचे स्मरण करणे अत्यावश्यक आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व दीनदलितांचे कैवारी असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महात्मा फुले यांना गुरू मानीत असत. या गुरू-शिष्यांचे स्मरण आज देशभर होते आहे ही अत्यंत आनंदाची व समाधानाची गोष्ट आहे. बहुसंख्य व बहुजन समाज आणि विशेषतः महिलांना शिक्षणापासून वंचित ठेवल्यामुळे म. फुले यांना मनापासूनची अस्वस्थता होती. उपेक्षित समाज शिकून शहाणा झाला पाहिजे हाच त्यांना ध्यास होता. यासाठी शिक्षणाचा प्रसार करण्याची भूमिका त्यांनी तळमळीने मांडली. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होऊन ते महिला, आदिवासींपर्यंत पोहोचले पाहिजे ही भूमिका त्याकाळी म. फुले यांनी मांडली होती. शंभर वर्षांपूर्वी केवढी ही दूरदृष्टी!


नवीन शैक्षणिक ज्ञान समाजात जोपर्यंत प्रसूत होत नाही तोवर अज्ञान, अंधश्रद्धा व रूढी जाणार नाहीत. चालिरीती नष्ट होणार नाहीत. समाज शिकला, शहाणा झाला तर स्वतंत्रपणे विचार करू लागेल. महात्मा फुले यांचा देशाच्या स्वातंत्र्य चळवळीला विरोध होता हे खरे नाही. सामाजिक सुधारणा करून जागृत समाज काँग्रेसच्या प्रवाहात सामील करायचा असे म. फुले यांनी ठरविले होते. त्यातूनच शंभर वर्षांपूर्वी त्यांनी शेतीमालाचे अधिक उत्पादन वाढविण्यासाठी संकरित बियाण्यांचे वाण तयार करण्याची मागणी केली होती. संकरीत गायींचीही परदेशातून आयात करुन पैदास वाढविण्यासंबंधी त्यांनी आग्रहीपणे भूमिका मांडली होती. एवढा विज्ञानाचा

पाठपुरावा व दूरदृष्टीचा तो नेता होता म्हणून त्याला 'महात्मा' ही पदवी बहाल करण्यात आली. शेतकऱ्यांच्या मुलांनी उद्योगधंद्यात लक्ष घातले पाहिजे असे त्यांना वाटत होते. म्हणून पूना इंजिनीयरींग कंपनी त्यांनी काढली. खडकवासला धरणाचा पाया आणि कात्रजचा बोगदा खोदण्याचे काम म. फुले यांच्या कंपनीनेच केले. दलित, शेतकरी, महिला यांच्या प्रश्नांबाबत फुले दांपत्याने सातत्याने भूमिका मांडली यासाठी त्यांना प्रचंड त्रास व छळ सोसावा लागला. पण ते डगमगले नाहीत आणि मूळ विचार व ध्येयापासून तसूभरही ढळले नाहीत. त्याकाळी त्यांनी जे विचार आग्रहीपणाने मांडले ते महाराष्ट्राला तारणारे होते. आजही ते अत्यंत उपयुक्त आहेत.



फुले-आंबेडकर यांनी जो समतेचा विचार सांगितला त्याला महाजनांनी प्रतिसाद दिला म्हणून येथे दंगली झाल्या नाहीत. मंडल आयोगाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची आमची मनोमन इच्छा आहे आणि तिच खरी फुले-आंबेडकरांना आदरांजली ठरणार आहे. यासाठी पुढच्या ८ तारखेला सर्वविरोधी पक्षांची बैठक आम्ही बोलविली आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेपणाचा विचारही आयोगाने केलेला आहे. फुले यांनी सांगितलेल्या शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाकडे अद्याप लक्ष फारसे गेलेले नाही. १५०० कोटी रू. दरवर्षी राज्यात शिक्षणावर खर्च होऊनही ६५ टक्के महिलांना लिहिता येत नाही अशी परिस्थिती आहे. प्राथमिक शिक्षणाचा विस्तार ही आज महाराष्ट्राची गरज आहे. ५२ टक्के रक्कम वरच्या उच्च शिक्षणासाठी खर्च होते आणि त्याचा फायदा फक्त १५ टक्के मुलांना होतो. प्राथमिक शिक्षण व मुलींचे शिक्षण वाढविले पाहिजे. स्त्रीला शिक्षण व सर्वच क्षेत्रात समान संधी जोपर्यंत आपण देणार नाही तोवर समाज पुढे जाणार नाही.

महिलांच्या शिक्षण व नोकऱ्यांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्याचा मी जो कायदा केला त्याबद्दल बरीच कुरबुर झाली. पण माझ्या हातात होते म्हणून मी ते करून टाकले.





सगळ्या सहकारी संस्थांमध्येही ३० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या पाहिजेत अशी माझी धारणा आहे. त्यामुळे सहकारी साखर कारखाने चांगले चालायला मदत होईल.

या समारंभाला शंकरराव बाजीराव पाटील, पुण्याचे महापौर दि. ज. उर्फ पोपटराव खिलारे, सुधाकर गणगणे, विठ्ठलराव लडकत, उल्हास ढोले पाटील, बाळासाहेब शिवरकर, बाळासाहेब राऊत, जगन्नाथ हिंगणे व अंकुश काकडे उपस्थित होते. यावेळी आप्पासाहेब पवार यांचा शंकरराव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मौनी विद्यापीठाचे प्राचार्य डॉ. मा. गो. माळी यांनी लिहिलेल्या महात्मा फुले यांच्या चरित्राचे यावेळी शरद पवार यांच्या हस्ते प्रकाशन झाले.





## २) राजगुरुनगर पंचायत समितीच्या आवारात बसविण्यात आलेल्या महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे अनावरण

तारीख : १६ फेब्रुवारी, १९९२
ठिकाण : राजगुरुनगर (खेड)



## शरद पवार यांचे भाषणातील ठळक विचार

सर्वसामान्य माणसांचे संघटन करुन त्यांचे शिक्षण करण्याच्या कामात ११० वर्षांपूर्वी महात्मा फुले अग्रेसर होते. सामान्य वर्गातील आत्मविश्वासाने भारलेली पिढी शिक्षणाशिवाय निर्माण होऊ शकत नाही हे त्यांनी त्यावेळी जाणले होते. यावरून त्यांची दूरदृष्टी कळते. समाज परिवर्तनाच्या क्षेत्रात फुले यांनी प्रचंड काम केले. त्यांची दृष्टी शंभर वर्षांच्या पुढची होती हे फार थोड्या लोकांना माहिती आहे.

गेल्या २०-२५ वर्षांपासून महाराष्ट्रातले लोक पाझर तलाव, नालाबंडींग याबाबत बोलत आहेत. याविषयावर म. फुले शंभर वर्षांपूर्वी बोलत होते. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी व उपासमार टाळण्यासाठी संकरित ज्वारी लावण्याचा विचार त्यांनी शतकापूर्वी मांडला होता. प्रचंड वैचारिक दूरदृष्टी असलेला महामानव आपल्या भूमीत





जन्माला आला त्याचे कायम स्मरण ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. पण आपण महाराष्ट्रातली मंडळी फार भारी. पुतळा उभारला की आपले काम संपले असेच आपल्याला वाटते. मग आपल्या परिसरातले पक्षी वर्षभर पुतळ्याची देखरेख करतातच. आपण फक्त जयंतीला हार घालायला हजर आणि वर्षभर त्यांच्या विचारांच्या उलटे काम करीत बसायचे. महात्मा फुले यांचा विचार खऱ्या अर्थाने समाजात रुजविला पाहिजे. अजूनही मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात न घालणारी अधिक कुटुंबे आहेत. ५० टक्के मुलींची संख्या महाराष्ट्रात पाहायला मिळत नाही. उच्च शिक्षणात तर ती संख्या खूप कमी आहे. मुलींना शिकविण्याची पालकांची मानसिक तयारी दिसत नाही. म्हणून नुसता फुले यांचा पुतळा बसवून चालणार नाही. प्रत्येक घरातली मुलगी शाळा-कॉलेजात गेलीच पाहिजे यासाठी आपण प्रयत्न करणे गरजेचे आहे.


हा समाज खऱ्या अर्थाने समृद्धीच्या रस्त्यावर न्यायचा असेल तर स्त्रीयांना समान संधी देऊन समाजकार्याच्या प्रक्रियेत सामावून घेऊन ज्ञानाचे दालन खुले करावे लागेल. बँकेत २० टक्के जागा महिलांना द्यायची आमची तयारी आहे. तसा विचार चालू आहे. म. फुले यांनी सांगितलेला स्त्री उद्धाराचा विचार आपण कधीही मनापासून स्वीकारला नाही ही माझ्या मनातली खंत आहे.

आजही महाराष्ट्रातल्या रोजगार हमीच्या कामांवर ८५ टक्के स्त्रीयाच आहेत.

कर्तृत्वाची संधी दिली तर महिला कोणत्याही कामात यत्किंचीतही मागे पडणार नाहीत. इंदिराजी गांधी यांनी ११ वर्षे देशाला भक्कम प्रशासन देऊन कर्तृत्वाचा वाटा व मक्ता पुरूषांकडेच असे नाही हे सिद्ध केले आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन महिला तरी सभापती झाल्या पाहिजेत. जिथे जिथे स्त्रीला घरात आत ठेवले ते देश मागासलेले राहिले आहेत हा इतिहास आहे. अनेक क्षेत्रात आपण चांगले काम करतो पण ते कर्तृत्व महिलांच्या समावेशामुळे आणखीन विस्तारीत होऊन त्याचा फायदा सामान्य माणसांना अधिक झाला पाहिजे. बेरोजगारी कमी करून पाण्याखाली आणावयाची जमीन व दर एकरी उत्पादन व उत्पादकता वाढवावी लागेल. जीवनाच्या सगळ्या क्षेत्रात हे राज्य पुढे जाते आहे हे चित्र निर्माण करण्यासाठी प्राथमिक शिक्षण हा मुलभूत पाया आहे. आपण करीत असलेल्या सगळ्या कामाला सामाजिक आशय असला पाहिजे. सामाजिक आशय नसेल तर त्या संस्था सामान्य माणसाला ताकद देणार नाहीत. मग त्यांना 'दुकान' का म्हणायचे नाही? इथे आम्ही समाजाचे काम करतो आहोत तो विचार ठेवून काम केले तर ते काम समाजोपयोगी होणार आहे. सामाजिक आशयाचा दृष्टीकोन ठेवून शिक्षण व सरकारी क्षेत्रात पाऊले टाकली पाहिजेत.

शास्त्र प्रचंड वेगाने विकसीत होऊन पुढे चालले आहे. मनुष्य रक्षणासाठी बँकिंग, उद्योग सर्वच क्षेत्रात लोकांचे जीवन विज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक व सुसंपन्न कसे होईल यासाठी मानसिक तयारी ठेवून ज्ञान संपादन केले पाहिजे. शेवटी विकासाचा ज्ञान हाच एकमेव पाया आहे व मुलभूत आधार आहे. त्यामुळे ज्ञान मिळविण्यात आपण मागे राहता कामा नये.





महागाई प्रचंड वाढते आहे. जीवनावश्यक वस्तुंचा तुटवडा निर्माण होतो आहे. यातून बाहेर पडण्यासाठी अत्यंत काटेकोर उपाययोजना करावी लागेल. दुनियेचे देणे भरपूर झाले आहे. देशात मोठी व भरपूर गुंतवणूक होत नाही. दुनियेचे कर्ज फेडण्याची हिंमत नाही. आर्थिक संकट सोपे नसते. ते देश तोडू शकते. आज अशाच प्रकारचे संकट

हिंदुस्थानच्या डोक्यावर आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी कडक उपाययोजना केल्याशिवाय गत्यंतर नाही. त्याला जनतेने साथ दिली पाहिजे. कडू गोळी घेण्याशिवाय आता गत्यंतर नाही. यासाठी हिंदुस्थानात अर्थमंत्री म्हणून तसाच डॉक्टर पुढे आला आहे. त्याचे नाव मनमोहन सिंह आहे. कडू औषधाच्या गोळ्या द्याव्याच लागतात. हे केले नाही तर रोगाचा विस्तार झाल्याशिवाय राहात नाही. कठोर पावलांचा स्वीकार आपण व्यापक विचाराने केला पाहिजे. प्रश्न सोडवायचा असेल तर लोकांना पाहिजे ते सरकार आले अर्थव्यवस्थेवर पडतो आहे. घराला काही शांत बसू द्यायचे नाही असा त्यांचा प्रयत्न आहे. आर्थिक संकट असताना बाहेरची संकटे लादून भारत दुबळे करण्याचा प्रयत्न चालू आहे. येत्या तीन वर्षात स्थैर्याची परिस्थिती निर्माण करून आर्थिक शिस्त आणण्यात आपण यशस्वी झालो तर भारताचा नावलौकिक जगात वाढल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी आपण सर्वांनी अत्यंत जबाबदारीने वागले पाहिजे. भेकडपणाच्या भूमिकेतून असल्या प्रश्नांची सोडवणूक होत नसते. त्यांच्याशी दोन हात करूनच देश मजबूत ठेवावा



पाहिजे.

देशाचे तुकडे करण्याचे प्रयत्न हाणून पाडले जातील. त्याला शेजारचे देश खतपाणी घालताहेत. भारताच्या सीमेपासून ४ कि.मी. अंतरावर लोक अडविले. ४० बसेसमधून लोक आले २०० किलोमीटरवरुन. रस्त्याने ४० बसेस येतात तोवर पाकिस्तानला कळले नाही. अंतर्गत शत्रूंना खतपाणी घालून, मुडदे पाडून, देशात अशांतता निर्माण करुन वेगळ्या प्रकारचे युद्ध खेळण्याची निती शेजारच्या राष्ट्रांनी आखली आहे. त्याचा मोठा ताण भारतीय लागेल. यासाठी महाराष्ट्रातल्या सात कोटी जनतेने सर्व मतभेद विसरुन आमच्या घराला आग लावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना जागीच ठेचण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याकरिता आपण सारेजण एकत्र राहू. अन्य बांधवांनाही त्यामुळे प्रेरणा मिळाल्याशिवाय राहणार नाही.

या समारंभाला मंत्री अनंतराव थोपटे, आमदार नारायण पवार, साहेबराव बुट्टे पाटील, चंदुलाल बलदोटा, शरद गुजर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# भाजपला हवा एकरंगी भारत

**आकाश**
नवी दिल्ली

**संपूर्ण देशात म्हणजेच दिल्लीपासून गल्ली पर्यंत एकछत्री, एकतंत्री, एकरंगी आपल्याच पक्षाची सत्ता प्रस्थापित करण्याच्या उद्दिष्टाने आता भाजप नेतृत्वाला झपाटून टाकलेले आहे. पंतप्रधान सातत्याने 'एक देश एक निवडणूक' हा जो जप करीत आहेत तो उगाच नव्हे. त्यामागे निश्चित हेतु आहे आणि तो हाच आहे की संपूर्ण देश भाजपच्या एकाच रंगात रंगवून टाकणे ! पुढे काय ? या प्रश्नाचे उत्तर सापडविण्यासाठी इतरही अनेक प्रश्नच करावे लागतील. भाजपने ही त्यांना इष्ट अशी उद्दिष्टप्राप्ती केली तर देशात संसदीय लोकशाही पध्दती टिकणार की ती बदलून अध्यक्षीय राजवट येणार हा प्रश्न अनेक राजकीय विश्लेषकांच्या मनात आलेला आहे.**

राजकीय पक्षाला सत्तेच्या ध्यास असणे नैसर्गिक आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचे ते मूलभूत उद्दिष्ट असते. जास्तीतजास्त ठिकाणी आपली सत्ता असावी अशी भावना असण्यातही गैर काही नसते. परंतु 'दिल्लीपासून गल्लीपर्यंत माझ्याच पक्षाची सत्ता असली पाहिजे' याला सत्तापिपासा म्हणतात. लोभ व हव्यास म्हणतात. त्यातही आपल्या प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांची हीन पातळीवर उतरुन निंदा करणे आणि प्रसंगी त्यांना देशद्रोही, भ्रष्ट म्हणून बदनाम करणे, शक्य असेल तेथे हाती असलेल्या सत्ता व अधिकाराचा सूडबुध्दीने वापर करुन विविध तपाससंस्थांचा ससेमिरा विरोधी पक्षांच्या मागे लावणे, निवडणुकीच्या ऐन तोंडावर विरोधी पक्षांविरुध्द काहीतरी कारवाया करणे याला काय म्हणता येईल? सत्तालोलुपतेचा अतिरेकी आविष्कार?

सध्या असेच काहीसे चित्र भारतात दिसू लागले आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत आपल्याच पक्षाची सत्ता असली पाहिजे अशा अतिरेकी महत्वाकांक्षेने वर्तमान राज्यकर्ते व सत्ताधाऱ्यांना पछाडून टाकलेले दिसून येते. त्यामुळेच 'ग्रेटर हैदराबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशन'(जीएचएमसी) या हैदराबादच्या म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीतही भाजपने आटोकाट असा जिवाचा आटापिटा केला. यासाठी भाजपने काय नाही केले? हिंदू-मुसलमान पत्ता खेळला. पाकिस्तान, दहशतवाद, नागरिकत्व कायदा हे सर्व मुद्दे भाजपने या स्थानिक निवडणुकीच्या प्रचारात यथेच्छपणे वापरले. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत स्वसाधारणपणे त्या शहरातील स्थानिक मुद्यांनाच प्राधान्य दिले जाते. त्यामध्ये स्थानिक पातळीवरील स्वच्छता, आरोग्य, पाणी, गटारे, रस्ते आणि इतर नागरी सोयी सुविधा या मुद्यांवर प्रामुख्याने या निवडणुका लढविल्या जातात. पण भाजपला या निवडणुकांमध्येही सत्ता मिळविण्यासाठी धार्मिक ध्रुवीकरणाची गरज भासली आणि स्थानिक पातळीवरील मुद्दे त्यांना गौण वाटले. आणि हे मुद्दे उपस्थित करायला कोण होते? साक्षात द्वितीय लोहपुरुष केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा! एका म्युनिसिपालटीच्या निवडणुकीत केंद्रीय मंत्री आणि पक्षाचे

राष्ट्रीय अध्यक्ष उतरण्याचे गेल्या ७० वर्षात पाहिले किंवा ऐकले होते का? पण आता तेही घडताना पाहण्यास मिळू लागले आहे. एवढे करुनही हैदराबाद महानगरपालिकेवर भाजपला त्यांचा झेंडा रोवता आला नाही. अर्थात भाजपला या महानगरपालिकेवर कब्जा करता आला नाही म्हणून हुरळून जाण्यात अर्थ नसून यानिमित्ताने सावध होण्याची वेळ आली आहे. भाजपच्या जागांमध्ये काही पटीने वाढ झाली आहे हे येथे लक्षात घ्यावे लागेल. याचा अर्थ काय?

भाजपला दक्षिणेतील राज्यांपैकी कर्नाटकात पाय



रोवता आले. आता त्यांची नजर तेलंगणावर पडलेली आहे. तेलंगणावर कब्जा करण्याच्या महत्वाकांक्षेने आता भाजपला झपाटलेले आहे. त्यासाठी हैदराबादची स्थानिक पातळीवरची निवडणूक ही ‘ट्रायल’ होती आणि तो ‘ट्रेलर’ही होता. तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव हे अत्यंत लोकप्रिय मुख्यमंत्री आहेत. परंतु त्यांना गाफील राहून चालणार नाही हाच संदेश या निवडणुकीने दिला आहे.

बिहार निवडणुकीपासूनची भाजपची पावले पाहता आता हा पक्ष प्रादेशिक राजकीय पक्षांचे अस्तित्व संपविण्याच्या मोहिमेवर निघाला आहे असे दिसून येते.

बिहारमध्ये त्यांनी लोकजनशक्ति पक्ष आणि संयुक्त जनता दलात दुहीचे बीज पेरुन स्वतःचा फायदा करुन घेतला. तेलंगणामध्ये भाजपला ध्रुवीकरणासाठी असदुद्दिन ओवैसी यांच्यासारख्या नेत्याची 'मदत'च होणार आहे. कारण भाजप काय किंवा ओवैसी काय या दोन्ही पक्षांना मतांच्या ध्रुवीकरणातूनच ताकद मिळते आणि त्यासाठी ते एकमेकाला पूरकच ठरतात. मधल्यामध्ये काँग्रेससारखे मध्यममार्गी व उदारमतवादावर विश्वास ठेवणारे राजकीय पक्ष संपून जातात. अन्यथा हैदराबाच्या स्थानिक निवडणुकीत दहशतवाद, पाकिस्तान, हिंदू-मुसलमान, हैदराबाद शहराचे नाव बदलणे असे मुद्दे कुठून निघतात? ध्रुवीकरणासाठीच असे अभिनिवेषाचे मुद्दे लोकांपुढे मांडून उन्माद फैलावण्याचा प्रकार पध्दतशीरपणे केला जातो. त्यामुळे हैदराबादच्या निवडणुकीत ओवैसी यांची ताकद फारशी कमी झालेली आढळत नाही पण तेलंगणा राष्ट्र समितीला जितक्या जागांचे नुकसान झाले तेवढ्या जागा भाजपच्या खात्यात जमा झालेल्या आहेत ही बाब उल्लेखनीय मानली पाहिजे.

तेलंगणा राष्ट्र समिती हा प्रादेशिक पक्ष असला तरी त्याची पाळेमुळे काँग्रेसमधली आहेत. चंद्रशेखर् राव हे अनेक वर्षे काँग्रेसमध्ये होते आणि स्वतंत्र तेलंगणाच्या आंदोलनात त्यांनी हा वेगळा पक्ष स्थापन केला. सुरुवातीच्या निवडणुकात त्यांनी काँग्रेसबरोबर आघाडी देखील केलेली होती आणि युपीए-१ मध्ये ते मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात मंत्रीपण होते. तेलंगणाची स्थापना झाल्यावर तेलंगणात आपण मुसंडी मारू अशी घमेंड काँग्रेसनेतृत्वाला झाली आणि त्यांचा नक्षा पार उतरला. आज काँग्रेस पक्षाने स्वतःच्या हाताने आपला विनाश ओढवून घेतला. दुसरीकडे चंद्रशेखर् राव यांनी सलग दुसऱ्यांदा विक्रमी बहुमताने सत्ता मिळवली असली तरी त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचाराचे प्रचंड आरोप आहेत आणि भाजपचे वर्तमान नेतृत्व व त्यांचे सूडबुध्दीचे राजकारण पाहता ते चंद्रशेखर राव यांना सहजासहजी मोकळे सोडतील अशी स्थिती नाही. त्यामुळे एकीकडे लयास गेलेला काँग्रेस पक्ष व दुसरीकडे भ्रष्टाचार, घराणेशाहीने ग्रस्त तेलंगणा राष्ट्र





हैदराबादच्या चारमिनार जवळून रोड शोला अमित शहा व के. चंद्रशेखर राव यांनी प्रारंभ केला.

समिती या परिस्थितीत भाजपने तेथे मुसंडी मारल्यास नवल वाटायला नको. भाजप नेतृत्वाने हे सर्व कमकुवत व कच्चे दुवे ओळखून तेलंगणाला आपले पुढचे 'टार्गेट' केले आहे. हैदराबाद महापालिका निवडणूक हा नुसता 'ट्रेलर' आहे.

पुढील वर्षी तमीळनाडूसह पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत. पश्चिम बंगालमध्ये सरळसरळ ममता बॅनर्जी यांच्याशी भाजपचा सामना होण्याची चिन्हे आहेत. तमीळनाडू मध्ये मात्र भाजपची मोठी अडचण आहे. कारण त्यांच्याकडे तालेवार असा स्थानिक चेहरा नाही तसेच संघटनाही नाही. मग भाजपने येथे चलाखीने काम करायचे ठरवले आहे. चित्रपट अभिनेते रजनीकांत हे गेल्या काही काळापासून राजकारण प्रवेशाबद्दल बोलत होते. परंतु प्रकृतीच्या कारणास्तव त्यांनी तो बेत अनिश्चित काळासाठी पुढे ढकलला होता. भाजपने त्यांना 'गळा'ला लावण्याचे ठरवले. त्यासाठी भाजपच्या अत्युच्च पातळीवरुन पुढाकार घेण्यात आला. रा.स्व.संघाचे एक प्रमुख कार्यकर्ते व आर्थिक विषयाचे अभ्यासक मानले जातात व जे चेन्नईमध्ये सी.ए. म्हणजेच चार्टर्ड अकांउटंट म्हणून व्यवसाय करतात त्या एस.गुरुमूर्ति यांचा उपयोग करण्यात आला. गुरुमूर्ति हे बऱ्याच काळापासून रजनीकांत यांच्या संपर्कात होते. त्यांनी रजनीकांत यांना राजकीय पक्ष स्थापन करण्याचे सुचविले. रजनीकांत यांचे तरीही तळ्यातमळ्यात चालू राहिले. अखेर विश्वगुरु आणि रजनीकांत यांची गेल्या महिन्यात भेट झाली. त्यानंतर चक्रे फिरू लागली आणि अखेर रजनीकांत यांनी सक्रिय राजकारणात उडी मारण्याचे आणि नव्या पक्षाची घोषणा १ जानेवारी रोजी करण्याचे जाहीर केले. याचा अर्थ हाच होतो की रजनीकांत या तमीळ सिंहाचे कातडे भाजप परिधान करणार आहे आणि तमीळनाडूतील राजकारणावर आपला कब्जा जमविण्याचा प्रयत्न करणार आहे. रजनीकांत यांचा पक्ष म्हणजे भाजपचे प्रतिबिंब-प्रतिरूपच राहणार आहे हे स्पष्ट आहे. किंवा ज्याला 'प्रॉक्सी' म्हणतात त्याचप्रमाणे रजनीकांत आणि त्यांचा भावी पक्ष हा 'प्रॉक्सी-भाजप' राहणार आहे.

रजनीकांत यांचा पक्ष निवडणूकही लढविणार आहे.

अर्थात त्यांना किती यश मिळेल याचा अंदाज आताच लावणे कठीण आहे. कारण मे महिन्यात निवडणुका होणार असतील तर त्यांच्या नव्या पक्षाला केवळ तीनच महिने पूर्वतयारीसाठी मिळणार आहेत. लोकप्रियतेचे रुपांतर मतांमध्ये करण्यासाठी संघटनेची यंत्रणा ही आवश्यकच असते आणि त्या त्रुटीशी रजनीकांत यांना सामना करावा लागेल. परंतु रा.स्व.संघाने त्यांची संघटनात्मक ताकद रजनीकांत यांच्यामागे उभी केल्यास त्यांचा संघटनात्मक यंत्रणेचा प्रश्न आपोआपच सुटणार आहे आणि ज्या अर्थी त्यापूर्वीही अण्णा दुराई वगैरे नेते हे विलक्षण वलयांकित होते आणि चळवळीतून त्यांचे नेतृत्व प्रस्थापित झालेले होते. आता परिस्थिती बदललेली आहे. करुणानिधी यांचे पुत्र एम.के.स्टॅलिन व मुलगी कनिमोळी त्यांचे राजकीय वारसदार म्हणून राजकारण आणि द्रमुक पक्ष चालवीत असले तरी त्यांना करुणानिधी यांचा करिष्मा प्राप्त नाही. अण्णा द्रमुक पक्षाची अवस्था तर आणखीनच वाईट आहे. जयललिता यांच्या अचानक निधनाने तर हा पक्ष पोरका-अनाथच झाला आहे. भाजपच्या म्हणजेच केंद्रीय



गुरुमूर्ति वगैरे मंडळी त्यांच्या मागे उभी राहिली आहेत म्हणजेच संघही त्यांच्या मागे उभा आहे हे स्पष्ट होते. थोडक्यात तमीळनाडूत भाजपने या गनिमी काव्याने प्रवेश करण्याचे ठरवले आहे.

तमीळनाडूतील राजकारण आतापर्यंत द्रविडी विचारसरणीभोवती केंद्रित होते. परंतु भाजपने आता त्याचे स्वरुप बदलण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. जयललिता आणि करुणानिधि हयात असेपर्यंत या राजकारणाला कोणतीही केंद्रीय सत्ता शह देऊ शकली नव्हती. याचे कारण जयललिता,करुणानिधि, एमजी रामचंद्रन, किंवा सत्तेच्या दयेवर त्यांचे सरकार चालू राहिल्याने नाईलाजाने त्यांना विधानसभा निवडणुकीसाठी देखील भाजपबरोबर आघाडी करावी लागली आहे. अर्थात रजनीकांत यांच्या राजकारणातल्या 'एंट्री'नंतर आगामी काळात कोणती राजकीय समीकरणे बदलतात, नवी तयार होतात हे पहावे लागेल. जयललिता यांच्या सहाय्यक शशिकला याही तुरुंगातून सुटणार आहेत आणि त्या कोणती भूमिका घेतात त्याकडेही सर्वांचे लक्ष लागून आहे. थोडक्यात भाजपने खेळलेल्या पत्त्यामुळे तमीळनाडूतील निवडणुकीतील चुरस वाढलेली आहेच परंतु पूर्णपणे हिंदीविरोधी आणि उत्तर

*Best Compliments*

भारतीयविरोधी भावनांची जोपासना केलेल्या या राज्यात भाजप आपला प्रभाव कसा निर्माण करणार हे पहावे लागेल. कारण या राज्यात हिंदुत्वाचा पत्ता किती चालेल याबद्दल शंका आहेत आणि मग भाजपचे नेतृत्व विकास व प्रगतीचे कार्ड खेळणार काय हाही एक प्रश्न आहे. यामध्ये तमीळनाडूच्या राजकारणातली घराणेशाही हा भाजपच्या प्रचाराचा मुद्दा असू शकतो आणि या एका मुद्यावर ते काँग्रेस आणि द्रमुकच्या विरोधात वातावरणनिर्मिती करु शकतात.

पश्चिम बंगालमध्ये भाजपने आधीच त्यांचा आवडता असा धार्मिक ध्रुवीकरणाचा खेळ सुरु केलेला आहे. त्यामुळे भाजपची तेथील रणनीती आता स्पष्ट झाली आहे. एकीकडे ध्रुवीकरण आणि दुसरीकडे प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांमधील असंतुष्टांची फोडाफोडी ही कार्यशैली येथेही अमलात आणली जात आहे. ममता बॅनर्जी अजुनही बंगालच्या लोकप्रिय नेत्या आहेत. परंतु त्यांच्याबद्दलची नाराजीही वाढलेली आहे हे नाकारुन चालणार नाही. तेलंगणासारख्या राज्यात जेथे भाजपची फारशी पाळेमुळे नाहीत तेथील शहरी मतदारसंघात भाजप मुसंडी मारु शकत असेल तर पश्चिम बंगालसारख्या राज्यात जेथे भाजपने आपली संघटनात्मक ताकद आणि जाळेही विस्तारलेले असल्याने तेथील आगामी विधानसभा निवडणूक ही तृणमूल काँग्रेस म्हणजेच ममता बॅनर्जी विरुध्द पंतप्रधान अशीच होणार आहे. पंतप्रधान म्हणण्याचे कारण असे की भाजपच्या गेल्या सहा वर्षातील परंपरेप्रमाणे सर्व निवडणुका केवळ पंतप्रधानांच्या चेहऱ्यावरच लढविण्याचा पायंडा पडलेला आहे. त्यामुळे त्या राज्यातील स्थानिक नेता आणि त्याच्या विरोधात देशाचा पंतप्रधान असेच चित्र निर्माण केले जाते व साहजिकच पंतप्रधानाचे पारडे जड होणे अटळ असते. पश्चिम बंगालमध्ये जेव्हा पंतप्रधान जाऊन प्रचारात भाजपला निवडून दिल्यास अमुक करु व तमुक करु असे सांगतील त्याचा प्रतिवाद करणे तृणमूलला अवघड जाईल. त्यामुळेच साधनसंपत्ती आणि सर्वच बाजूंनी भाजपने पश्चिम बंगालमध्ये आपली पूर्ण ताकद लावलेली आहे.

वरील उदाहरणांवरुन एक बाब स्पष्ट होते. भाजपचे आगामी काळातील राजकारण हे 'प्रादेशिक पक्ष संपवा' या



सूत्राभोवती फिरणारे राहील. त्यामुळेच पश्चिम बंगाल व तेलंगणा ही राज्ये त्यांनी निवडली आहेत. पश्चिम बंगालवर कब्जा करणे शक्य झाल्यास ते तेलंगणावर लक्ष केंद्रित करणार हे त्यांनी जाहीरपणे सांगितलेले आहे. भाजपला पर्याय म्हणून आणि एक राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेसची प्रतिमा असली तरी त्या पक्षाने स्वतःच्या हाताने आपले नुकसान करुन घेतले आहे.

वैचारिक गोंधळ, धोरणात्मक अस्पष्टता, नेतृत्वामध्ये असलेला सातत्याचा अभाव व संघटनात्मक दुर्बळता यामुळे काँग्रेस पक्षामध्ये भाजपला पर्याय देण्याची ताकद कमी झालेली आहे. याउलट दक्षिणेत आणि पूर्वेकडील राज्यांमध्ये अजुनही प्रादेशिक पक्षांचा दबदबा आहे. हे पक्ष भाजपला पर्याय होऊ शकत नाहीत हे खरे असले तरी एखाद्या प्रसंगात त्यांची मदत लागली तर ते त्याची 'पुरेपूर किंमत' वसूल करतात. त्यासाठी राष्ट्रीय पक्षांना त्यांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागतात व प्रसंगी त्यांच्या तालावरही नाचावे लागते. प्रादेशिक पक्षात संधीसाधूपणा ठासून भरलेला असतो व त्यामुळेच राष्ट्रीय पक्षांना बहुमतासाठी त्यांची मदत घ्यावी लागते तेव्हा त्यांचा राजकीय छळ होतो. तूर्तास भाजपला पूर्ण बहुमत प्राप्त असले तरी त्यात दक्षिणेचे प्रतिनिधित्व नगण्य आहे व त्यामुळेच अजुनही भाजप हा हिंदी भाषक प्रदेशाचा पक्ष आहे, हिंदी व हिंदुत्ववादी पक्ष म्हणून त्यांची दक्षिणेत ओळख आहे. त्यामुळेच हैदराबाद महानगरपालिकेतील विजयाला महत्व दिले जाते ते या कारणासाठीच! थोडक्यात भाजपला आता या प्रादेशिक पक्षांना संपविण्याची आवश्यकता भासू लागली आहे. त्यामुळेच तमीळनाडूत ते रजनीकांत यांचे कातडे पांघरुन प्रवेश करीत आहेत. तमीळनाडूमध्ये भाजपने द्रमुक आणि अण्णा द्रमुक या पक्षांबरोबर भूतकाळात आघाड्या केल्या होत्या. सध्याही राज्यात सत्तारूढ आण्णा द्रमुक बरोबर त्यांची आघाडी आहे व ती निवडणुकीत कायम राहील असे जाहीर करण्यात आले आहे. मात्र रजनीकांत यांच्या राजकारण प्रवेशानंतर चित्र कसे पालटते ते पहावे लागेल. परंतु बहुतेक प्रादेशिक पक्षांनी भाजपबरोबर कधी ना कधी



हातमिळवणी केलेली आहे. अपवाद फक्त तीनच! राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल आणि समाजवादी पक्ष! या तीन पक्षांनी कधीही भाजपबरोबर प्रत्यक्ष हातमिळवणी केली नाही. परंतु काश्मीरमधील पीडीपी (पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी), नॅशनल कॉन्फरन्स, पंजाबमध्ये अकाली दल, उत्तर प्रदेशात बहुजन समाज पक्ष, हरयानात चौटाला आणि तत्सम मंडळींचे पक्ष व गट, महाराष्ट्रात शिवसेना, आंध्र प्रदेशात तेलगु देशम, या राज्याच्या विभाजनानंतर तेलंगणा राष्ट्र समिती व उर्वरित आंध्र प्रदेशात वायएसआर काँग्रेस, पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेस, बिहारमध्ये संयुक्त जनता दल, झारखंडमध्ये झालखंड मुक्ति मोर्चा, ओडीशा मध्ये नवीन पटनाईक यांचा बिजु जनता दल या पक्षांनी भाजपबरोबर कधी ना कधी हातमिळवणी केलेली आहे. त्यामुळे या प्रादेशिक शक्ति नेहमीच संधीसाधूपणाच्या शिकार राहिल्या आहेत. तो त्यांचा दोष नाही कारण त्यांच्या मर्यादित प्रादेशिक राजकारणाला पोषक भूमिका घेणाऱ्या राष्ट्रीय पक्षांना ते अनुकूल राहतात व मुख्यतः केंद्रात सत्तारूढ पक्षाच्या ते नेहमीच जवळ राहतात. भाजपने विविध राज्यांमध्ये या पक्षांच्या पाठकुळी बसून आपले प्रथम बस्तान बसविले आणि नंतर संघटनात्मक विस्तार करुन आता त्याच प्रादेशिक पक्षांना आव्हान देण्याच्या स्थितीत स्वतःला आणले. काँग्रेसने संघटनात्मक विस्ताराकडे पूर्ण दुर्लक्ष करुन आपली जागा भाजपला मोकळी सोडली.



त्यामुळेच ओडीशासारख्या राज्यात आज काँग्रेस तिसऱ्या नंबरवर जाऊन बिजु जनता दलाचा मुख्य प्रतिस्पर्धी भाजप झाला आहे. थोडक्यातच भाजपची रणनीती आता प्रादेशिक पक्षांना संपवून ती पोकळी भरुन काढण्याच्या दिशेने आखली जात आहे.

संपूर्ण देशात म्हणजेच दिल्लीपासून गल्ली पर्यंत एकछत्री, एकतंत्री, एकरंगी आपल्याच पक्षाची सत्ता प्रस्थापित करण्याच्या उद्दिष्टाने आता भाजप नेतृत्वाला झपाटून टाकलेले आहे. पंतप्रधान सातत्याने 'एक देश एक निवडणूक' हा जो जप करीत आहेत तो उगाच नव्हे. त्यामागे निश्चित हेतु आहे आणि तो हाच आहे की संपूर्ण देश भाजपच्या एकाच रंगात रंगवून टाकणे! पुढे काय? या प्रश्नाचे उत्तर सापडविण्यासाठी इतरही अनेक प्रश्नच करावे लागतील. भाजपने ही त्यांना इष्ट अशी उद्दिष्टप्राप्ती केली तर देशात संसदीय लोकशाही पध्दती टिकणार की ती बदलून अध्यक्षीय राजवट येणार हा प्रश्न अनेक राजकीय विश्लेषकांच्या मनात आलेला आहे. परंतु केवळ राजकीय केंद्रीकरणापुरती ही बाब मर्यादित राहील असे शक्य नाही. कारण एकजुटीकरणाची आणि केंद्रीकरणाची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर ती केवळ राजकीय आणि सरकारी पातळीपर्यंतच मर्यादित रहात नाही. तिचे प्रतिबिंब सामाजिक, सांस्कृतिक पातळीवरही पडू लागते. मग त्या ठिकाणी संघप्रणित विचारसरणीचा शिरकाव होऊ शकतो आणि मग एकजिनसी समाजाचे ध्येय प्राप्त करण्यासाठी जातींचे अस्तित्व संपवून केवळ समाजाची धार्मिक ओळखच प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले जाऊ शकतात. यामध्ये बहुसंख्यकवादाला प्राधान्य दिले जाणार हे सांगण्यासाठी कुणा फार पंडिताची आवश्यकता नाही. हैदराबाद महानगरपालिकेच्या निवडणुकीतही हिंदू-मुसलमान, दहशतवाद, भारत-पाकिस्तानसारखे मुद्दे प्रचारात वापरुन धार्मिक ध्रुवीकरण केले जात असेल आणि लोकांच्या नागरी प्रश्नांना फाटा दिला जात असेल तर आगामी काळातील परिस्थिती ही बहुसंख्यकवादाला खतपाणी घालणारीच राहील यात शंका नाही. या दिशेने देशाची वाटचाल सुरु झालेली आहे आणि देशाच्या विविधतेमधील एकता टिकवून धरण्याचे आव्हान सर्व उदारमतवादी व विचारी शक्तींपुढे राहणार आहे!

**Nanded City, Pune**
*The Maximum City*
Sinhagad Road, Pune

A 700 Acre Mega Township on Sinhagad Road, Pune.

# प्रत्येक घराला एक मन असतं.
# प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.

आमच्या प्रत्येक घराचं मन आहे उत्साही, चैतन्यशील, आशावादी, जगण्याच्या ऊर्जेने पुरेपूर भरलेलं, आणि आमच्या शहराचं व्यक्तिमत्व आहे अभिरूचिसंपन्न, सुसंस्कृत, सर्वसमावेशक, निसर्गप्रेमी आणि भविष्यसन्मुख. कारण आम्ही आहोत नांदेड सिटी, ७०० एकर्सचं अतुलनीय जग, जिथे आहे संपूर्ण कुटुंबाच्या आणि कुटुंबातल्या प्रत्येकाच्या सुखाचा, सुरक्षिततेचा, आरोग्याचा आणि आनंदाचा सखोल विचार.

## आनंदी संकुल



**कुटुंबासाठी प्रफुल्लित, प्रदूषणमुक्त पर्यावरण**

- इको पार्क व ऑक्सिझोन
- १३,२०० पेक्षा जास्त झाडांची लागवड
- १२० एकर्सची हिरवाई

## CBSE व ICSE शाळा



**विद्यार्थ्यांसाठी प्रगतीशील वातावरण**

- CBSE व ICSE बोर्डाच्या शाळा
- दर्जेदार शिक्षण
- वॉक–टू–स्कूल मॉडेल

## जिमखाना



**तरूणाईसाठी अगदी आदर्श सिटी**

- सायकलिंग व जॉगिंग ट्रॅक्स
- २४,००० स्क्वे. फूट जिम्नॅशियम
- क्रीडांगण–द स्पोर्टस् कॉम्प्लेस (प्रस्तावित)
- विविध खेळांच्या स्पर्धा व कोचिंग

**नांदेड सिटी, उत्साही मन आणि उमदं व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!**

A project by
MAGARPATTA CITY ©
*The pride of Pune*

Call: **020-67275300 / 1 / 2**

CREDAI PUNE METRO

**www.nandedcitypune.com**
info@nandedcitypune.com
An ISO 9001:2008, ISO 14001:2004, OHSAS 18001:2007 certified company.

tempestadvertising.com

बिहारची निवडणूक विलक्षण रंजक झाली. राष्ट्रीय जनता दलाचे तरुण नेतृत्व तेजस्वी प्रसाद हे पराभूत होऊनही त्यांची प्रतिमा विजेत्याची सिध्द झाली. नीतीशकुमार यांना मुख्यमंत्रीपद मिळाले परंतु एका लाचार पराभूताला जीवदान देण्याचा तो प्रकार मानला गेला. यात शकुनीमामा आणि खलनायकाच्या भूमिकेत भाजप होता आणि त्यामुळे यशाच्या दृष्टीने पाहिल्यास भाजपने इतर पक्षांवर बाजी मारली असेच म्हणावे लागेल. यासाठी त्यांनी गनिमी कावा खेळला पण त्यांना पाहिजे ते यश त्यांनी पदरात पाडून घेतले. एकच उद्दिष्ट मित्र सुशील मोदी यांची बिहारच्या राजकारणातून उचलबांगडी करुन त्यांना राज्यसभेत आणणे. दिवंगत दलित नेते रामविलास पास्वान यांच्या चिरंजीवांचा 'कात्रज' करुन त्यांचे राजकारणच जवळपास संपविण्याची यशस्वी खेळी असे अनेक पक्षी भाजपने एका निवडणुकीच्या निमित्ताने मारले. त्यामुळेच यापुढील काळात बिहारचे राजकारण विशेष लक्षणीय ठरणार आहे.

बिहारमधील राजकारण आजही सामाजिक न्यायाच्या शक्तिभोवती फिरते आहे. भाजपच्या 'शकुनीमामा' राजकीय खेळ्यांनंतर ते कट्टर धार्मिकता आणि ध्रुवीकरणाच्या दिशेने जाणार की सामाजिक न्यायाशी बांधील राहणार यावर लक्ष ठेवावे लागणार आहे. त्याचबरोबर भाजपच्या 'दयेने' मिळालेले मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर त्यांच्या तालावर नीतीशकुमार कितीकाळ नाचणार हेही पहावे लागणार आहे.



भाजपला साध्य करता आले नाही. बिहारमध्ये सर्वाधिक जागा मिळविण्याचे म्हणजेच 'नंबर १'चा पक्ष होण्याचे ध्येय त्यांना गाठता आले नाही व ते शल्य त्यांना बोचत राहील. केवळ एका जागेने राष्ट्रीय जनता दलाने भाजपला दुसऱ्या क्रमांकावर ढकलले. मात्र नीतीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलास कमी जागा मिळाव्यात यासाठीची रणनीती यशस्वी करुन त्यांना पंगु आणि भाजपवर परावलंबी करण्याचा मनसुबा भाजपने पूर्ण केला. नीतीशकुमार यांना पूर्णतया भाजपच्या कह्यात राखणे. नीतीशकुमार यांचे भाजपमधील

बिहारमधील निकालांवर नजर टाकली असता 'जिवावरचे शेपटावर निभावले' या मराठी म्हणीचा प्रत्यय येतो. भाजप व संयुक्त जनता दलाच्या आघाडीस कसाबसा विजय मिळविण्यात आणि सरकार स्थापनेत यश मिळाले.

निवडणुकांच्या निकालांवर नजर टाकल्यास सत्तारूढ आघाडीविरुध्दची नाराजी स्पष्टपणे दिसून येते. किंबहुना बिहारमध्ये विरोधी पक्षांच्या आघाडीला व मुख्यतः राष्ट्रीय जनता दलास मतदारांनी दिलेला प्रतिसाद पाहता त्यांना बदल हवा होता आणि अगदी थोडक्यात राष्ट्रीय जनता दलाच्या हातातून विजय निसटला. त्यामुळेच निकालांना ज्या पध्दतीने विलंब लावण्यात आला त्यावरुन त्यामध्ये काही गडबड तर करण्यात आली नव्हती ना अशी शंका आल्याखेरीज रहात नाही.

बिहारमधील निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण ठरली. गंगेच्या प्रदेशातील (हिंदीत त्याला गांगीय प्रदेश म्हणतात) या प्रमुख राज्यात आपली सत्ता नसणे हे भाजपला खुपणे स्वाभाविक होते. गंगेचा उगम होत असलेल्या उत्तराखंड पासून गंगा समुद्राला मिळेपर्यंतच्या राज्यांमध्ये म्हणजे पश्चिम बंगालपर्यंत आपली सरकारे असली पाहिजेत हे भाजपचे नैसर्गिक स्वप्न आहे. सध्या पश्चिम बंगाल व झारखंड या दोन राज्यांत सध्या विरोधी पक्षांची सरकारे आहेत. परंतु हिंदी भाषक राज्यांमध्ये उत्तर प्रदेशाखालोखाल बिहारचे महत्व

# भाजपच्या तालावर नीतीशकुमार कितीकाळ नाचणार?



**अवलोकितेश्वर**

**आता नीतीशकुमार हे मुख्यमंत्री असले तरी त्यांचे वलय नष्ट झाले आहे. त्यांची अवस्था दात व नखे काढलेल्या सिंहासारखी झाली आहे. आता त्यांना पदोपदी मानहानी सहन करावी लागणार किंवा भाजपपुढे बचावातच रहावे लागणार हे उघड आहे. ते त्यांच्या शांत स्वभावाबद्दल ओळखले जात. परंतु अलीकडे त्यांचा वारंवार तोल सुटताना दिसतो व ते चिडचिडे झाल्याचे सांगितले जाऊ लागले आहे. बिहारमधील राजकारण आता आपल्या तालावर कसे चालेल याचा पहिली चुणूक भाजपच्या नेतृत्वाने दाखवली आहे.**



मानले जाते. या राज्यात अजुनही भाजपला म्हणावे तसे यश मिळालेले नाही म्हणजेच स्वबळाचे सरकार स्थापन करता आलेले नाही. केंद्रातील सत्तापक्ष या नात्याने बिहारमध्ये आपली स्वबळाची सत्ता असण्याचे स्वप्न राखण्यात गैर काहीच नाही. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत भाजपने आपली चाल खेळली आणि पाहिजे ते यश मिळवले. बिहारमध्ये भाजपला स्वबळाचे बहुमत मिळाले नसेल परंतु ते न मिळूनही आणि मुख्यमंत्रीपद मित्रपक्षाला देऊनही खरा विजेता भाजपच राहिला आहे.

भाजपने बिहारमधील यशासाठी राजकीय जुगार खेळला. बिहारमध्ये भविष्यात स्वबळावर सत्तेत यायचे असेल तर नीतीशकुमार यांचा पत्ता प्रथम साफ केला पाहिजे हे भाजपचे पहिले उद्दिष्ट होते. परंतु त्यासाठी नीतीशकुमार यांच्याशी प्रत्यक्ष संघर्षाची कल्पना भाजपला मान्य नव्हती. यासाठी त्यांनी गनिमी काव्याचा वापर करायचे ठरविले. नीतीशकुमार यांना या निवडणुकीत अशा रीतीने पंगु करायचे की त्यांना भाजपच्या आधाराखेरीज पर्याय



राहिला नाही पाहिजे. मग भाजपने तशी रणनीती आखून काम सुरु केले. त्यासाठी त्यांना त्यांचाच मित्रपक्ष असलेल्या लोकजनशक्ति पक्षाची मदत मिळाली. भाजपचे नशीब जोरावर असावे कारण या पक्षाचे प्रमुख आणि मोदी मंत्रिमंडळातील एक मंत्री रामविलास पास्वान यांचे निवडणुकीच्या ऐन तोंडावर निधन झाले. त्यांचे राजकीयदृष्ट्या अपरिपक्व व अननुभवी चिरंजीव चिराग पास्वान यांच्या कडे त्या पक्षाची सूत्रे गेली. केवळ बिहारपुरताच हा पक्ष मर्यादित असणे ही बाब आणखी पथ्यावर पडणारी होती. भाजपचा खेळ सुरु झाला. रामविलास पास्वान आणि नीतीशकुमार यांच्यातील राजकीय दुरावा आणि मतभेदाचा आपल्या फायद्यासाठी वापर करण्याचे हे राजकारण होते. बिहार निवडणुकाच्या आधीपासूनच रामविलास पास्वान हे रुग्णाईत झाले होते आणि सक्रिय राजकारणापासून आपोआपच दूर झाले होते. यानंतर पक्षाची सूत्रे त्यांचे चिरंजीव खासदार चिराग पास्वान यांच्याकडे आली. भाजपने त्यांच्या अपरिपक्वता व अननुभवाचा पुरेपूर फायदा उठवीत त्यांना नीतीशकुमार यांच्याविरोधात पुरते भडकवले. बिहारमध्ये नीतीशकुमार यांच्याऐवजी भाजप व लोजप(लोकजनशक्ति पक्ष) यांचे सरकार स्थापन करण्याचे स्वप्न त्यांना दाखविण्यात आले.



चिराग पास्वान हे भाजपच्या तालावर नाचू लागले. सर्वप्रथम त्यांनी नीतीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली बिहार विधानसभा निवडणुकीत उतरण्याचे साफ फेटाळून लावले. भाजप बरोबर आपण जागावाटपाचा समझोता करु परंतु नीतीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलाबरोबर समझोता सोडाच पण त्यांच्या विरोधात निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी जाहीर करुन टाकले. दुसरीकडे भाजपने चिराग पास्वान यांच्याबाबत तोंडात गुळणी धरण्याचे धोरण अवलंबिले. चिराग पास्वान यांनी बिहार विधानसभेच्या सर्वच्या सर्व जागा लढविण्याचे जाहीर केले. परंतु मागाहून ते आणि भाजपमध्ये अप्रत्यक्ष समझोता झाला की भाजपच्या आघाडीत त्यांच्या पक्षाला ज्या जागा सोडण्याचे ठरविण्यात आले होते त्या सुमार तीस जागांवर भाजप उमेदवार उभे करणार नाही. हा सरळसरळ नीतीशकुमार यांना घात करण्याचा प्रकार होता. मागाहून भाजपने या जागांवरही काही उमेदवार उभे केल्याचे सांगण्यात आले. परंतु ते कमकुवत देण्यात आले. दुसरीकडे चिराग यांनी भाजपच्या विरोधात फारसे उमेदवार उभे न करता संयुक्त जनता दलाच्या विरोधातच प्रामुख्याने उमेदवार उभे केले. म्हणजेच एकप्रकारे भाजपला मदत होईल अशाच रीतीने त्यांनी उमेदवार उभे केले. याचे जे फलित भाजपला अपेक्षित होते तसेच प्राप्त झाले.



बिहारचे नवे उपमुख्यमंत्री तारकिशोर प्रसाद व रेणू देवी

चिराग पास्वान यांनी नीतीशकुमार यांच्या सामाजिक न्यायावर आधारित मतांमध्ये यशस्वी पाचर मारली आणि नीतीशकुमार यांची गाडी ४३ वरच रोखली. दुसरीकडे भाजपने ७४ पर्यंत मजल मारली. यामुळे नीतीशकुमार यांना पंगु करण्याबरोबरच त्यांचे भाजपवरील परावलंबित्व वाढविण्याचा भाजपचा



डाव यशस्वी झाला. भाजपने निवडणुकीपूर्वीपासूनच नीतीशकुमार यांचे नेतृत्व व मुख्यमंत्रीपद यांच्या घोषणा करुन टाकलेल्या होत्या. निकालानंतर आणि आपल्या पक्षाची दाणादाण झाल्यानंतर नीतीशकुमार यांची मुख्यमंत्रीपदाबाबत चलबिचल सुरु झाली. परंतु गृहमंत्री अमित शहा यांचे त्यांच्याशी बोलणे झाले आणि नीतीशकुमार हे मुख्यमंत्रीपद स्वीकारण्यास तयार झाले. आता नीतीशकुमार हे मुख्यमंत्री असले तरी त्यांचे वलय नष्ट झाले आहे. त्यांची अवस्था दात व नखे काढलेल्या सिंहासारखी झाली आहे. आता त्यांना पदोपदी मानहानी सहन करावी लागणार किंवा भाजपपुढे बचावातच रहावे लागणार हे उघड आहे. ते त्यांच्या शांत स्वभावाबद्दल ओळखले जात. परंतु अलीकडे त्यांचा वारंवार तोल सुटताना दिसतो व ते चिडचिडे झाल्याचे सांगितले जाऊ लागले आहे. बिहारमधील राजकारण आता आपल्या तालावर कसे चालेल याचा पहिली चुणूक भाजपच्या नेतृत्वाने दाखवली आहे. नीतीशकुमार यांचे भाजपमधील अतिविश्वासू मित्र व सहकारी आणि उपमुख्यमंत्री म्हणून त्यांना साथ देणारे सुशील मोदी यांना भाजपने यावेळी बाहेरचा रस्ता दाखवला. त्यांच्याऐवजी भाजपने नीतीशकुमार यांच्या गळ्यात दोन उपमुख्यमंत्री बांधले आहेत. आता सुशील मोदी यांना बिहारच्या राजकारणातूनच उखडण्यात आले असून त्यांना पास्वान यांच्या निधनामुळे रिकाम्या झालेल्या राज्यसभेच्या जागेवर उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांचा अनुभव आणि ज्येष्ठता लक्षात घेता त्यांना केंद्रात मंत्रीपद दिले जाऊ शकते. येथेही भाजपने एका दगडात दोन पक्षी मारले. एकतर सुशील मोदी यांचे बिहारच्या राजकारणातून उच्चाटन व त्याचबरोबर पास्वान यांच्या निधनाने रिकाम्या जागेवर हक्क सांगण्यास चिराग पास्वान यांना वाव न ठेवणे. आता चिराग पास्वान यांना त्यांचे मांडे मनातच खावे लागतील. पास्वान यांच्या निधनानंतर चिराग यांना केंद्रात मंत्री केले जाईल अशीही अपेक्षा होती आणि चिरागही ती स्वप्ने पहात होते. परंतु भाजपने अजुनपर्यंत तरी त्यांना ताकास तूर लागू दिलेला नाही. ते आशा लावून बसलेले आहेत. भाजपने सुशील मोदी यांना उमेदवारी दिल्यानंतर चिराग पास्वान यांनी सांगितले की बिहार विधानसभेची निवडणूक त्यांनी स्वतंत्रपणे लढविल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या त्यांचा पक्ष भाजप आघाडीचा घटकपक्ष राहिलेला नाही. तसेच गेल्या वर्षी रामविलास पास्वान हे राज्यसभेचे सदस्य झाले तीही पोटनिवडणूकच होती आणि कायदामंत्री रविशंकर प्रसाद हे लोकसभेवर निवडून आल्याने रिकामी झालेली होती. म्हणजेच मूळ ही जागा भाजपचीच असल्याने त्यावर भाजपने हक्क सांगणे नैसर्गिक आहे असा शेळपट युक्तिवाद करुन चिराग पास्वान गप्प बसले. परंतु त्यांच्या पक्षात थोडाफार गोंधळ झालाच. पास्वान यांच्या जागेवर त्यांच्या पत्नी रीना यांना उमेदवारी भाजपने द्यायला हवी होती असे लोकजनशक्ति पक्षाच्या नेत्यांनी म्हटले. अप्रत्यक्षपणे ते चिराग पास्वान यांची



भावनाच बोलून दाखवीत असावेत. चिराग पास्वान यांची अवस्था आता 'ना घर का ना घाट का' अशी धोब्याच्या श्वानासारखी झाली आहे. ते तांत्रिकदृष्ट्या भाजप प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीतही नाहीत आणि बिहारमध्येही ते पराभूत झालेले आहेत व त्यामुळेच त्यांच्यापुढे राजकीय भवितव्याचा प्रश्न उभा राहिलेला आहे. भाजपचे हेच उद्दिष्ट होते. नीतीशकुमार यांना पंगु करायचे आणि लोकजनशक्ति पक्षाचे अस्तित्व पुसून टाकायचे. त्याच दिशेने ही वाटचाल सुरु आहे. बिहारमधील राजकीय चालींमधील भाजपची ही आणखी एक सरशीची चाल!

बिहारच्या राजकारणात रामविलास पास्वान आणि नीतीशकुमार यांचे कधीच पटलेले नव्हते. परंतु दोघांनीही काही मर्यादा पाळून राजकारण केले. परस्परांना संपविण्याचा प्रयत्न केला नाही. किंबहुना भाजप आघाडीतही ते दोघे अंतर राखून का होईना पण बरोबर राहिले. भाजपला बिहारमधील राजकारणातला एक वाटेकरी संपविणे महत्वाचे होते. पास्वान यांच्या पक्षाची हमखास मते ही साधारणपणे सहा ते सात टक्के आहेत. त्यासाठी भाजप एखादा पर्याय उभा करु शकतात आणि त्यातून चिराग यांचा राजकीय प्रवास संपू शकतो. सध्याच्या घडामोडी त्याकडेच दिशानिर्देश करतात.

बिहारच्या राजकारणाची सूत्रे आता भाजपच्या हाती आली आहेत. प्रश्न एवढाच आहे की नीतीशकुमार हे कितीकाळ त्यांच्या तालावर नाचणार ? भाजपला बिहारमध्ये त्यांचा मुख्यमंत्री हवा आहे हे स्पष्ट आहे. त्यासाठी त्यांनी नीतीशकुमार यांना किती कालावधी दिला आहे ते गुलदस्तात आहे. यापूर्वी देखील भाजपने नीतीशकुमार यांना राष्ट्रीय राजकारणात येण्याचा प्रस्ताव दिलेला होता. त्यांच्या ज्येष्ठतेनुसार त्यांना केंद्रात स्थान देण्याचे मधाचे बोटही लावण्यात आले होते परंतु तेव्हा बिहारची सूत्रे नीतीशकुमार यांच्या हाती असल्याने भाजपचा प्रस्ताव नाकारण्याची ताकद त्यांच्याकडे होती. आता ती ताकद संपलेली आहे. आणखी दोन वर्षांनी भाजपने त्यांना मुख्यमंत्रीपद सोडा म्हणून सांगून केंद्रात येण्यास फर्मावले तर ते फर्मान नाकारण्याची ताकद आता नीतीशकुमार यांच्यात नाही. त्या परिस्थितीत त्यांचे पर्याय फारच मर्यादित असतील आणि त्यात त्यांच्या पदरी केवळ मानहानीच पडणार आहे. भाजपच्या वरचढपणाला न जुमानता मुख्यमंत्रीपद सोडणे आणि मग त्या परिस्थितीत महाराष्ट्राप्रमाणे महाविकास आघाडीची बिहार आवृत्ती करणे हा एक पर्याय त्यांच्यापुढे राहतो. किंवा स्वतःचा आब राखताना मुख्यमंत्रीपद सोडणे आणि केंद्रात जाण्याचा प्रस्ताव नाकारुन भाजपचा दुय्यम भागीदार म्हणून बिहारमध्ये पक्षाचे अस्तित्व टिकवून ठेवणे. परंतु नीतीशकुमार हे आता त्यांच्या राजकीय निवृत्तीच्या दिशेने वाटचाल करु लागले आहेत अशी चिन्हे स्पष्ट होताना दिसतात. कारण ही परिस्थिती त्यांचा राजकीय स्वाभिमान राखणारी नाही. त्यामुळेच नीतीशकुमार यांच्यावर सर्वांचीच नजर राहणार आहे. बिहारमध्ये भाजपने राजकीय सूत्रे हाती घेतल्याचे चित्र असले तरी सामाजिक न्यायाच्या शक्ति संपलेल्या नाहीत हे राष्ट्रीय जनता दल व पक्षाचे नवे तरुण नेते तेजस्वी प्रसाद यांच्या कामगिरीने स्पष्ट झालेले आहे आणि कदाचित भविष्यात या शक्तींची एकजूट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजेच भाजपच्या धर्माधारित राजकारणाचा पर्याय बिहारने कायम राखला आहे !







## राजनाथसिंग यांना वगळले का??

दिल्लीच्या सीमांवर शेतकऱ्यांनी ठाण मांडले. दिल्लीच्या चतु:सीमा नव्हे तर 'पंच-सीमा' म्हणजे पाच सीमा त्यांनी रोखून धरल्या. दिल्ली अशी आवळली गेल्यानंतर दिल्लीश्वरांना खडबडून जाग आली.

आधी हे शेतकरी नसून खलिस्तानी आहेत, दहशतवादी आहेत असा खोटा प्रचार सत्ताधारी प्रचारतंत्री टोळ्यांकडून करण्यात आला. परंतु जेव्हा शेतकऱ्यांनी वेढा आवळायला सुरुवात केल्यानंतर सरकार दरबारी त्याची दखल घेऊन सल्लामसलती सुरु झाल्या.

कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर यांचा कायम गुर्मीचा अविर्भाव असतो. त्यामुळे त्यांनी ३ डिसेंबरला चर्चा करु असे एकतर्फी जाहीर केले.


शेतकऱ्यांनी त्यास कचऱ्याची टोपली दाखवली. मग द्वितीय लोहपुरुष उर्फ गृहमंत्री अमित शहा यात प्रवेश करते झाले. त्यांनी शेतकऱ्यांना बुराडीच्या मैदानात जमलात तरच वाटाघाटी करु अशी अट घातली.



शेतकरी यामुळे आणखीनच खवळले. आम्ही दोन महिने ठिय्या मारुन बसण्याच्या तयारीने आलो आहोत आणि नसत्या अटी मान्य करणार नाही असे सांगताच सरकार दरबारी धावपळ सुरु झाली.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांच्या घरी रविवारी रात्री द्वितीय लोहपुरुष, संरक्षणमंत्री राजनाथसिंग, तोमर हे जमा झाले आणि त्यात शेतकऱ्यांना बिनशर्त





भेटण्याचे मान्य करण्यात आले. त्यानुसार सोमवारी शेतकऱ्यांबरोबर चर्चेची पहिली फेरीही पार पडली. याआधी झालेल्या सरकारी चर्चा व सल्लामसलतींमध्ये राजनाथसिंग सहभागी होते. राजनाथसिंग यांची 'किसान का बेटा' अशी भाजपमध्ये ओळख आहे. वाजपेयींच्या मंत्रिमंडळात ते कृषिमंत्री होते.

भाजपने शेतकऱ्यांच्या समस्यांच्या अध्ययनासाठी नेमलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते व त्यात शेतकऱ्यांच्या कर्जाच्या व्याजदरात कपात करण्याची त्यांनी महत्वाची शिफारस केली होती.



राजनाथसिंग हे भाजपमधील एक मवाळ नेते म्हणून ओळखले जातात आणि त्यांची शेतीची पार्श्वभूमि लक्षात घेऊन त्यांच्याकडे शेतकऱ्यांबरोबरच्या वाटाघाटींची सूत्रे दिली जाणार असल्याची चर्चा सुरु झाली. त्यानिमित्ताने राजनाथसिंग यांच्या अनुकूल अशा काही बातम्याही प्रसारित होऊ लागल्या.

मग काय? वारे फिरले की हो!

सोमवारी राजनाथसिंग हे वाटाघाटींचे नेतृत्व करणार असे प्रसिध्दही झाले. होते पण प्रत्यक्षात विज्ञान भवनात कृषि मंत्री नरेंद्रसिंग तोमर आणि वाणिज्य व रेल्वेमंत्री पियुष गोयल पोहोचले. आता सर्वांनाच प्रश्न पडला की पियुष गोयल आणि शेती व शेतकऱ्यांचा संबंध काय? पण शेतीशी संबंधित राजनाथसिंग यांची मात्र 'छुट्टी' करण्यात आली. वर्तमान राजवटीमध्ये एखाद्या मंत्र्याबद्दल माध्यमांमध्ये काही अनुकूल किंवा चांगली प्रशंसा आलीच तर तिचा पत्ता 'कट' असा प्रकार आढळून येतो. त्यामुळेच इतर काही खात्यांचे काही मंत्री चांगले काम करुनही प्रसिध्दीपासून दूर राहतात. आता गृहमंत्री, कृषिमंत्री, पियुष गोयल आणि पक्षाध्यक्ष नड्डा हे या शेतकरी आंदोलनातून उत्पन्न परिस्थितीची हाताळणी करीत आहेत. बाकीचे सारे आऊट!

## धाडिला 'राम' 'त्यां'नी का वनी??

रा.स्व.संघाचे एकेकाळचे प्रवक्ते आणि मागाहून भाजपमध्ये बदली करण्यात आलेले राम माधव सध्या 'वनवास हा दुःखाचा' (मूळ गाण्यात सुखाचा) गाणे म्हणत काळ व्यतीत करीत आहेत.

विश्वगुरुंनी देशाची जबाबदारी सांभाळल्यानंतर राम माधव यांनाही पक्षसंघटनेत अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या मिळाल्या होत्या.

जम्मू-काश्मीरसारख्या संवेदनशील राज्याचे ते प्रभारी



सरचिटणीस झाले. त्याचप्रमाणे ईशान्येच्या राज्यातही वेळप्रसंगी त्यांना पाठविण्यात आले होते. तसेच मोदींच्या परदेश दौऱ्यात तेथील भारतीयांच्या संघटनाचे कामही त्यांनी केले होते. त्या काळात म्हणजेच 'मोदी-०१' काळात ते 'हाय प्रोफाईल' झाले होते. त्यांनाही ते फारच मोठे झाल्याचा आभास होऊ लागला होता आणि

त्यात त्यांना ते परराष्ट्र संबंध विषयातील तज्ञ झाल्याचेही वाटू लागले आणि विश्वगुरुंच्या परराष्ट्रनीतीवर ते अभ्यासपूर्ण लेख लिहून तिचे महत्व विषद करु लागले होते. त्यांची ही भरारी कुतुहलजनक राहिली. परंतु भाजपच्या संघटनात्मक बदलानंतर दिवस फिरले.

नवे अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनी रा.स्व.संघातून भाजपमध्ये आलेल्या राम माधव यांच्याबरोबरच पी.मुरलीधर राव(स्वदेशी जागरण मंच) यांना त्यांच्या टीममध्ये जागा दिली नाही. तेव्हापासून राम माधव यांची अवस्था अधांतरी झाली आहे.

मनातली खदखद कधी ना कधी बाहेर येतच असते! राम माधव यांनी इंग्रजी वृत्तपत्रातून अलीकडेच काही लेख लिहिले. संविधान दिवसानिमित्त त्यांनी लिहिलेल्या लेखात अशी काही सूचक विधाने त्यांनी केली आहेत की त्यांचा 'रोख' कुठे आहे हे लक्षात यावे. या लेखात त्यांनी नेत्यांकडून पालन करण्यात आलेली संवैधानिक नैतिकता आणि तळातल्या



कार्यकर्त्यांकडून घटन संरक्षणाबाबत दाखविण्यात आलेली सक्रियता यामुळे भारतीय लोकशाही टिकाऊ झाल्याचे नमूद केले आहे. लोकशाहीत नेते आणि कार्यकर्ते यांनी परस्परांकडे शत्रु म्हणून न पाहता देशाच्या जडणघडणीतले घटक म्हणून पाहिले पाहिजे असेही म्हटले आहे.

आणखी एका टिप्पणीत त्यांनी लोकशाही व्यवस्थेत केवळ निर्वाचित संस्थांनाच महत्व देणे योग्य नाही कारण अ-निर्वाचित संस्थांची देखील लोकशाही व्यवस्थेचा गाडा चालविण्यात महत्वाची भूमिका असते आणि म्हणूनच त्यांचे स्थान व महत्व कमी लेखणे अनुचित आहे असे म्हटले आहे. त्यांच्या या दोन्ही टिप्पण्या सूचक आणि एक प्रकारे वर्तमान राजवटीच्या विरोधात मानल्या जातात. राज्यसभा ही एक अप्रत्यक्ष निवडीच्या प्रक्रियेने तयार होणारी संस्था आहे आणि सरकारची काही विधेयके तेथे अडविल्यानंतर भाजपच्या नेतृत्वाने राज्यसभा हा अडथळा असून अशा 'अ-निर्वाचित' संस्था राज्यकारभारात अडथळे निर्माण करतात, त्यांच्या अस्तित्वाची गरज काय येथपर्यंत मजल गाठली होती.



थोडक्यात वनवासात गेलेल्या रामाला आता हे दोष दिसू लागले आहेत!

आता 'उठी श्रीरामा पहाट झाली' असे गाणे म्हणावे लागेल.

## चुकीला क्षमा नाही!

नीतीशकुमार यांच्याबरोबर तीन वेळेस उपमुख्यमंत्री म्हणून काम केलेले सुशील मोदी हे बिहारमधील भाजपचा चेहरा मानले जात!

हा चेहरा आता पुसण्यात आला आहे. सुशील मोदी यांना ताज्या सरकारस्थापनेत उपमुख्यमंत्री करण्यात आले नाही. विधानसभेची निवडणूक जिंकल्यानंतरही त्यांची रवानगी दिल्लीकडे राज्यसभेत करण्यात येत आहे. दिल्लीत आल्यानंतर





कदाचित त्यांना एखादे केंद्रीय मंत्रीपदही दिले जाईल. पण बिहारच्या राजकारणापासून त्यांना तोडण्यात आले.

सुशील मोदींवर नेतृत्वाची एवढी खप्पा मर्जी का?


२०१३ मधील एका प्रसंगाचा दाखला यासंदर्भात दिला जातो.

विश्वगुरुंनी पक्षातर्फे स्वतःला पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून जाहीर करण्यासाठी मोहिम सुरु केलेली होती. त्यावेळी बिहारमध्ये एका पत्रकार परिषदेत बोलताना सुशील मोदी यांनी त्यांचे निकटचे मित्र नीतीशकुमार यांच्यातही पंतप्रधान होण्याचे गुण आहेत असे विधान केले होते. तेव्हापासून सुशील मोदी हे विश्वगुरुंच्या 'हिटलिस्ट'वर होते आणि संधी येताच सुशील मोदी यांना त्यांच्या २०१३ मधील विधानाची किंमत चुकवावी लागली असे ही माहिती असलेल्या भाजप नेत्याने सांगितले. 'ते' अशा गोष्टी कधीही विसरत नाहीत आणि त्यांच्याकडे 'अशा चुकांना' क्षमाही नसते आणि अत्यंत कठोरपणे त्याबद्दल शिक्षा केली जाते अशी पुस्तीही त्याने जोडली.

## अहमदभाईंची जागा घेणार कोण?

काँग्रेसचे रणनीतीकार मानले जाणाऱ्या अहमद पटेल यांच्या अचानक निधनाने पक्षावर आणखी एक संकट कोसळले आहे.

काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत बाबींप्रमाणेच काँग्रेस पक्ष आणि इतर मित्रपक्ष यांच्याबरोबरचा 'खात्रीलायक संपर्क दुवा' ही जबाबदारी त्यांनी फार मोठ्या क्षमतेने पार पाडली होती. त्यामुळेच डाव्या पक्षांचे नेते असोत, लालूप्रसाद असोत किंवा अन्य कुणी सर्वांबरोबर अहमदभाईंचे उत्तम संबंध होते. राहूल गांधी यांच्या उदयानंतर त्यांचे पक्षातील स्थान डळमळीत होईल काय असे वाटले होते. परंतु राजकीय सल्लागार म्हणून त्यांचे अधिकृत पद राहिले नसले तरी अनौपचारिकपणे ते ती जबाबदारी सांभाळत राहिले. त्यामुळेच फेरबदलानंतर त्यांच्याकडे पक्षाच्या खजिनदारपदाची जबाबदारी देण्यात आली होती.



अत्यंत नाजुक परिस्थितीत ही जबाबदारी त्यांच्याकडे आली होती. पराभवामुळे काँग्रेसच्या मिळकतीवर व खजिन्यावरही प्रतिकूल परिणाम झालेला असताना तो सांभाळण्याची आणि त्यात वाढ करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली होती.

काँग्रेसचे खजिनदार नसतानाही अहमदभाई ती जबाबदारी पार पाडतच होते. मोतीलाल व्होरा हे खजिनदार होते परंतु पक्षासाठी देणग्या आणण्याची त्यांची क्षमता मर्यादित होती. आलेला पैसा प्रामाणिकपणे राखण्याचे काम त्यांनी इमानाने केले. पण अहमदभाई पैसा आणणे आणि राखणे या दुहेरी भूमिकेत राहिले. अचानक अहमदभाईंनी 'एक्झिट' केली.आता खजिनदार कोण?

तूर्तास काँग्रेसच्या हंगामी अध्यक्षा सोनिया



गांधी यांनी पवनकुमार बन्सल यांची त्या जागी नियुक्ति केली आहे. काहीशी आश्चर्यकारक अशीच ही नियुक्ति मानली जाते. कारण बन्सल हे पक्षातील फार मोठे वजनदार किंवा वरिष्ठ मानल्या जाणाऱ्या किंवा पहिल्या फळीतले नेते मानले जात नाहीत. एवढेच नव्हे तर ते रेल्वेमंत्री असताना त्यांच्या पुतण्याने त्यांच्या नात्याचा फायदा घेऊन काही गैरव्यवहार केल्याचे उघडकीस आल्याने त्यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. ते व अन्य काही प्रकरणेही त्यांच्याविरुध्द चालू आहेत. त्यामुळे अशी पार्श्वभूमि असलेल्या बन्सल यांच्या नियुक्तीबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

कॉर्पोरेट जगताशी संबंध असलेल्या काँग्रेसच्या नेत्यांमध्ये सध्या कमलनाथ, दिग्विजयसिंग या नेत्यांचा समावेश होतो. परंतु त्यांना दूर राखण्याची बाब फारच सूचक मानली जाते. राहूल गांधी यांनी पुढील वर्षाच्या सुरुवातीला पक्षाची सूत्रे पुन्हा हाती घेतली तर कदाचित खजिनदारपदी त्यांचे अतिशय विश्वासू सहकारी कनिष्कसिंग यांची नेमणूक होऊ शकते अशी अटकळही लावली जात आहे.

मोतीलाल व्होरा खजिनदार असताना कनिष्कसिंग हे नियमितपणे त्यांच्याकडे येत असत. त्यावेळी असे सांगितले जात होते की कनिष्कसिंग हे व्होरा यांच्याकडून 'धडे' घेत आहेत. परंतु अहमदभाईंची नेमणूक मध्येच झाल्याने त्या चर्चेला विराम मिळाला. परंतु आता पुन्हा त्यांचे नाव चर्चेत आले आहे.

खजिनदारपदाचा प्रश्न सुटेलही...........पण राहूल गांधी यांचे राजकीय सचिव कोण असतील? यापूर्वी अशोक गेहलोत यांनी काही काळ ते काम पाहिले होते. पण त्यांचा जीव राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदात अडकलेला आहे.

मग कोण????

शोधा उत्तर ..........!

## दिल्ली ते गल्ली...एकच ध्यास..... सत्ता!

बिहारमध्ये कशीबशी सत्ता मिळवल्यानंतर पुढील वर्षी पाच राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांवर भाजपचे नेतृत्व लक्ष केंद्रित करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात होती. त्यानुसार पश्चिम बंगालमधून ममता बॅनर्जी यांना उखडण्यासाठी द्वितीय लोहपुरुषांनी तेथे धडकही मारली. तोपर्यंत हैदराबाद म्युनिसिपालिटीच्या निवडणुका असल्याने भाजपने तिकडे मोर्चा वळवला.

हैदराबादचे दक्षिणेतले महत्व वेगळ्याने सांगण्याची गरज नाही. सध्या ही तेलंगणा आणि आंध्र प्रदेशाची संयुक्त राजधानी असली तरी या शहराचे एक वेगळे महत्व आहे. भाजपला आता दक्षिणेत तेलंगणाचे राज्य कब्ज्यात घेण्याची लालसा उत्पन्न झाली आहे. त्यामुळे सुरुवातीच्या






काळात तेलंगणा राष्ट्र समितीबरोबर चांगुलपणाचे संबंध दाखविल्यानंतर आता भाजपने थेट हा पक्ष आणि मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांच्यावरच हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. तेलंगणात भ्रष्टाचार शिगेला पोहोचल्याचे आरोप भाजपने सुरु केले आहेत.



पण ही पुढची गोष्ट झाली.

आता भाजपाने हैदराबादची म्युनिसिपालिटी ताब्यात घेण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले आहे.

हैदराबादची म्युनिसिपालिटी?

होय, त्यांना हा प्रतीकात्मक विजय मिळवायचा आहे आणि त्यानंतर तेलंगणावर कब्जा करायचा आहे. मग काय?

हैदराबाद म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीच्या प्रचारात साक्षात द्वितीय लोहपुरुष अवतरले. केवळ तेच नव्हे तर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा पण प्रचारात उतरले.

......आणि हो, उत्तर प्रदेशचे जबरदस्त मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे देखील प्रचारात गेले होते. लोहपुरुष आणि योगी या दोन जबरदस्त नेत्यांसमोर नड्डा यांचा प्रभाव फिकाच राहणे स्वाभाविक होते.

पण या दोन्ही जबरदस्त नेत्यांनी बिनधास्तपणे हिंदू-मुस्लिम अशा धार्मिक आधारावर प्रचार करुन टाकला. भाजपला शहरे, रस्ते यांची नावे आणि ती मुस्लिम असतील तर हमखास बदलण्याचे व्यसनच लागले आहे. सर्वसामान्यांना संभ्रमित करण्यासाठी ही एक चलाखी नेहमीच




खेळली जाते. त्यानुसार हैदराबादचे नाव 'भाग्यनगर' करण्याची घोषणा या नेत्यांनी करुन टाकली.

आपण हिंदूंचे नेते असल्याचे ठसविण्यासाठी पारंपरिक भाग्यलक्ष्मी देवीच्या मंदिरात दर्शन घेऊन प्रचाराला प्रारंभ करण्यात आला.

या नेत्यांनी प्रचारसभात हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरणाचा एकही प्रयत्न सोडला नाही. त्यासाठी निजाम, रझाकार, पाकिस्तान, दहशतवाद, लादेन अशी सर्व नावे यथेच्छपणे वापरली गेली. यातच तेलंगणाचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव, तेलंगणातील भ्रष्टाचार याबद्दलही बेलगाम आरोपांची उधळण करण्यात आली. राष्ट्रीय म्हणविणारा पक्ष आणि त्या पक्षाचे राष्ट्रीय नेते इतक्या खालच्या थराला जाऊन प्रचार करणे हा प्रकार गेल्या ७० वर्षांच्या इतिहासात भारताने अनुभवला नसेल!

एका महानगरपालिकेत सत्ता मिळविण्यासाठी जिवाचा आटापिटा?

सत्तेची महत्वाकांक्षा असणे स्वाभाविक असते परंतु लालसा, पिपासा ही माणसाला विधिनिषेधशून्य बनवते. हैदराबादच्या महानगरपालिकेसाठीही केंद्रीय नेते प्रचारात उतरुन ध्रुवीकरणाच्या आधारे मते मागतात हे सत्तापिपासेचे लक्षण असते!

## अजुन नियमांचाच पत्ता नाही?

गाजावाज्यात गेल्या डिसेंबर महिन्यात म्हणजे डिसेंबर-२०१९मध्ये संसदेच्या हिवाळी अधिवेशनात नागरिकत्व दुरुस्ती कायदा संमत करण्यात आला होता.

सरकारच्या शिरपेचात आणखी एक पीस खोवले गेले. कायदा संसदेत संमत झाल्यानंतर राष्ट्रपतींची







त्यावर सही होते. त्यानंतर पुढील सहा महिन्यात त्या कायद्याची नियमावली तयार करावी लागते. ही नियमावली तयार करुन ती अधिसूचित केल्यावर मग या कायद्याची विधिवत अंमलबजावणी सुरु केली जाते.

परंतु एक वर्ष होऊन गेल्यानंतर देखील अद्याप या कायद्याचे नियम तयार करण्यात आलेले नाहीत.

ऑगस्ट महिन्यात सरकारने आणखी सहा महिन्यांसाठी मुदतवाढ घेतलेली आहे. पण केंद्रात एवढे कार्यक्षम सरकार असताना असा उशीर लागण्याचे कारण काय? काही कारणे जरूर आहेत. कानोकानी आलेल्या माहितीनुसार पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निमित्त साधून ही नियमावली जारी करण्याचे सरकारच्या मनात घाटत आहे. पश्चिम बंगालचा मुहुर्त का? तर, हे निमित्त करुन ध्रुवीकरणाचे राजकारण करण्याचा डाव आहे!

अर्थात आणखीही एक कारण सांगितले जाते. या कायद्याला बांगला देशाने तीव्र हरकत घेतली होती. पंतप्रधान शेख हसीना यांनी त्याबद्दल नापसंती व्यक्त केली होती. त्यांच्या काही मंत्र्यांनी भारत-भेटीही रद्द केल्या होत्या. परंतु त्यानंतर राजनैतिक पातळीवरुन, उच्चस्तरीय संवादातून बांगला देशाच्या नेत्यांना खुलासे करण्यात आले व तूर्तास वातावरण काहीसे निवळले आहे.

परंतु पुढील वर्षी मार्च महिन्यात भारतीय पंतप्रधानांचा बांगला देश दौरा नियोजित आहे. बांगला देश निर्मितीला पन्नास वर्षे पूर्ण होणार असल्याने त्यानिमित्त होणाऱ्या सोहळ्यासाठी ते जाणार होते.

बांगला देश निर्मितीत भारताची भूमिका महत्वाची होती आणि तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे त्याचे श्रेय जाते. आता भारताचे पंतप्रधान त्या पार्श्वभूमीवर जात आहेत. त्यामुळेही या समारंभात काही कटुता निर्माण होऊ नये यासाठीही नियमावली लांबविण्यात येत असल्याचे सांगण्यात येते. अर्थात नियमावली तयार होत नाही तोपर्यंत कायदा लागू होणार नाही हे उघड आहे! तोपर्यंत मोकळा श्वास घ्या!!!

# इतिहासात प्रथमच दुर्गम भागात पोहोचले गृहमंत्री



# आदिवासी नक्षल भागात पोलीस व स्थानिकांबरोबर गृहमंत्र्यांची दिवाळी

उज्ज्वल भोयर

नक्षलवादी हिंसाचाराच्या विरोधात लढणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम भागात दिवाळीनिमित्त सपत्नीक भेट देऊन गृह मंत्री अनिल देशमुख यांनी पोलीस जवानांची उमेद वाढविली. देशमुख यांनी लक्ष्मी पूजनाच्या दिवशी गडचिरोलीपासून तीनशे किलोमीटर अंतरावर अत्यंत दुर्गम भागात व छत्तीसगडच्या सिमेवर असलेल्या पातागुडम येथील पोलिस चौकीला भेट देऊन जवानांसोबत दिवाळी साजरी केली.

दिवाळीच्या निमित्ताने प्रथमच गृह मंत्री येत असल्याने पोलीसांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. गृह मंत्र्यांनी येथील पोलीसांशी संवाद साधला. त्यांच्यासमवेत फराळ केला. नक्षलवाद्यांशी लढताना शहीद झालेल्या पोलीसांच्या कुटुंबियांची आस्थेने चौकशी केली. त्यांच्या घरांना भेटी दिल्या. कुटुंबियांशी संवाद साधत लहान मुलांसमवेत गप्पा गोष्टी केल्या

या भागामध्ये दौंड आणि कोल्हापूर येथील राज्य राखीव पोलीस बलाच्या तुकड्या कार्यरत आहेत. त्यांचे गृह मंत्र्यांनी विशेष कौतुक केले.

या वेळी बोलताना देशमुख म्हणाले, भावनेपेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणाऱ्या दिवाळीचा आनंददायी सण कुटुंब व मित्रांसोबत साजरा करायला मिळत नाही.

गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात पोलीस घरापासून, आपल्या आई-वडलांपासून, भावंडांपासून, पत्नी-मुलाबाळापासून दूर असाल, याची मला जाणीव आहे. तेव्हा पोलीस दलाचा कुटुंबप्रमुख म्हणून मला मनापासून वाटलं की मी तुमच्यात यायला हवं. माझं पोलिस दल ड्युटीवर असताना मी माझ्या घरात, माझ्या पत्नी-मुलांसमवेत दिवाळी साजरा करत बसलो असतो तर माझ्या मनाला रुखरुख लागली असती. म्हणून ठरवलं की तुमच्याकडं यायचं आणि काही वेळ तरी तुमच्या सोबत घालवायचा.



हिंसाचाराच्या विरोधात लढणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम भागात सपत्नीक भेट देऊन राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी सन साजरा करून भावनिक आधार पोलीसांना दिला. कुटुंबप्रमुख या नात्याने त्यांनी पोलीसांना प्रोत्साहन तर दिलेच परंतू दिवाळी साजरी करून कुटुंबातील इतर सदस्यांची उणीवही भरून काढली. पोलीसांबरोबर गप्पा, चर्चा, दिवाळी भेट वस्तू, दिवाळीतील खाद्य पदार्थ आणि अडीअडचणींवर चर्चा अशा अगदी घरातील वातावरणासारख्या चर्चा यावेळी झाल्या.

या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था बराकमध्ये केली आहे. त्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबियांसमवेत राहता येत नाही. गृहमंत्र्यांनी हा प्रश्न तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले. पोलीसांच्या इतर अडचणी समूजन घेतल्या. त्या त्वरित सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना आदेश दिले. सरकार सदैव पोलीस दलाच्या पाठीशी असल्याची ग्वाही देशमुख यांनी दिली.

महाराष्ट्र राज्यातील नक्षल प्रभावित गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा तालुक्यातील पातागुडम या ठिकाणी घरापासून हजारो किमी दूर देशासाठी सेवा करत असलेल्या जवानांबरोबर राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दि.१५ नोव्हेंबर रोजी दिवाळी साजरी केली. नक्षलवादी

गृहमंत्र्यांनी मनोगतातून यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या, जनतेच्या सेवेत अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी मी सपत्नीक यंदाची दिवाळी गडचिरोली पोलिस दलासोबत साजरी करत आहे. भावनेपेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणाऱ्या पोलिसांना दिवाळीचा आनंददायी सण कुटुंब व मित्रांसोबत साजरा करायला जमत नाही. त्यामुळे आपण पोलीस दलाचा कुटुंबप्रमुख म्हणून त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करीत आहे. यावेळी गृहमंत्री श्री. देशमुख यांनी पोलिसांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुकही केले.

पोलीसांचे मनोधैर्य वाढले : कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या व नेहमीच आपल्या कुटुंबापासून दूर असणाऱ्या पोलीस जवानांसोबत गृहमंत्र्यांनी दिवाळी साजरी केल्याने



निश्चितच त्यांचे मनोधैर्य वाढणार आहे. पोलीस नेहमीच सण, उत्सवाला आपले कर्तव्य पार पाडत असतात. त्यांना यावेळी आपल्या कुटुंबाची आठवण येतच असते. मग अशावेळी कुटुंबप्रमुख या नात्याने गृहमंत्र्यांनी दिलेली भेट त्यांना प्रोत्साहित करणारी व मनोधैर्य वाढविणारी आहे.






कर्मचारी भारावून गेले : गडचिरोली जिल्ह्यात प्रथमच दुर्गम भागात पोहोचलेल्या गृहमंत्र्यांच्या ऐतिहासिक भेटीने पोलीस कर्मचारी भारावून गेले. अत्यंत दुर्गम आणि टेकडयांचा प्रदेश असलेल्या पातागुडम येथे महिला पोलिस कर्मचाऱ्यांची श्री. देशमुख दाम्पत्याने आस्थेने विचारपूस केली. त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. गडचिरोली पोलीस मुख्यालयापासून तीनशे किलोमीटर अंतरावर छत्तीसगढ सीमेलगत इंद्रावती नदीकाठी पातागुडम पोलीस चौकी आहे. ही देशातील सर्वात दुर्गम चौकी मानली जाते. दिवाळीच्या निमित्ताने प्रथमच गृहमंत्री येत असल्याने पोलिसांमध्ये उत्साहाचे वातावरण त्या दिवशी होते. गृहमंत्री अनिल देशमुख यांनी येथील पोलीस जवानासोबत सविस्तर संवादही साधला. नक्षलवाद्यांशी लढताना शहीद झालेल्या पोलिसांच्या कुटुंबीयांची आस्थेने चौकशी केली. पोलीसांचे अडचणी सोडविण्यासाठी आपला विशेष भर



राहील असे त्यांनी सांगितले. त्या भागामध्ये दौंड आणि कोल्हापूर येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या तुकडया कार्यरत आहेत. त्यांचे गृहमंत्र्यांनी विशेष कौतुक केले.

गृहमंत्र्यांचे स्वागत : जिल्हयातील दुर्गम भागात राज्याचे गृहमंत्री संवाद साधणार आहेत. हे ऐकून जवान आनंदी झाले त्यांनी मंत्र्यांचे स्वागत केले. तसेच स्वागतामध्ये सलामी, दिवाळीचे फराळ अशा कार्यक्रमांचा आंतर्भाव करण्यात आला होता. दरम्यान गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या सोबत आलेल्या त्यांच्या गृहमंत्री आरतीताई देशमुख यांना येथे उपस्थित महीला ज्योती श्रीनिवास मारगोनी यांनी त्यांच्या बराकमध्ये नेवून त्यांचे स्वागत केले व त्यांना साडीची भेट दिली.

शहिद पोलीसांच्या कुटुंबाशी संवाद : नक्षल्यांबरोबर लढताना वर मरण आलेल्या पोलीसांच्या कुटुंबाबरोबर त्यांनी यावेळी संवाद साधला व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शासन सदैव तुमच्या पाठिशी राहिल याबाबत त्यांनी शहिद जवानांच्या कुटंबाला दिलासा दिला.

माध्यमांतील प्रतिक्रिया : गृह राज्यमंत्री अनिल देशमुख यांच्या आदिवासी व दुर्गम अशा गडचिरोली जिल्ह्याला भेट दिल्याने आदिवासी बांधवांचे प्रश्न सुटण्यासही मदत होणार आहे. त्यांनी दुर्गम अशा ठिकाणी भेट दिल्याने आदिवासी बांधवांचे तसेच कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचेही प्रश्न सुटण्यास तसेच आपुलकीची भावना निर्माण होण्यास मदत होईल. दुर्गम भागातील समस्या सुटण्यास मदत होणार आहे. या प्रकारे विविध माध्यमांनी या आशयाच्या बातम्या प्रकाशित केल्या.

गृहमंत्री अनिल देशमुख यांची प्रतिक्रिया : मी सपत्नीक नक्षलीदृष्ट्या अतिसंवेदनशील गडचिरोली जिल्ह्यातील पातागुडम येथे जाऊन पोलीस बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. आपल्या कुटुंबापासून दूर राहून देशाच्या रक्षणासाठी कर्तव्य बजावणाऱ्या शूर जवानांसोबत दिवाळी साजरी करणे ही आम्हा दोघांसाठी आनंदाची व अभिमानाची बाब आहे. भावनेपेक्षा कामाला प्राधान्य देणाऱ्या पोलीसांबरोबर दिवाळी साजरी करण्यास मिळणे माझे भाग्यच. आज मला खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी केल्याचा आनंद मिळाला आहे.



# ज्ञानाचे टवटवीत फूल

(पान ४ वरून)

आचरणात नुसते वागणे नाही. वागण्याबरोबर सत्वशील जाणीव महत्त्वाची असते. जाणिवेला अंतर्बाह्य स्वच्छपणाने जे जाणवते, ते ज्ञानाला पवित्र करते. ज्ञानाला सेवेची जोड असली की, ज्ञान क्रियाशील आणि जीवनाला खोली देते. ज्ञानाला पावित्र्याने जर सांभाळले तरच ते आत्मज्ञान मनाला उन्नत करते. पवार साहेबांनी ज्ञानाचे महत्व फार पूर्वीच ओखळून नवे नवे ज्ञान तरूण पिढीने आत्मसात केले पाहिजे यासाठी असंख्य संस्थांची उभारणी केली. साहित्य, कला, विज्ञान, अर्थशास्त्र, तंत्रज्ञान, वैद्यकशास्त्र अशी किती म्हणून शास्त्रांची नावे घ्यावीत. त्या सर्वांशी त्यांनी आपले नाते निर्माण केले आहे. अनंत सत्ता, अनंत ज्ञान आणि अनंत आनंद हे एकच आहेत. प्रेमाखेरीज ज्ञान असू शकत नाही आणि ज्ञानाखेरीज प्रेम असू शकत नाही म्हणून श्रद्धायुक्त ज्ञानाचे सामर्थ्य समजून घ्यायला हवे.

पवार साहेबांचे सर्व राजकीय पक्षातील नेत्यांशी आजही मैत्रीचे व जिव्हाळ्याचे संबंध आहेत. या अर्थाने ते अजात शत्रू आहेत. ते मनाने मनमोकळे आहेत. जे जे हितकर आहे ते ते त्यांनी त्या त्या पक्षाच्या नेत्यांसकट आपल्या मैत्रीतून जपले आहे. त्यांच्यावर टीका करणाऱ्यांनीही त्यांची मैत्री सोडलेली नाही. कारण त्यांची मैत्री नेहमीच समाजलक्षी होती. साहेबांचे बोलणे सौम्य आहे. ते फारसा कोणाचाही प्रत्यक्ष उपमर्द करीत नाहीत. कठोर, अपमानास्पद बोलत नाहीत. पण जे बोलायचे ते स्वच्छ, स्पष्ट व मवाळ असते. त्यांचा सल्ला अचूक, विचारगर्भ व दूरदृष्टीचा असतो. त्यामुळे अनेक नेते आजही त्यांच्याशी संपर्क ठेवून आहेत. नेता कोणत्या पक्षाचा आहे हे साहेबांच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे नसते. नेते व कार्यकर्ते जे काम करताहेत ते राष्ट्रहिताला पोषक आहे की नाही हे मात्र ते डोळ्यात तेल घालून बारकाईने पाहतात. विरोधासाठी विरोध ते कधीच करीत नाहीत. सध्या केंद्राने जी तीन कृषीबिले मंजूर केली आहेत त्यावरुन देशभर आंदोलने चालू आहेत. पण पवार साहेबांनी सरसकट सर्व बिलांना विरोध केलेला नाही. बिलातल्या काही गोष्टींना त्यांचा विरोध आहे तोही जाहीरपणे त्यांनी स्पष्ट केला आहे. सद्सद्विवेक बुद्धीचा वापर ते प्राधान्याने करीत असल्यामुळे सरकार कोणत्याही पक्षाचे असो. सारेजण त्यांचा सल्ला घेण्यास उत्सुक असतात. २०११ साली म्हणजे ७२ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने आजचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साहेबांना शुभेच्छा देताना जे उद्‌गार काढले होते ते प्रतिनिधीक असल्यामुळे मुद्दाम आपल्यापुढे ठेवतो. मोदी म्हणाले, **"वे विकास के प्रति प्रतिबद्ध है । वर्तमान में राजनितीक क्षेत्र में जो छुआछुत का माहौल प्रवेश हुआ है उससे वो पुरी तरह परे है । वौ सबको स्वीकार करते है ये बहुत बडी बात है । कृषि, किसान और गाँव के विकास के प्रति उनका लगाव है । उनका हर कदम उस ही दिशा में दिखाई देता है ।"**

देशाचे संरक्षण मंत्री म्हणून संरक्षण विभागाची जबाबदारी सांभाळत असताना शरदरावांनी आपल्या विचारांचा एक



वेगळा ठसा या खात्यावर उमटविला. संरक्षण विभागात महिलांच्या कर्तृत्त्वाला मोजले जात नव्हते. शरदरावांनी नवीन प्रथा निर्माण केली. त्यांनी संरक्षण खात्यातील अधिकाऱ्यांना निक्षून सांगितले की, स्त्रीच्या कर्तृत्त्वाला नवे आकाश मिळालेच पाहिजे. ती कशातही कमी नाही. आपण तिच्या याही कर्तृत्त्वाचा सन्मान केला पाहिजे. या निर्णयाला खुद्द संरक्षण विभागातील अधिकाऱ्यांचाच विरोध होता. शरदरावांनी त्यांना सौम्य भाषेत समजावून सांगितले. अशा करण्याची गरज स्पष्ट प्रतिपादन केली. त्यामुळे संरक्षण दलात पहिल्यांदा महिलांचा समावेश होऊ शकला. ही घटना भारतीय इतिहास कधीही विसरणार नाही. महिला सैनिक, विमानाच्या पायलट, जहाजावरच्या कप्तान होऊच शकत नाहीत असा एक ग्रह वर्षानुवर्षे चालत आलेला होता. शरदरावांनी या ग्रहाला तडा दिला. त्यांनी आग्रहाने सांगितले महिलांमध्ये 'पृथ्वी'एवढी क्षमता आहे. त्या आपले सामर्थ्य महाकाली होऊन दाखवू शकतात. पराक्रमाला सौंदर्याची जोड असली तर पुढली पिढी सुंदर होते हे भान कायम ठेवून महिलांमधली क्षमता त्यांनी अचूक ओळखली. सौंदर्य हे दिसण्यापेक्षा पराक्रमावर असतं हे त्यांनी भारतीय मनात रुजवलं. अर्थातच त्यांच्या या विचारांना संरक्षण दलातील अधिकाऱ्यांकडून जो विरोध झाला तो त्यांनी निश्चयाने मोडून काढला. या बाबतीत त्यांच्या मनाचा निश्चय ठाम होता तो त्यांनी पूरा केला. या संदर्भात कोणाचेही ऐकण्यापेक्षा त्यांनी स्त्रीशक्तीला नवे आवाहन केले. 'वंदे मातरम्'ची सार्थ जाणीव दिली. यातून स्त्री व्यक्तित्त्वाला नवा हुंकार आला. संरक्षण दलातील अत्यंत महत्त्वाच्या जागा आज स्त्रीया भूषवित आहेत. त्याच स्त्रिया आकाशात मुक्त मनाने संचार करीत आहेत. हे स्वप्न शरदरावांमुळे पूर्ण झाले. एखादा विचार किंवा एखादी घटना पुढे किती मोठे रुप धारण करु शकते ते यातून आपल्याला अनुभवायला मिळते. ती दृष्टी शरदरावांपाशी आहे. ती त्यांनी जपली आहे.

महिलांना सुरुवातीला ३३ टक्के आणि आता ५० टक्के आरक्षण मिळाले पाहिजे या आग्रही विचारांचा पाठपुरावा त्यांनी सर्वप्रथम केला. इतकेच नाही तर पुणे विद्यापीठाचे सावित्रीबाई फुले विद्यापीठ असा नामविस्तार करण्याचा आग्रह धरुन त्याला त्यांनी सकारात्मक होकार दिला. कर्तृत्त्वाच्या क्षेत्रात महिलांनी केलेले कार्य बहुधा त्यांना त्यांच्या आईच्या दुधातून मिळाले असावे. त्यांची आई शारदाबाई यांनी कष्टाने आणि जिद्दीने आपला प्रपंच पार पाडला. मुख्य म्हणजे मुलांना शिकविले, मुलांना आपल्या पायावर उभे केले. त्या काळात त्या पुणे जिल्हा लोकल बोर्डाच्या सदस्या होत्या. बैठकीला



त्या बारामतीवरुन पुण्याला स्वतः गाडी चालवित येत. या साऱ्यातून त्यांनी मुलांना खंबीर कणा दिला. कदाचित त्यांना शरदराव पुढे काय होणार आहेत हे कळले असावे म्हणून त्यांनी त्यांना राजकारणात जायला सांगितले आणि इतर भावंडांना सुरुवातीच्या काळात त्याच्या प्रपंचासाठी आर्थिक हातभार लावण्याची सूचनाही केली.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न शरदरावांनी मनापासून हाताळला. आत्महत्या करण्यापेक्षा आपण दुष्काळावर मात करण्यासाठी काही पूरक प्रकल्प केले पाहिजेत. त्यासाठी दुधाचा धंदा आहे. चारा मिळविला पाहिजे. जनावरांच्या जगण्याची काळजी घेतली पहिजे. या संकटातून प्रत्येकाला वाचविले पाहिजे. याकरिता स्वतः त्यांनी सरकारच्या विरोधात मोर्चा काढून उस्मानाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यातून त्यांनी दुष्काळाबद्दल काही सूचनाही केल्या. दुष्काळ हा तात्कालिक नाही. नियोजनाच्या अभावातून तो घडू शकतो. यासाठी दुसऱ्या हरितक्रांतीची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली. भविष्याची दूरदृष्टी, पक्की सामाजिक बांधिलकी, दृढ निश्चय आणि हातात घेतलेले काम यशस्वीपणे निभावण्याची हातोटी ही त्यांची गुणवैशिष्ट्ये या बाबतीत दिसून आली. या संदर्भात भारताचे राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांनी काढलेले उद्‌गार मोलाचे आहेत.

**''शरदरावांनी कृषी खाते मागून घेतले आणि मला धक्काच बसला. त्यांनी मागून घेतलेल्या खात्यात अविरत काम**

**केले. अन्नधान्याच्या संकटातून देशाला बाहेर काढले. एका अर्थाने त्यांनी देशात दुसरी हरितक्रांती घडवून आणली.''**

विपन्न अवस्थेत असलेल्या भारतीय शेतकऱ्याला शरदरावांनी नवा प्रकाश दिला. शेती करणे हे फार कठीण झाले आहे, हा वाक्यप्रयोग त्यांनी पुसून टाकला. शेतीमालाला उचित बाजारभाव दिले. शेतकऱ्यांची ७१ हजार कोटींची कर्जे माफ केली. त्याला स्वस्तात पुरेसे कर्ज उपलब्ध करून दिले. फळबागा समृद्ध केल्या. शेतीतून नवनवी उत्पन्नाची साधने दिली. या साऱ्यातून भारतीय शेतीला नवा आत्मविश्वास मिळाला. मातीशी इमान राखण्याचे नवे व्रत मिळाले. पडिक जमिनीवर उपवने झाली, मेहनतीला मोल आले. श्रमांना महत्त्व आले, शेतीला नवा श्वास आला. भारताच्या १२१ कोटी लोकसंख्येला पुरून उरेल इतके धान्य निर्माण करण्याची किमया त्यांनी केली. एवढेच नाही तर आपण आता जगातील अनेक मान्यवर देशांना धान्य निर्यात करू शकतो हेही कृतीतून दाखवून दिले. नैसर्गिक संकटे येऊनही शेतीतला आत्मविश्वास शरदरावांनी दिला. धडाधडा जमिनी विकून शहरांकडे धावणारा वर्ग विचार करू लागला. शेती ही महत्त्वाची आहे. शेतीवरच भारताचे अंदाजपत्रक होणे आहे. आजही पावसावरच शेअरचे भाव अवलंबून असतात. ही वस्तुस्थिती ओळखून शरदरावांनी भारतीय शेतीला उपलब्ध असणाऱ्या आवश्यक सोयीसुविधा निर्माण करून दिल्या. विशेष म्हणजे त्यांनी शेतीसाठी जैव तंत्रज्ञान व आधुनिकीकरण वाढीस लावण्याचा प्रयत्न केला. याला अनेकांनी विरोध केला. तो विरोध अंगावर झेलून त्यांनी शेतीत जैव तंत्रज्ञान, जेनेटिकली मॉडिफाईड बियाणे व त्याच्या विविध जाती आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला.



राष्ट्रपती प्रणब मुखर्जी शरद पवार यांना कृषी क्षेत्रातील कार्याबद्दल पद्मविभूषण पुरस्कार प्रदान करताना.

साहित्य संमेलनाची व्याख्याने असो किंवा विविध प्रासंगिक भाषणे असोत शरदरावांच्या चिंतनाला एक वेगळा गंध आहे. त्यातून एखादा तरी नवा मुद्दा येतो. आपण असा कधी विचारच केला नाही असे वाटते. हे कसे काय घडते आणि कसे होते हे खुद्द शरदरावांनाही सांगणे अवघड आहे. मात्र एक गोष्ट निश्चित. त्यांची उर्जा त्यांनी जपली. म्हणून ते आजही विविध कामात रमतात. समाजकार्याची आवड असणारे शरदराव कलेच्या आणि विद्येच्या क्षेत्रातही वेगळा ठसा उमटवितात. आजच्या क्रिकेट क्षेत्रातही त्यांनी केलेले कार्य खूप वेगळे व महत्त्वाचे आहे. त्यांची आणि सचिन तेंडूलकरची मैत्री हा सर्वांच्या कुतूहलाचा विषय आहे. खेळाडूंच्या भावना काय असतात याविषयी त्यांचे निरीक्षण कमालीचे अचूक असते. एखाद्या खेळाडूला नेमके काय हवे आहे हे त्यांना अचूक कळते. मैदानावरच्या खेळांना कसे प्रोत्साहन द्यावे हे त्यांनी जपले आहे. कुस्ती, कब्बड्डी, खो–खो या खेळांना नवी दिशा देऊन त्यांना सातासमुद्रापार त्यांनी नेले आहे. क्रीडाक्षेत्रातला खिलाडूपणाही त्यांनी जपला आहे. तरीही राजकारणाविषयी आपल्या घरात ते कधीही बोलत नाहीत. आणि आयुष्यभर राजकारणात राहूनही खेळात राजकारण येऊ देत नाहीत. हे त्यांना कसे जमते हेही एक नवलच आहे. मात्र ज्याला जे सांगायचे ते ते बरोबर सांगतात. त्यामुळे घराचे घरपणही सांभाळले जाते आणि समाजकार्याचा आवाकाही कळतो. शरदरावांच्या अखंड परिश्रमांची ही वेगळी झलक आहे. त्यांच्या परिवारातही ते वेगळे आहेत. दिलखुलास बोलतानाही शरदराव नर्म विनोद करतात. ते अगदी सहज बोलतात. जे जे आवडते त्यावर त्यांनी मनापासून प्रेम केले. ते त्यांनी आपल्या मित्रांना वाटले. वयाची ७९ वर्षे पूर्ण करुन आता पवार साहेब ८० व्या वर्षात जाणार आहेत हे पटत नाही. अद्याप साठीच व्हायची आहे असे वाटते. इतका विलक्षण उत्साह प्रत्येक कामात त्यांच्या ठायी ठायी आढळतो. त्यामुळेच वाटते अशा माणसांना वयाचे बंधन नसते. राष्ट्रीय कार्यात अशी मने पूर्ण बुडालेली असतात. देशाचा संसार ते आपला मानतात. समाज सेवेचा हा आदर्श वसा वाढदिवसाच्या निमित्ताने थोड्या शब्दात आम्हाला ठेवावासा वाटला. लिहावयाचे खूप मनात आहे. कधीतरी योग आला तर तेही लिहू. भावना भरून आल्या आहेत. त्यामुळे शब्द मुके झाले आहेत. समाजासाठी अविरत झटणारे शरदराव सहस्रचंद्र दर्शनाकडे वाटचाल करीत आहेत ते आपण पाहत आहोत याचा आनंद आहे. समाधानाने शरदरावांच्या कार्यकर्तृत्त्वाला नमस्कार करुन एवढेच म्हणतो...

**'जीवेम् शरदः शतम्'**



# शरद पवार : दुसऱ्या हरितक्रांतीचे प्रणेते

(पान ५ वरून)

थरथरत्या हाताने मनात इच्छा नसतानाही व आतला आवाज साथ देत नसतानाही केवळ पंतप्रधानांच्या आग्रह व विनंती खातर साहेबांनी गहू आयातीच्या फाईलवर सही केली. त्या दिवशी रात्रभर त्यांना झोप आली नाही.पण त्याच वेळी त्यांनी मनाशी खूणगाठ बांधून पक्का निर्धार केला की ही शेवटची आयात. पुन्हा अन्नधान्य आयात करण्याची वेळ भारतावर येता कामा नये. परदेशातल्या शेतक-यांना वाढीव पैसे देण्यापेक्षा ही वाढीव रक्कम आपल्याच देशातल्या शेतक-यांना देवू केली तर ते अधिक धान्य पिकवतील व पुन्हा धान्याची पिके घेण्याकडे वळतील असा विचार करुन पहिल्या वर्षापासून म्हणजे २००५ सालापासूनच त्यांनी अन्नधान्याच्या आधारभूत किंमती वाढवून देण्याचा निर्णय घेऊन पुढची सलग १० वर्षे म्हणजे २०१४ पर्यंत या शेतीमालाच्या आधारभूत किंमती सातत्याने वाढवित नेऊन त्या दुप्पट-चौपट केल्या. या किंमती वाढवून देण्याच्या साहेबांच्या निर्णयामुळे पहिल्याच वर्षी म्हणजे २००५-०६ मध्ये एकटया पंजाब राज्यातील शेतक-यांच्या घरात जास्तीचे आठ हजार कोटी रुपये गेले. हैदराबाद येथील रंगा रेड्डी कृषि विद्यापीठामध्ये देशातील सर्व राज्यांच्या कृषिमंत्र्यांची जून २००८ मध्ये पवार साहेबांनी बैठक बोलाविली. त्या बैठकीत पंजाबचे कृषिमंत्री श्री.सच्चासिंग लंघा(जे विरोधी पक्षातल्या अकाली दलाचे नेते होते.) यांनी पवार साहेबांचे जाहीर अभिनंदन करुन आभार मानले आणि त्यानंतर २०११ मध्ये पंजाबचे मुख्यमंत्री असलेल्या श्री.प्रकाशसिंग बादल यांनी पवार साहेबांसारखा





शेतक-यांच्या प्रती प्रेम,आपुलकी व जिव्हाळा असणारा आणि शेतक-यांचे प्रश्न व दु:खजाणून घेऊन त्यावर योग्य ती उपाययोजना वेळीच करणारा कृषिमंत्री देशात अजून झाला नाही, असे गौरवोद्गार काढले.

देशाची अन्नधान्याची स्वयंपूर्णता की शेतकऱ्याची आर्थिक उन्नती महत्वाची हा प्रश्न जो गेली ५७-५८ वर्षे प्रलंबित होता त्याचे उत्तर पवार साहेबांनी नेमकेपणाने कृतीतून दिले. दूरदृष्टी, अभ्यास, व्यवहार, अर्थशास्त्र आणि शेतकऱ्यांविषयी वाटणारे ममत्व व आपुलकी या सर्वांशी सांगड घालत त्यांनी एका दगडात दोन पक्षी मारले. आधारभूत किंमती वाढवून दिल्याने शेतकऱ्यांनीही अन्नधान्याची पिके पुन्हा जोमाने लावण्यास प्रारंभ केला. रासायनिक खतांचा वापर वाढला. दरवर्षी धान्याचे उत्पादन वाढू लागले. २००४ पर्यंत देशातले अन्नधान्याचे उत्पादन कुंठित झाले होते. १०-१५ वर्षे काहीही केल्या ते वाढून २१० ते २१५ दशलक्ष टनाच्या पुढे जात नव्हते. देशाची अन्नधान्याची स्वयंपूर्णता जेवढी महत्वाची आहे तितकीच किंबहुना त्याहून काकणभर अधिक अशी शेतकऱ्याची आर्थिक उन्नती महत्वाची आहे असे उत्तर साहेबांनी कृतीतून दिल्यामुळे त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर अत्यंत चांगला परिणाम झाला. जगातील बहुतेक देशांना त्यावेळी आर्थिक मंदीची झळ पोहोचली असताना भारताला मात्र पवार साहेबांनी कृषिमंत्री या नात्याने जी दैदिप्यमान कामगिरी करुन दुसरी हरीतक्रांती यशस्वी केली त्यामुळे आर्थिक मंदीची झळ पोहोचली नाही. शेतकऱ्याच्या हातात पैसा खेळत राहिल्यामुळे तो बाजारात जाऊन निरनिराळया प्रकारचा औद्योगिक माल खरेदी करीत राहिला. त्यामुळे उद्योगधंदयांनाही त्यावेळी आर्थिक मंदी जाणवली नाही. इतकेच नव्हे तर साहेबांनी त्यांच्या केंद्रीय कृषिमंत्रीपदाच्या काळात देशातले अन्नधान्याचे उत्पादन ५० दशलक्ष टनांनी वाढवून दाखविले. देशाच्या गरजेपेक्षा जवळपास २५ ते ३० दशलक्ष टन अन्नधान्य अधिक उत्पादन झाल्यामुळे जगातील २५ देशांना भारताने त्यावेळी अन्नधान्याची निर्यात करुन त्यांची गरज व भूक भागविली. एकेकाळी अन्नधान्याची आयात करणारा देश अशी जी भारताची जगभर प्रतिमा होती ती पवार साहेबांनी मोठया महत्प्रयासाने दूरदृष्टी ठेवून अचूक धोरणांची उतरंड रचित पुसून टाकली आणि धान्याची आयात करणारा भारत व भारताचा शेतकरी जगाची अन्नाची गरज भागवू शकतो



पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांनी केंद्रीय कृषिमंत्री म्हणून केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल शरद पवार यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.



आणि जगाचे धान्याचे कोठार (फूड बाऊल) भारतात होवू शकते असे आशादायक चित्र जगासमोर उभे केले. पवार साहेबांच्या या महान कार्याची युनो च्या 'फूड अॅन्ड अॅग्रिकल्चर ऑर्गनायझेशन' ने (एफएओ) योग्य ती दखल घेतली. संघटनेचे सरचिटणीस ग्रासीआ दासिल्व्हा यांनी लेखी पत्र व पुष्पगुच्छ प्रतिनिधीमार्फत साहेबांकडे पाठवून त्यांचे भारतीय कृषि अनुसंधान परिषदेत झालेल्या खरीप हंगामाच्या बैठकीत जाहीर अभिनंदन केले. असेच अभिनंदनाचे पत्र फिलीपाईन्समधील 'इंटरनॅशनल राईस रिसर्च इन्स्टिटयुट' मनिला येथूनही आले. कारण स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा भारताने १०० लक्ष टनाचा भात उत्पादनाचा टप्पा पार केला होता. गहू आणि भात या दोन प्रमुख धान्यपिकांमध्ये जी उच्चांकी आघाडी पवार साहेबांच्या निर्णयांनी घेतली गेली त्यामुळेच दुसऱ्या हरितक्रांतीने बाळसे धरले. भारताचे तत्कालिन राष्ट्रपती महामहीम प्रणब मुखर्जी यांनी बारामती येथे स्वत: येऊन 'दुसऱ्या हरितक्रांतीचे उद्गाते' या शब्दात पवार साहेबांच्या कार्याचा गौरव केला. शेती क्षेत्रात अशी जी अव्दितीय कामगिरी साहेबांनी करुन दाखविली त्याबद्दल मोदी सरकारने देखील 'पद्मविभूषण' हा सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना बहाल करुन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव केला.

पवार साहेबांसारखे द्रष्टे नेतृत्व शतकात एखादेच जन्माला येते. सुदैवाने म्हणा त्यांचे भाग्य थोर. त्यांना महाराष्ट्राचे आधुनिक शिल्पकार यशवंतराव चव्हाण साहेबांसारखे गुरु व मार्गदर्शक लाभले. चव्हाण साहेबांच्या विचारांचे जे बाळकडू पवार साहेबांना मिळाले त्यामुळे महाराष्ट्र आणि देशाच्या शेती व सहकार क्षेत्राचा चेहरामोहराच बदलला. १९६० मध्ये महाबळेश्वर येथे झालेल्या काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनात चव्हाण साहेबांनी जो कृषि- औद्योगिक क्रांतीचा नारा देऊन महाराष्ट्राच्या विकासाचे जे स्वप्न पाहिले होते ते पूर्णत्वाला नेण्याचे काम पवार साहेबांनी केले.



भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या पहिल्या गळीत हंगामाच्या प्रसंगी शरद पवार आणि सौ. प्रतिमाताई पवार उपस्थित होत्या. त्यांच्या शुभहस्ते गव्हाणीत ऊसाची मोळी टाकण्यात आली. तेव्हा शेजारी दिलीप वळसे पाटील, गोपीनाथ मुंडे, मधुकर पिचड, अशोक मोहोळ व इतर

गुरुचे स्वप्न शिष्याने पूर्ण केल्याची उदाहरणे राजकारणात फार विरळ आहेत. चव्हाण साहेबांच्या विचारांची कास धरीत, त्यांच्या पावलांवर पावले टाकीत पवार साहेबांनी जे बेरजेचे राजकारण केले त्यामुळे राजकारणाला शालिनता आली आणि समाजकारणाला नम्रता आली. सहकारी साखर कारखाने,सुतगिरण्या,सहकारी व नागरी बँका,पतसंस्था यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या उभारणीसाठी शासनाच्या तिजोरीतून साहेबांनी सढळ हाताने मदत दिली. त्यांच्या वाढीला अनुकूल होतील अशा पध्दतीने धोरणांची रचना केली. माझे स्वत:चेच उदाहरण सांगायचे झाले तर आंबेगाव तालुक्यात भीमाशंकर सहकारी साखर कारखाना आज जो सर्वांना दिमाखाने उभा दिसतो आहे त्याच्या उभारणीची मूळ कल्पना पवार साहेबांचीच. त्यांनी मला साखर कारखाना काढायचे सुचविले आणि त्यासाठी लागणारी सर्वतोपरी मदतही केली. त्यामुळे अगदी अल्पावधीत कारखाना उभा करुन तो आम्ही उत्तमरितीने चालवूनही दाखविला. एवढेच नव्हेतर साहेबांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व सूचना यांचे तंतोतंत पालन केल्यामुळे सलग ९-१० वर्षे राष्ट्रीय पातळीवरची प्रथम क्रमांकाची पारितोषिके आमचा कारखाना प्राप्त करु शकला. व्यवसायातली जी बारकाव्याची दृष्टी आहे ती साहेबांमध्ये इतकी ठासून भरलेली आहे की कधीकधी मला असे वाटते ते राजकारणात पडले नसते आणि स्वत:चे उद्योगधंदे उभे करण्याच्या मागे लागले असते तर ते देशातले फार मोठे यशस्वी उद्योजक झाले असते. पण नियतीच्या मनात जे असते तेच घडते. काळया आईची व शेतक-यांची सेवा आयुष्यभर साहेबांच्या हातून व्हावी हाच नियतीचा संकेत असावा. त्यामुळे शेती व शेतक-यांवर कोणतेही संकट येवो, त्या संकट निवारणासाठी पवार साहेब काळ,वेळ,प्रकृती या कशाचीही तमा न बाळगता स्वत: प्रथम मदतीसाठी धावून जातात. जिथून जिथून मदत मिळविणे शक्य असेल ती मिळवून संकटग्रस्तांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेच कोणतेही संकट आले तर शेतक-यांना प्रथम आठवण पवार साहेबांचीचहोते. मोठया प्रेमाने,आशेने व आतुरतेने ते साहेबांची वाट पाहात राहतात. हीच साहेबांची मोठी पुण्याई व कमाई आहे. जनतेच्या मनात त्यांच्या बद्दल जो जिव्हाळा व विश्वासार्हता

आहे त्याची मोजदाद कशानेच करता येणार नाही.

महाराष्ट्रातील पहिल्या हरितक्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात कृषि राज्यमंत्री म्हणून पवार साहेबांनी शेतीमधल्या कामांची जी मुहूर्तमेढ रोवली ती अजूनही चालू आहे. मागील ५० वर्षात त्यांनी शेती व सहकार क्षेत्रात जे प्रचंड काम केले आहे त्यांची नुसती यादी करायची झाली तर तोही एक मोठा ग्रंथ होईल. १९९० -९१ मध्ये मुख्यमंत्री असताना त्यांनी १०० टक्के अनुदानावरती रोजगार हमीशी निगडीत करुन जी शासकीय फळबाग योजना राबविली त्यामुळे महाराष्ट्रात फळबागांच्या क्षेत्रात क्रांती होऊन शेतक-याच्या जीवनात आर्थिक उन्नतीची पहाट उजाडली आहे.दुष्काळी भागातील शेतक-यांना डाळिंब, बोर, सिताफळ, आंबा, चिंच, यामधून लाखो रुपये मिळून त्यांचे संसार सुखाने उभे राहिले आहेत. फळांची मोठया प्रमाणावर निर्यात सुरु होऊन शेतक-यांच्या खिशात डॉलर व युरो उडया मारु लागले आहेत. राज्यात शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी राहून शेतक-यांच्या मालाची मूल्यवृध्दी होऊ लागली आहे. साहेबांनी १९९३ साली इस्राईलहून आल्यानंतर मुंबईतील न्यूझीलंड होस्टेलमध्ये आणि कोयना धरणावर निवडक लोकांची बैठक घेऊन शेतीमाल निर्यात व प्रक्रियेसाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याचे जे धोरण जाहीर केले त्याप्रमाणे ते सतत कार्यरत राहिले. विविध पिकांचे निर्यातीसाठी विभागनिहाय झोन निर्माण करुन शेतीमाल निर्यात कधीही बंद होता कामा नये यासाठी ते आग्रही राहिले. वेळ पडली तेव्हां ही निर्यात बंदी उठविण्यासाठी त्यांनी संघर्षही केला. कांदा,साखर यांची निर्यात बंदी उठवूनच ते थांबले नाहीत तर त्यांनी शेतीमालाच्या निर्यातीसाठी शेतक-यांना प्रोत्साहन म्हणून वाहतुक अनुदानही दिले. यामागे त्यांचा हेतू शेतक-यांचा उत्पादन खर्च कमी व्हावा आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्यांना स्पर्धा करणे सुकर व सहज शक्य व्हावे हाच होता.येत्या १२ डिसेंबरला पवार साहेब वयाची ७९ वर्षे पूर्ण करुन ८० व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. वयाच्या २७ व्या वर्षी ते प्रथम आमदार झाले होते. त्या तरुण वयात जो कामाचा उत्साह व जोश होता तोच आजही कायम आहे. किंबहुना त्यात काकणभर वृध्दीच झाली आहे असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. अष्टपैलू व सर्वांगीण असे हे नेतृत्व आहे. जीवनातले कोणतेही क्षेत्र असे नाही की साहेबांचा त्यावर अभ्यास नाही व त्यांनी काम केले नाही. सर्व क्षेत्रांच्या व मुख्यत: सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून त्यांच्या विकासासाठी साहेबांनी स्वत:चे आयुष्य चंदनासारखे झिजविले. आजही या वयात ते कार्यरत आहेत ही आपल्यासाठी व देशासाठी मोठी भाग्याची गोष्ट आहे. वयाची शंभरी गाठेपर्यंत त्यांनी असेच कार्यरत राहावे आणि त्यासाठी परमेश्वराने त्यांना उत्तम दिर्घायुष्य द्यावे एवढीच प्रार्थना करुन थांबतो व म्हणतो जीवेम् शरद:शतम!







आज मी खूप अस्वस्थ आहे, वर्तमानपत्रात बातमी वाचली प्रसिद्ध कवी 'वरवरा राव" यांच्या संदर्भातील. आपल्याकडल्या गाजलेल्या 'भिमाकोरेगाव प्रकरण' आणि 'एल्गार' परिषदेला ते उपस्थित राहिले होते. ती परिषद जणू काही नक्षलवाद्यांची समर्थन करणाऱ्यांचीच होती, म्हणून एन.आय.ए. ने २०१८ पासून त्यांना तुरुंगात डांबून ठेवलेलं आहे.

पण अगदी सर्वोच्च न्यायालयानेसुद्धा त्यांना जमीन नाकारलेला आहे. त्यांना आता महाराष्ट्रातल्या तळोजा येथील जेलमध्ये 'बंदी' म्हणून ठेवण्यात आलेलं आहे. कोविड-१९ च्या संकटानंतर एक विचित्र परिस्थिती सगळ्याच तुरुंगात निर्माण झाली होती, आणि त्या कोविडचा फैलाव तुरुंगातून कैद्यांना होऊ नये म्हणून काही कैद्यांना पॅरोलवर सोडावे, अशीही

# वरवरा राव - एका संघर्षाचे नाव



वरवरा राव या कवींचा जन्म ३ नोव्हेंबर, १९४० चा. म्हणजे आता ते ८० वर्षांच्या उंबरठ्यावर असलेले एक जेष्ठ नागरिक आहेत. एक उत्तम प्राध्यापक, कवी, साहित्यिक म्हणून आंध्र प्रदेशात खूप नावाजलेले. डाव्या चळवळींशी, विचारांशी जवळीक आहे. १९७५ च्या आणीबाणीत मिसा" खाली २ वर्षे अटकेतही जाऊन आले. पण त्याही अगोदर तुरुंगाच्या वारंवार फेऱ्या त्यांच्या घडलेल्या होत्या. माझ्या माहितीप्रमाणे गेल्या ४०-५० वर्षातील कदाचित निम्मी वर्षं वरवरा राव हे तुरुंगातच राहिलेले आहेत. 'एल्गार' च्या निमित्ताने त्यांनी परिषदेत केलेलं भाषण, त्यानंतर त्यांच्याकडे सापडलेली काही पुस्तकं, त्यात त्यांनी स्वतः लिहिलेलीसुद्धा काही होती, शिवाय लॅपटॉप वर मिळालेली माहिती, हे सगळं धरून त्यांना अटक करण्यात आली आहे. जामिनासाठी खालपासून वरपर्यंत अनेकदा अर्ज करून झाले, विनंत्या करून झाल्या,

**शेवटचे पान**



एक शक्यता सुरु झाली होती. पण वरवरा रावांना तीही संधी नाकारण्यात आली. त्यातच ते आजारी पडले. तळोजाच्या जेलमध्ये त्यांच्यावर उपचार करतांना मग नाईलाज झाला आणि रवानगी झाली मुंबईच्या जे. जे. इस्पितळात, म्हणजे सरकारी हॉस्पिटलमध्ये. कल्पना करा, एक ८० वर्षांचा साहित्यिक झगडतो आहे जगण्यासाठी. जे.जे.हॉस्पिटल मध्ये म्हणे त्यांचा एक छोटासा अपघात झाला. काय तर त्यांच्या बेडजवळ असलेल्या टेबलावरून पाणी पिण्यासाठी ते हात पुढे करत होते तर त्यांचा तोल गेला आणि पलंगाच्या दांडीवर त्यांच डोकं आदळलं. जखम झाली, काही टाके पडले. तरीपण, आता जे.जे.हॉस्पिटलमध्ये काही वेगळा प्रसंग उदभवू नये, म्हणून त्यांना नानावटी हॉस्पिटलमध्ये म्हणजे खासगी हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करण्यात आलं. तिकडे गेल्यावर त्यांची पत्नी आणि मुलगी भेटायला गेले त्यांना. पण आता ८० वर्षांच्या या

वृद्धाची अवस्था अशी झाली होती की ते आपल्या पत्नीला आणि मुलीला ओळखू शकले नाहीत. त्यांना आता डीमनॅशियाने गाठलं होतं, म्हणजे 'मृतीभ्रंश'.

अशाच एका खटल्यात न्यायाधीशांनी आपलं मनोगत व्यक्त केलं होतं. न्यायाधीश म्हणाले होते, एखाद्याच्या घरी माओवादाची पुस्तके सापडली, काल मार्क्सचे ग्रंथ सापडले, या वरून तो 'नक्षल चळवळीचा समर्थक आहे' असा निष्कर्ष काढणे चुकीचे होईल.

ते वारंगलच्या सी.के.एम कॉलेजचे प्राचार्य झाले. नुसतं शिकवण्याचा त्यांचा अनुभव हाच ४० वर्षांचा आहे. या काळात ते उत्कृष्ट वक्ता म्हणून नावारूपाला आले होते. त्यांचा पहिला कविता संग्रह कँप फायर". हा १९६८ साली प्रकाशित झाला. त्यांच्या सर्व साहित्याचे इंग्रजीसह कितीतरी भाषांमध्ये भाषांतर झालं. त्यांच्या पोर्टेट ऑफ फ्युचर" या कविता संग्रहावर तत्कालीन राज्य सरकारने बंदी घातली. इथून पुढे मग सातत्याने त्यांच्या लेखन स्वातंत्र्याची



मी सहजच आपल्या देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात डोकावले तर अगदी लोकमान्य टिळकांपासून ते महात्मा गांधींपर्यंत, पंडित जवाहरलाल नेहरूंपासून ते मौलाना आझादांपर्यंत, हे सगळे राष्ट्रीय नेते साहित्यिक होते उत्तम दर्जाचे. त्यांच्या धारदार लेखणीने ब्रिटीश राज्यकर्ते हादरून जायचे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरसुद्धा अनेक राजकारणी विचारवंत असतात, साहित्यिक असतात, कवी असतात, कलाकारसुद्धा असतात.

वरवरा राव सन १९६० पासून प्राध्यापकी करत होते. काही काळ त्यांनी सरकारी नोकऱ्यासुद्धा केल्या. मग गळचेपी होत राहिली. त्यांना तुरुंगवास तर भोगावा लागला. अशाच एका तुरुंगवासात त्यांनी "कॅपटीव्ह ईमॅजीनेशन ही तुरुंगातली डायरी लिहिली. त्याच सुमारास त्यांनी तेलगु मधल्या साहित्यिकांची एकत्रित अशी मोट बांधली आणि राजकारणाबद्दल वेगळं मत मांडणाऱ्यांचा, एक मंच त्यांनी तयार केला.

सरकारने त्यांच्या या संघटनेवरही बंदी घातली. नंतर १९७३ पासून त्यांच्या जेल यात्रांचा सिलसिला सुरु झाला. वरवरा राव यांच्या कवितांमुळे, लेखणांमुळे, भाषणांमुळे, हे 'क्रांती करणाऱ्यांचे कारस्थान' आहे या सबबीखाली सरकार सातत्याने अशी पावले टाकीत होतं. त्यांच्यावर अनेकवेळा

तुरुंगाबाहेर असतांना प्राणघातक हल्लेही झाले. अदलाबाद या जिल्ह्यामध्ये तर तिथल्या एका पोलीस अधिकाऱ्याने त्यांना भर रस्त्यात मारहाण केली. हे गोष्ट आहे १९७९ सालची. १९८०-२०११ या काळात नक्षली चळवळीचं समर्थन देऊन आंध्र सरकार उलथून टाकण्याचा कट त्यांनी रचला, म्हणून त्यांच्यासह ४० जणांना पुन्हा एकदा तुरुंगात धाडलं होतं. १७ वर्षांनी, म्हणजे २००३ साली कोर्टाने या ४० जणांची निर्दोष म्हणून मुक्तता केली. १९९० मध्ये एका कष्टकऱ्यांच्या आणि कामगारांच्या मोर्च्यापुढे त्यांचं भाषण झालं, हैद्राबादला. जवळ जवळ १० ते १२ लाखांचा तो मेळावा होता. 'भूमिहीनांना जमीन' हाच मुख्य विषय होता. २००१ मध्ये तेलगु देसमच्या सरकारने नक्षलवाद्यांबरोबर बोलणी करण्यासाठी त्यांच्यातर्फे वरवरा राव यांचीच नियुक्ती केली होती. ही 'मध्यस्ताची भूमिका' ते सातत्याने पार पाडत होते. २०१० साली दिल्लीतल्या भाषणाबद्दल पुन्हा एकदा वरवरा राव तुरुंगात.

एल्गार परिषदेच्या निमित्ताने वरवरा राव यांना ऑगस्ट २०१८ पासून पुन्हा बंदिवान केले आहे. ढासळत्या प्रकृतीच्या कारणासंबंधी त्यांना जामीन मिळालेला नाही. कोविड-१९ नंतर त्यांची जामिनावर सुटका व्हावी म्हणून लोकसभेच्या १४ खासदारांनी विनंतीपत्र पाठवलं. देशाच्या २ निवृत्त इलेक्शन कमिशनरने सुद्धा विनंतीपत्र दिलं. अखेरीला



नॅशनल ह्यूमन राईटस् कमिशनने निर्देश दिल्यावर मगच त्यांना खासगी हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं. इतका प्रदीर्घ संघर्षाचा आयुष्य जगलेला हा थोर लेखक कवी आता आयुष्याच्या अखेरीला स्मृतीभ्रंशाचा शिकार झालेला आहे.

तो खरंच गुन्हेगार आहे का हो? तो खरंच देशाचा शत्रू आहे का? असेलही कदाचित, न्यायालयात निकाल दिला जाईल. पण सुजाण वाचकांसाठी, संवेदनशील नागरिकांसाठी, साहित्यप्रेमींसाठी, हे सगळं खूप मनाला वेदना देणारं आहे. काय हो, माझा आणि त्यांचा संबंध? अशा अत्यंत अपरिचित साहित्यीकासाठी मी किंवा आपण सगळे काय, काय करू शकतो? फक्त, प्रार्थना करू शकतो की त्यांना मरण तरी चांगलं यावं. आता त्यांचा तुरुंगवास चुकणार नाही हे आपल्या सगळ्यांना माहित आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या साहित्यिक क्षेत्रात वावरणाऱ्या संघर्षमय जीवन जगणाऱ्या आणि अजूनही लढत राहणाऱ्या या वरवरा राव यांनी जी काही जखम केली आहे नां मनावर, ती बराच काळ ठणकत राहील बरं का.

माझ्या मताशी तुम्ही सहमत व्हाल, असा माझा अजिबात आग्रह नाही, पण माणुसकीच्या नात्याने तुम्हीसुद्धा प्रार्थनेत सहभागी व्हा नां, वरवरा राव यांच्यासाठी.

